हॉटेल जॉब-सुपरवायझर
१० वी पास/नापास ( वय वर्ष १८ पूर्ण)
१२,०००/- पगार
राहणे/जेवण/फ्री
संपर्क- पाटील ब्रदर्स हॉटेल
पांडवादेवी, पो. पोयनाड
मो.नं. ८६९८७६०००२/८६९८७६०००८
८६९८७६०००५

कृषीवल
रायगड, रविवार, दि. २ जून २०२४
किंमत ४ ₹

अलिबाग-नागाव रोडटच
आमराई विकणे आहे
१५.५ गुंठे, क्लियर टायटल, फ्रेश, हमरस्त्याला लागून सिटी सर्वे, संपूर्ण तार कंपाऊंड गेट, २४ X ७ सीसीटीव्ही कॅमेरा निरीक्षण, प्रिमियम लोकेशन, एस.टी. स्टॉपला लागून, नळ, इलेक्ट्रीसिटी पोल जवळच, Direct Party, एजंट सुद्धा चालेल.
संपर्क - ९७६९१०८१७०

# राज्यात इंडिया आघाडीच

## एक्झिट पोलचा अंदाज, महायुतीला धक्का

**। मुंबई । प्रतिनिधी ।** लोकशाहीच्या उत्सवाची शनिवारी शेवटच्या टप्प्यातील मतदानाने सांगता झाली. त्यानंतर आता निकालाबाबत विविध एक्झिट पोलने अंदाज वर्तविले आहेत. त्युनसार राज्यात इंडिया आघाडी महायुतीवर वरचढ होताना दिसत आहे. त्यामुळे राज्यात इंडिया आघाडीच बाजी मारणार असून, २५ जागा जिंकेल, असा एक्झिट पोलचा अंदाज आहे. मात्र, आघाडीच्या नेत्यांनी आम्ही ३० ते ३५ जागा जिंकू, असा विश्वास व्यक्त केला आहे. दरम्यान, भाजपाने राज्यात फोडाफोडीचे राजकारण करीत एकनाथ शिंदे आणि अजित पवारांच्या साथीने केलेल्या महायुतीला २२ जागा मिळतील, असे सांगण्यात येत आहे. मात्र, हा फक्त अंदाज असून, ४ जूनच्या मतमोजणीनंतर खरं चित्र स्पष्ट होणार आहे.

### भाजपाचं ‘४०० पार’चं स्वप्न अधुरं

नवी दिल्ली : देशातील लोकसभा निवडणुकीचे सातही टप्पे पूर्ण झाल्यानंतर एक्झिट पोलचे निकाल येण्यास सुरुवात झाली आहे. यंदाच्या निवडणुकीत भाजपानं ४०० पारचा नारा दिला होता. परंतु, भाजपाचं हे मिशन फेल होताना दिसत असून, एक्झिट पोलच्या अंदाजानुसार भाजपच्या नेतृत्वाखालील एनडीएला ३६५ जागा मिळण्याची शक्यता आहे. तर, इंडिया आघाडीला सुमारे १४२ जागा मिळण्याची शक्यता आहे. इतर पक्ष किंवा अपक्षांना जवळपास ३६ जागा मिळण्याची शक्यता आहे.



राज्यात एकूण लोकसभेच्या एकूण ४८ जागा आहेत. त्यात महायुतीला २२, महाआघाडीला २५ आणि १ जागा अपक्ष उमेदवाराला मिळणार असं दिसत आहे. तर महाराष्ट्रातल्या एक्झिट पोलनुसार भाजपाला १८, शिंदेच्या शिवसेनेला ४, काँग्रेसला ५, ठाकरे गटाला १४, पवार गटाला ६ जागा मिळतील. तर अजित पवार नेतृत्व करत असलेल्या राष्ट्रवादीला एकही जागा मिळणार नाही. या एक्झिट पोलमुळे आतापासून राज्याचं राजकीय गणित विस्कटल्याचं दिसत आहे. देशभरातील जनतेचे डोळे या निकालाकडे लागले आहेत. अशातच रिपब्लिक टीव्हीच्या एक्झिट पोलमध्ये पान २ वर

### एक्झिट पोलनुसार आघाडीवर

**रायगड** : अनंत गीते, ठाकरे गट, **मावळ** : श्रीरंग बारणे, शिंदे गट, **नांदेड** : प्रताप पाटील, महायुती, **सांगली** : विशाल पाटील, अपक्ष, **ठाणे** : राजन विचारे, ठाकरे गट, **चंद्रपूर** : प्रतिभा धानोरक, काँग्रेस, **उत्तर मध्य मुंबई** : वर्षा गायकवाड, काँग्रेस, **सोलापूर** : प्रणिती शिंदे, काँग्रेस, **माढा** : धैर्यशील पाटील, शरद पवार गट, **सिंधुदुर्ग** : नारायण राणे, भाजप, **बारामती** : सुप्रिया सुळे, शरद पवार गट, **नागपूर** : नितीन गडकरी, भाजप, **सातारा** : शशिकांत शिंदे, शरद पवार गट, **बीड** : पंकजा मुंडे, भाजप, **संभाजीनगर** : चंद्रकांत खैरे, ठाकरे गट– **कोल्हापूर** : शाहू महाराज, काँग्रेस, **अहमदनगर** : निलेश लंके, मविआ, **पुणे** : मुरली मोहोळ, महायुती, **धुळे** : सुभाष भामरे, भाजप, **जळगाव** : स्मिता वाघ, भाजप, **कल्याण** : श्रीकांत शिंदे, शिंदे गट ,**दिंडोरी** : भास्कर भगरे, शरद पवार गट, **नाशिक** : राजाभाऊ वाजे, **परभणी** : संजय जाधव, ठाकरे गट पान २ वर



| | |
|---|---|
| पवार गट | 06 |
| ठाकरे गट | 14 |
| काँग्रेस | 05 |
| **आघाडी** | **25** |
| भाजपा | 18 |
| शिवसेना | 04 |
| राष्ट्रवादी | 00 |
| **महायुती** | **22** |

# तटकरे भाजपात जाणार?

## अजितदादा गटात ४ जूननंतर मोठं बंड

**। मुंबई । प्रतिनिधी ।** येत्या ४ जून रोजी लोकसभेचा निकाल लागल्यावर अजितदादांच्या गटात मोठं बंड होणार आहे. अजितदादा गटाचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे हे काही आमदारांना घेऊन बंड करणार आहेत. ते भाजपमध्ये जाणार आहेत, असा खळबळजनक गौप्यस्फोट शरद पवार गटाच्या युवक राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष मेहबूब शेख यांनी केला आहे. मेहबूब शेख यांच्या दाव्याने एकच खळबळ उडाली आहे. अजितदादा गटाचे अनेक लोक आम्हाला फोन करत असून, पक्षात प्रवेश करू इच्छित असल्याचा दावाही त्यांनी केला आहे.



आमच्या पक्षात ज्याचं सिल्वर ओकवर प्रेम आहे, तेच लोक इथे राहिली आहेत. जे इकडं तिकडं पळणारे होते, दुसऱ्यांच्या घरात डोकावणारे होते ते सर्व निघून गेले. आमच्या पक्षातून कोणी आता फुटणार नाही. सुनील तटकरे ज्या पक्षाचे प्रदेशाध्यक्ष आहेत, त्या पक्षाचे बरेच आमदार ४ जूननंतर दुसरीकडे जाण्याच्या शोधात आहेत. अनेकांचे निरोप आमच्याकडे येत आहेत. त्यांना आमच्या पक्षात यायचं आहे. ४ जूननंतर सुनील तटकरे हे काही आमदारांसोबत डायरेक्ट भाजपमध्ये जाणार आहेत. कारण, त्यांना शरद पवार यांच्याकडे एन्ट्री मिळणार नाही. त्यामुळे तो गोंधळलेल्या अवस्थेत आहे, असा दावा मेहबूब शेख यांनी केला आहे.

# सांगता उत्साहात, निकालाची प्रतीक्षा

## शेवटच्या टप्प्यात ५८.०३ टक्के मतदान

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।** लोकसभा निवडणुकीच्या अखेरच्या सातव्या टप्प्यात ८ राज्य व केंद्रशासित प्रदेशातील ५७ मतदारसंघात सायंकाळी ५ वाजेपर्यंत मोठ्या उत्साहात ५८.३ टक्के मतदान पार पडले. पंतप्रधानांसह ४ केंद्रीय मंत्र्यांचे नशीब ईव्हीएममध्ये बंद झाले आहे. त्यामुळे लोकशाहीच्या या महासोहळ्याची शेवटच्या टप्प्यातील मतदानाने उत्साहात सांगता झाली असून, आता संपूर्ण देशवासियांचे लक्ष ४ जून रोजीच्या निकालाकडे लागून राहिले आहे.

निवडणूक आयोगाच्या व्होटर टर्नआऊट ॲपनुसार, संध्याकाळी ५ वाजेपर्यंत ५८.३४ टक्के मतदान झाले आहे. सर्वाधिक ६९.८९% मतदान पश्चिम बंगालमध्ये झाले आणि सर्वात कमी ४८.४६% मतदान बिहारमध्ये झाले. याशिवाय ओडिशातील विधानसभा निवडणुकीसाठी ६२.४६% मतदान झाले. ४ राज्यांतील विधानसभेच्या ९ जागांवरही पोटनिवडणुकीसाठी मतदान झाले.

दरम्यान, बिहार आठ जागांसाठी ४८.८६ टक्के, चंदीगड एक जागा ६२.८० टक्के, हिमाचल प्रदेश चार जाग ६२.५६ टक्के, झारखंड तीन जागा ६७.९५ टक्के, ओडिशा सहा जागा ६२.४६ टक्के, पंजाब १३ जागा ५२.२० टक्के, उत्तर प्रदेश १३ जागा ५५ टक्के, पश्चिम बंगार नऊ जागांसाठी ६९.८६ टक्के मतदान झाले आहे.

# पोलादपुरात जमिनीला भेगा



**। पोलादपूर । प्रतिनिधी ।** तालुक्यातील करंजे गावातील पायटेवाडी येथे जमिनीला दूरवर रूंद भेगा पडल्याची माहिती मिळताच पोलादपूरचे तहसीलदार कपिल घोरपडे यांनी घटनास्थळाची पाहणी केली. यापूर्वी २००५ मध्ये पोलादपूर तालुक्यातील बोरावळे गावात, तर २०२१ मध्ये वाकण गावामध्येही अशा भेगा पडल्या होत्या. यामुळे यंदाच्या पावसाळयात अतिवृष्टी तसेच भूस्खलन होण्याचे हे नैसर्गिक संकेत तर नाही ना, अशी साशंकता व्यक्त होत आहे.

### अतिवृष्टी, भूस्खलनाचे नैसर्गिक संकेत?

### तहसीलदार घोरपडे यांनी केली पाहणी

करंजे पायटेवाडी येथील शेतकरी पांडुरंग धोंडू घाडगे यांच्या भातशेताच्या जमिनीत भेगा पडल्याची माहिती ग्रामस्थ सुभाष घाडगे यांनी दिली असता पोलादपूर तहसीलदार कपिल घोरपडे यांनी तातडीने करंजे पायटेवाडी येथे सहकाऱ्यांसमवेत जाऊन पाहणी केली. यावेळी ग्रामस्थांनी काही घरांच्या भिंतींनाही या भेगांमुळे तडे गेल्याचे तहसिलदारांच्या निदर्शनास आणून दिले आहे. पायटेवाडी परिसरातील संभाव्य धोका लक्षात घेऊन येथील जवळपासच्या लोकवस्तीतील पान २ वर

# मनुस्मृती शिकवून गुलाम निर्माण होतील

## आंबेडकरांचा घणाघात

**पाली/बेणसे** : लोकशाहीचे स्तंभ ढासळायला लागले असून, देशाची वाटचाल हुकूमशाहीच्या दिशेने होत आहे. अभ्यासक्रमात लहानपणापासूनच मनुस्मृती शिकवून एन्जॉय करणारे गुलाम निर्माण होतील, अशी चिंता भारतीय बौद्ध महासभेचे राष्ट्रीय अध्यक्ष आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे पणतू राजरत्न आंबेडकर यांनी व्यक्त केली.

रायगड जिल्ह्यातील कर्जत येथे सालाबादप्रमाणे सर्व बहुजन बांधवांनी एकत्रित येऊन दि. ३१ मे व १ जून अशा दोन दिवसीय भीम महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. यानिमित्ताने विविध वैचारीक, प्रबोधनात्मक कार्यक्रम घेण्यात आले. प्रमुख वक्ते भारतीय बौद्ध महासभेचे राष्ट्रीय अध्यक्ष, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे पणतू राजरत्न आंबेडकर यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. अभ्यासक्रमात, पाठ्यपुस्तकात मनुस्मृती आणण्याच्या भूमिकेवर राजरत्न आंबेडकर यांनी परखड मत मांडले आहे. आंबेडकर म्हणाले की, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे विधान आहे की, शिक्षण हे वर्णव्यवस्थेला, जातीयतेला उखडून फेकतील अशा लोकांचं झालं पाहिजे. जे लोक मनुस्मृती व वर्णव्यवस्था लागू करतील, ते लोक ही पान २ वर

# ‘पदोन्नती हा अधिकार नाही’

**नवी दिल्ली** : सरकारी नोकरदारांना पदोन्नती देण्यासंदर्भात राज्यघटनेत कोणताही उल्लेख करण्यात आलेला नाही. त्यामुळे नोकरदारांना पदोन्नती देण्याचे निकष, स्वरूप आणि त्यासाठी काय पात्रता असावी, हे ठरविण्यासाठी कायदेमंडळ आणि मंत्रिमंडळ स्वतंत्र आहे, असे निर्देश सर्वोच्च न्यायालयाने दिले आहेत. नोकरीचे स्वरूप व उमेदवाराचे अपेक्षित काम यावर अवलंबून पदोन्नतीच्या पदांवर रिक्त जागा भरण्याची पद्धत पान २ वर

# रिक्षा-टेम्पोच्या अपघातात तीन ठार

**। माणगाव । प्रतिनिधी ।** मुंबई-गोवा महामार्गावर अपघाताचे सत्र सुरूच आहे. शनिवारी (दि. ३१) रिक्षा व आयशर टेम्पोमध्ये अपघात होऊन तिघांचा मृत्यू झाल्याची घटना घडली आहे.



याबाबतचे सविस्तर वृत्त असे की, शनिवारी मुंबई-गोवा महामार्गावर कशेणे गावाच्या हद्दीत दुपारी तीन वाजताच्या सुमारास ऑटो रिक्षा क्र. एमएच ४६ बीपी १४४२ व आयशर टेम्पो क्र. एमएच ०४ एलक्यू ३४०८ यामध्ये अपघात होऊन शेवंती लक्ष्मण कोळी (४५), रा. कशेणे आदिवासी वाडी व नंदा मारुती पवार (३५), रा कोशिंबळे व सुनिता या तिघांचा मृत्यू झाला असून, संगीता मनोहर वाघमारे (२०) व मयुरी मनोहर वाघमारे (१५) दोन्ही रा. कशेणे आदिवासी वाडी या जखमी झाल्या आहेत. या अपघाताची नोंद माणगाव पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

# रविवारपासून पर्यटक परतीच्या मार्गावर

## पर्यटनाचा शेवटचा हंगाम बहरला

**। अलिबाग । प्रतिनिधी ।** उन्हाळी सुट्टीचा आनंद घेण्यासाठी पर्यटकांनी यंदादेखील रायगड जिल्ह्याला पसंती दर्शविली. महिनाभर सुट्टीचा आनंद घेतल्यावर आता पर्यटक परतीच्या तयारीला लागले आहे. त्यामुळे पर्यटन हंगामाचा शेवटचा आठवडा असून, रविवारपासून पर्यटक परतीच्या प्रवासाला निघणार आहेत.

रायगड जिल्हा पर्यटनाच्या दृष्टीने महत्त्वाचा ठरत आहे. दरवर्षी पर्यटक उन्हाळी सुट्टीत रायगड जिल्ह्यामध्ये दाखल होतात. यंदादेखील मुंबई, ठाणे, पुण्यासह अन्य जिल्ह्यांतील हजारो पर्यटक रायगड जिल्ह्यात दाखल झाले. लोकसभा निवडणुकीमुळे मे महिन्याच्या पहिल्या आठवड्यात पर्यटकांचा फारसा प्रतिसाद मिळाला नाही. मात्र, दुसऱ्या आठवड्यापासून पर्यटक जिल्ह्यात येण्यास सुरुवात झाली. त्यानंतर पर्यटकांचा ओघ वाढतच गेला. हॉटेल्स, कॉटेजेस पर्यटकांनी फुल्ल झाले. त्यामुळे स्थानिकांना रोजगाराचे साधन खले झाले. अलिबागसह वरसोली, नागाव, किहीम, काशीद, मुरूड समुद्रकिनारे पर्यटकांनी बहरून गेले. उन्हाचे चटके लागत असल्याने बहुतांशी पर्यटकांनी समुद्रात पोहण्याचा आनंद लुटला. काही पर्यटकांनी समुद्रसफरीचा आनंदही मनमुरादपणे घेतला.

आता पर्यटक परतीच्या मार्गावर जाण्याच्या तयारीला लागले आहेत. शाळा जूनच्या पहिल्या अथवा दुसऱ्या आठवड्यात सुरु होण्याची शक्यता आहेत. पान २ वर

### स्थानिक महिलांना मिळाला रोजगार

उन्हाळी सुट्टीत रायगड जिल्ह्यात पर्यटक दाखल झाले. नागाव, किहीम आक्षीसह समुद्रकिनारी पर्यटकांनी गर्दी केली. पर्यटकांनी यंदा कॉटेजला अधिक पसंती दिली. खाण्यापिण्यापासून सर्वच सुविधा एकाच ठिकाणी उपलब्ध होत असल्याने पर्यटकांनी कॉटेजमध्ये राहण्यावर भर दिला. त्यामुळे घरगुती भोजन करण्यासाठी स्थानिक महिलांना रोजगाराचे साधन खुले झाले.














# ई-रिक्षाच्या बोर्डाची दुरवस्था

**। माथेरान । वार्ताहर ।**
**माथेरानमध्ये २०२२ मध्ये प्रायोगिक तत्त्वावर ई-रिक्षा सुरू करण्यात आल्या होत्या, त्यावेळी अनेक ठिकाणी ई-रिक्षाच्या बाबतीत माहिती फलक नगरपरिषदेच्या माध्यमातून लावण्यात आले होते. परंतु, कुणा अज्ञात व्यक्तींनी हे फलक आकसापोटी पाडण्याचा प्रयत्न केल्यामुळे त्या फलकावर असणारी शासकीय माहिती आणि ई-रिक्षाबाबतीत नियमावली पर्यटकांना मिळत नाही.**



लवकरच माथेरानमध्ये अधिकृतपणे एकूण वीस ई-रिक्षा पुन्हा नव्या जोमाने हातरिक्षा चालक मालक स्वतः चालविणार असून, त्याबाबत त्यांनी आवश्यक कागदपत्रे संघटनेच्या वतीने जमा केलेली आहेत. त्यानंतर उर्वरित एकूण ७४ हातरिक्षा मालकांनासुध्दा टप्प्या-टप्प्याने ई-रिक्षा मिळणार आहेत. त्यामुळे येणाऱ्या या वीस ई-रिक्षांना आणि पर्यटकांच्या सुरक्षेच्या दृष्टीनेसुद्धा संरक्षण असावे यासाठी जागोजागी सीसीटीव्ही कॅमेरे नगरपरिषदेच्या माध्यमातून लावणे गरजेचे आहे. मागील काळात ज्याप्रमाणे नगरपरिषदेच्या माध्यमातून मुख्य रस्त्यावर सीसीटीव्ही कॅमेरे लावण्यात आले आहेत. त्याच धर्तीवर महत्त्वाच्या ठिकाणी जेथून ई-रिक्षा धावणार आहेत, त्या दस्तुरी नाक्यापासून कस्तुरबा रोड, रिगल नाक्यापर्यंत सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात यावेत, असे बोलले जात आहे.

## कृष्णा खराडे यांचे निधन



**नागोठणे :** रायगड जिल्ह्यातील म्हसळा येथील नाभिक समाजाचे ज्येष्ठ कार्यकर्ते कृष्णा विठोबा खराडे (८६) यांचे सोमवार, दि. २७ मे रोजी सायंकाळच्या सुमारास निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर मंगळवारी (दि. २८) मे रोजी सकाळी म्हसळा येथील वैकुंठ स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. यांच्या पश्चात पत्नी सुनीता, मुले चंद्रशेखर, महेंद्र व महेश, मीना यादव ही विवाहित मुलगी यांच्यासह जावई, सुना व नातवंडे असा मोठा परिवार आहे. कृष्णा खराडे यांचे दशक्रिया विधी बुधवार (दि.५) जून रोजी श्रीक्षेत्र हरिहरेश्वर येथे, तर उत्तरकार्य शुक्रवारी (दि.७) जून रोजी राहत्या घरी होणार असल्याची माहिती खराडे कुटुंबियांनी दिली.

# चोरढे येथे विनामूल्य योग शिबीर

**। चणेरा । प्रतिनिधी ।**
गुरुकुल आरोग्य योगपीठ (सिद्धगिरी कणेरी मठ कोल्हापूर) व श्री. स.स. काडसिद्धेश्वर सांप्र. गुरुभक्त मंडळ चोरढे यांच्या संयुक्त विद्यमाने मुरुड तालुक्यातील चोरढे येथील हनुमान मंदिरात दोन दिवस विनामूल्य योग शिबीर घेण्यात आले.

या शिबिरात योगाचे महत्त्व, उद्दिष्टे तसेच कराटे, लाठीकाठी याबाबत प्रशिक्षण देण्यात आले. या शिबिरात चंद्रकांत खोत, राज्यस्तरीय कामगार भूषण पुरस्कार विजेते प्रमुख मार्गदर्शक म्हणून लाभले. तसेच राष्ट्रीय स्तरावरील योगपटू प्रशिक्षक उत्तम मांदारे यांचे प्रात्यक्षिक मार्गदर्शन झाले. या शिबिराचे आयोजन श्री.



स.स. काडसिद्धेश्वर गुरुभक्त मंडळ चोरढे यांनी केले होते. या शिबिराचे उद्घाटन चोरढे सरपंच तृप्ती घाग यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी सदस्य अनिल चोरढेकर, सदस्या प्रमिला चोरढेकर तसेच आगरी समाज मंडळ चोरढे अध्यक्ष सुनील घाग व चोरढे ग्रामस्थ उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या शेवटी अनिल चोरढेकर यांनी दिलेला अल्पोपहार घेऊन कार्यक्रमाचा समारोप करण्यात आले. सदर योग शिबीर कार्यकामासाठी प्रत्यक्ष व अप्रत्यक्षरित्या सहकार्य केलेल्या सर्वांना आयोजकांकडून खूप आभार व धन्यवाद देण्यात आले.

# बियाणे, खते खरेदीसाठी शेतकऱ्यांची लगबग

**। कोलाड । वार्ताहर ।**
संपूर्ण रायगड जिल्ह्यासह रोहा तालुक्यातील खरीप भातपिकाचे बियाणे, खते खरेदी करण्यासाठी शेतकऱ्यांची लगबग सुरु झाली आहे. केरळात दाखल झालेल्या पावसामुळे शेतकरी खरीप पिकाच्या मशागतीसाठी तयारीला लागला आहे. रायगड जिल्हा हा भाताचे कोठार म्हणून ओळखला जातो. त्याचबरोबर नाचणी, वरी तसेच भेंडी, दुधी, मिरची व इतर भाजीची लागवड केली जाते. यासाठी लागणारे बी बियाणे खरेदीसाठी शेतकरी कामाला लागले आहेत.



याशिवाय यावर्षी सरासरीपेक्षा जास्त चांगला पाऊस पडणार असल्याचे हवामान खात्याकडून सांगण्यात आले आहे, यामुळे भातलागवडीपूर्वी कमीत कमी २५ ते ३० दिवस अगोदर भाताची रोपे तयार केली जातात. यासाठी वेळेवर भात बियाणे खरेदी करण्यासाठी शेतकऱ्यांची लगबग करीत असतात, यासाठी शेतकरी शेतात ट्रॅक्टर किंवा बैलाच्या सहाय्याने नांगरणी सुरु केली आहे.

## आपटा ग्रामपंचायतीत भ्रष्टाचार?

**आपटा :** आपटा ग्रामपंचायतीमध्ये अनियमितता व काही कामात भ्रष्टाचार झाला आहे, अशा प्रकारच्या तक्रारी आपटा येथील सामाजिक कार्यकर्ते स्वप्नील भोवड यांनी पनवेल पंचायत समिती व कोकण भवनात केली होती. त्या अनुषंगाने दि. ३० मे रोजी पंचायत समिती पनवेल यांनी श्री. घरत यांची चौकशी अधिकारी म्हणून नेमणूक केली आहे. याबाबतीत गुरुवारपासून चौकशी सुरू केली आहे व सर्व माहिती कागदपत्रे सादर करण्यास सांगितले आहे. पुढील कारवाई करताना कडक भूमिका घेतली जाईल, असे विस्तार अधिकारी श्री. घरत यांनी सांगितले.

# आंबिवली रस्त्याचे काम रखडले

**। नेरळ । प्रतिनिधी ।**
कर्जत तालुक्यातील आंबिवली गावातील रस्त्याचे काम रखडले असून, या रस्त्यावरील प्रलंबित कामे मार्गी लावा, अशी मागणी स्थानिक सामाजिक कार्यकर्ते महेश भगत यांनी केली आहे.

माणगाव तर्फे वरेडी हद्दीतील आंबिवली गावातील रस्त्याचे काम अर्धवट स्वरूपाचे आहे. कर्जत तालुक्यातील रेल्वे पट्ट्यात येत असलेल्या आंबिवली गावातील कर्जत-कल्याण राज्यमार्गापासून ते आंबिवली रेल्वे गेट असा रस्ता काँक्रिट च बनविला गेला आहे. रेल्वे फाटकापासून आंबिवली गावाकडे



येणाऱ्या रस्त्याच्या कामाची सुरुवात १५ डिसेंबर २०२३ रोजी करण्यात आली होती. परंतु, रस्त्याचे काम अर्धवट स्वरूपाचे आहे. रस्त्यावरती डांबरीचे कार्पेट आणि मोऱ्यांचे काम अजूनदेखील बाकी आहे. येत्या पावसाळ्यात रस्त्याची अवस्था दयनीय होणार आहे.

शासनाने केलेला खर्च हा सर्व पाण्यात जाईल, तसेच ज्या ठिकाणी मोऱ्यांचे काम बाकी आहे, तिथे रस्ता खचण्याची शक्यता आहे, त्यामुळे ही सर्व कामे लवकरात लवकर व्हावीत, अशी मागणी स्थानिक सामाजिक कार्यकर्ते महेश भगत यांनी लावून धरली आहे. त्यासंदर्भात सार्वजनिक बांधकाम विभागाकडे लेखी स्वरूपात पत्रव्यवहारदेखील केला आहे आणि प्रलंबित कामे मार्गी लावण्यासाठी मागणी सार्वजनिक बांधकाम विभागाकडे केली आहे.

# रेवदंड्यातील अवैध धंदे बंद करा

## ग्रामस्थांची ग्रामसभेत मागणी

**। रेवदंडा । वार्ताहर ।**
दारू, मटका, जुगार या व्यसनाने रेवदंड्यातील अनेक कुटुंबं उद्ध्वस्त झाली आहेत. अनेक युवक याच्या आहारी गेले असून, कुटुंबाची वाताहत होत असल्याचे विदारक चित्र समोर येत आहे. दरम्यान, रेवदंडा ग्रामपंचायतीच्या ग्रामसभेत अवैध धंदे बंद करावेत, अशी मागणी ग्रामस्थांनी केली.

रेवदंडा ग्रामपंचायतीची ग्रामसभा गुरूवार, दि. ३० मे रोजी येथील ग्रा.पं. सभागृहात संपन्न झाली. या सभेच्या अध्यक्षस्थानी सरपंच प्रफुल्ल मोरे होते. यावेळी ग्रामविकास अधिकारी समीर म्हात्रे, ग्रा.पं. सदस्य राजन वाडकर, संतोष मोरे, सुराराम माळी, दुशांत झावरे, खलिल तांडेल यांच्यासह ग्रामस्थ स्वप्निल रानवडे, दीपक वैद्य, सुभाष शेळके, समीर आठवले, केदार खोत, किशोर मानकर, पिटनाईक, वनिता पाटील, आदी मोठ्या संख्येने उपस्थित होते. विशेष म्हणजे, यावेळी पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला होता. दरम्यान, पोलीस निरीक्षक श्रीकांत किरविले यांच्याशी संवाद साधला असता, दारू, मटका व जुगार या अवैध धंद्यांवर कायदेशीरपणे कारवाई करण्यात येईल, असे त्यांनी सांगितले. शेवटी ग्रामसेवक समीर म्हात्रे यांनी उपस्थितांचे आभार व्यक्त केले.

## विशिता खेडेकर शाळेत प्रथम

**नेरळ :** कर्जत तालुक्यातील कळंब प्रगती माध्यमिक विद्यालयाचा निकाल ८३ टक्के लागला आहे. या माध्यमिक शाळेत विशिता खेडेकर



ही विद्यार्थिनी ८८.६० टक्के गुण मिळवून पहिली आली आहे. कळंब येथील कोकण एज्युकेशन सोसायटी संस्थेच्या कळंब प्रगती माध्यमिक विद्यालयाचा यंदाचा दहावीचा निकाल ८३ टक्के लागला आहे. त्यामध्ये कु.विशिता शिवाजी खडेकर या विद्यार्थिनीने ८८.४० टक्के गुण मिळवत शाळेत प्रथम क्रमांक पटकावला आहे,तर कु. साहिल शिवराम बदे हा विद्यार्थी ७९.२० टक्के गुण मिळवून दुसरा आणि कु.दीक्षा दत्तात्रेय आगीवले या विद्यर्थिनींचा ७५.४० टक्के गुण मिळवून तृतीय क्रमांक आला आहे.

# नगर परिषदेतर्फे ५० खाटांचे रुग्णालय सुरु होणार

**। रत्नागिरी । प्रतिनिधी ।**
मुंबई आणि ठाणे येथे रुग्णालये सुरू झाली आहेत. त्याच धर्तीवर रत्नागिरी नगर परिषदेतर्फे ५० खाटांचे रुग्णालय सुरू करण्यात येणार आहे. या रुग्णालयामध्ये केवळ एका केसपेपरच्या आधारावर तपासणी केली जाणार आहे, अशी माहिती पालकमंत्री उदय सामंत यांनी दिली.

राज्यातील लोकसभा निवडणुकीनंतर प्रथमच जिल्ह्यात आलेल्या सामंत यांनी पत्रकार परिषदेत ही माहिती दिली. ते म्हणाले की, ७७ कोटी रुपये मंजूर असलेल्या जिल्हा परिषदेच्या नूतन इमारतीचे ८० टक्के काम पूर्ण झाले असून, येत्या दोन महिन्यांत इमारत पूर्ण होईल. जिल्हाधिकारी कार्यालयातील १०० कोटींच्या प्रशासकीय इमारतीचे काम प्रगतिपथावर आहे. नगर परिषदेची नूतन इमारत अंतिम टप्प्यात आहे, तर रत्नागिरी पंचायत समितीच्या नूतन इमारतीचे काम ९० टक्के झाले असून, लवकरच ही इमारत पूर्ण होईल. रत्नागिरी शहरातील मध्यवर्ती बसस्थानकाचे कामही येत्या दोन महिन्यांमध्ये पूर्ण होईल, असा विश्वास मंत्री सामंत यांनी व्यक्त केला.

रहाटाघर बस स्थानकातील काँक्रिटीकरणासह इतर कामे १५ दिवसांत पूर्ण होणार असल्याचेही ते म्हणाले. मिऱ्या धूप प्रतिबंधक बंधाऱ्याचे ६० कोटींचे काम ८० टक्के पूर्ण झाले असून, ४१ कोटींच्या सुशोभीकरणाचे कामही लवकरच सुरू होणार असल्याचे त्यांनी सांगितले. रत्नागिरीतील पशुसंवर्धन दवाखान्याची इमारत उद्घाटनासाठी तयार आहे, असेही ते म्हणाले.

# भाऊसाहेब पोळ यांचा सेवापूर्ती



**। खरोशी । वार्ताहर ।**
सेवानिवृत्त प्राथमिक शिक्षक व कर्मचारी संघटना पेण तालुका यांच्याद्वारे पेण पंचायत समितीचे गटविकास अधिकारी भाऊसाहेब पोळ हे ३१ मे रोजी वयोमानानुसार सेवानिवृत्त होत असल्याने त्यांचा सेवापूर्ती समारंभ आयोजित करण्यात आला होता.

यावेळी सहाय्यक गटविकास अधिकारी सौ. कांबळे, विस्तार अधिकारी प्रसाद म्हात्रे, जिल्हा सेवानिवृत्त संघटनेचे सल्लागार प्र.शं. म्हात्रे, जिल्हाध्यक्ष अमरचंद पाटील, पेण तालुकाध्यक्ष रविकांत ठाकूर, माजी सरपंच रा.ह. पाटील, सुहास पाटील, स.रा. म्हात्रे, अध्यक्ष रामवाडी ज्येष्ठ नागरिक प.जा. म्हात्रे, वि.भा. ठाकूर, प्रदीप म्हात्रे, उज्वला निकम, सेवानिवृत्त केंद्रप्रमुख गणेश थवई, मंगेश म्हात्रे तसेच संघटनेचे सर्व पदाधिकारी मान्यवर उपस्थित होते.

# करिअर क्लासची उज्वल यशाची परंपरा कायम

**। खोपोली । प्रतिनिधी ।**
इयत्ता दहावीचा निकाल २७ मे ला जाहीर झाला आणि यात गेली दोन दशके आपल्या शैक्षणिक कार्याचा ठसा उमटवणाऱ्या खोपोलीतील करिअर कोचिंग क्लासने या शैक्षणिक संस्थेने दरवर्षी प्रमाणे यावर्षीही उज्वल यशाची परंपरा जपली. क्लासच्या दर्शील निकम याने ९६.२० टक्के गुण मिळवून सेमी इंग्रजी माध्यमात खालापूर तालुक्यातून सर्वप्रथम येण्याचा मान मिळवत यशाची परंपरा कायम ठेवल्याने करिअर कोचिंग क्लासचे संचालक डॉ. मुफद्दल सराचे कौतुक होत आहे.

तसेच, क्लासमधील जैनी ओसवाल हिने ९५.८० टक्के गुण मिळवले आणि शाळेतून दुसरा येण्याचा मान मिळवला. तर, सेमी इंग्रजी माध्यमातून आदित्य थिटे ९५.०० टक्के गुण मिळवून शाळेतून द्वितीय, सुजल पाटील याने ८९.८० टक्के गुण संपादन करून शाळेतून तृतीय क्रमांकाचे यश संपादन केले. विशेष म्हणजे करिअर क्लासमधून तब्बल २७ विद्यार्थ्यांनी ९० टक्के पेक्षा अधिक गुण मिळवून उत्तीर्ण झाले. १०७ विद्यार्थ्यांनी ७५%



टक्के पेक्षा अधिक गुण मिळवले असून १६८ विद्यार्थी प्रथम श्रेणी मध्ये पास झाले.

## शिवनगर येथे गावजत्रानिमित्त उरुस

**। रसायनी । वार्ताहर ।**
वासांबे आई व मरिआई ग्रामदेवता मोहोपाडा व शिवनगर गावजत्रा कार्यक्रम यावर्षी ७ ते ९ जून या कालावधीत होणार असून ग्रामदेवतांचा मानपानाचा कार्यक्रम व बाया पावण्याचा कार्यक्रम रविवार ९ जुन रोजी मोहोपाडा येथे पार पडणार आहे. यावर्षी गावजत्रा कार्यक्रमानिमित्ताने मोहोपाडा व शिवनगर ग्रामस्थांच्यावतीने मंदिर परिसरात सुशोभिकरण व मोहोपाठा मच्छी बाजाराजवळील मैदानावर तीन दिवसांसाठी उरुस भरविण्यात येणार आहे. या उरुसात लहानांसह तरुणासाठी आकर्षक पाळणे, खेळणी स्टॉल लावण्यात येणार आहेत. तरी मोहोपाडा गावजत्रेच्या या तीन दिवसीय कार्यक्रमाचा आनंद घ्यावा, असे मोहोपाडा शिवनगर ग्रामस्थांच्यावतीने आवाहन करण्यात आले आहे.

# नाईक महाविद्यालयात प्रवेश प्रक्रिया सुरु

**। कोर्लई । वार्ताहर ।**
मुरुडच्या वसंतराव नाईक महाविद्यालयात नवीन शैक्षणिक धोरणानुसार प्रथम वर्ष कला व वाणिज्य शाखेसाठी प्रवेश नोंदणी सुरू करण्यात आली असल्याची माहिती प्राचार्य डॉ.विश्वास चव्हाण यांनी दिली.

वसंतराव नाईक महाविद्यालयात इ.१२ वी उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक वर्ष २०२४-२५ या वर्गाची प्रवेश नोंदणी व प्रवेश प्रक्रिया ऑनलाईन पध्दतीने मुंबई विद्यापीठ परिपत्रकातील वेळापत्रकानुसार सुरु करण्यात आलेली आहे.

सर्व प्रवेश नोंदणी प्रक्रिया ऑनलाईन पध्दतीने होणार असून, विद्यार्थ्यांनी मुंबई विद्यापीठाच्या http://muugadmission. samarth.edu.in या वेबसाईटवर प्रथम वर्ष प्रवेशासाठी नोंदणी करणे अनिवार्य आहे याची नोंद घ्यावी तसेच ऑनलाईन भरलेले दोन्ही अर्ज सर्व कागदपत्रांसह १०/०६/२०२४ दुपारी १.०० वाजेपर्यंत महाविद्यालयात सादर करावयाचे आहे. अन्यथा आपला नोंदणी प्रवेश अर्ज ग्राह्य धरला जाणार नाही, असे सांगण्यात आले आहे. विद्यार्थ्यांना ऑनलाईन प्रवेश नोंदणी करताना काही तांत्रिक अडचणी आल्यास त्यांनी कार्यालयातील कर्मचाऱ्यांशी गणेश लाड ९४२३३७७२८७, अतिश आग्रावकर ८२३७२०८०५६, श्रद्धा उमरोटकर ९१३०६८५३७३ यांच्याशी संपर्क साधावा, असे प्रा. डॉ. विश्वास चव्हाण यांनी कळविले आहे.

पान १ वरुन

## राज्यात इंडिया आघाडीच

महाराष्ट्रातील आकडेवारी जाहीर केली आहे. महायुतीला राज्यात जबर फटका बसणार हे एक्झिट पोलचे आकडे सांगत आहे. यात प्रस्थापितांना जनतेने धोबीपछाड दिल्याचंही अंदाज व्यक्त होत आहे. दरम्यान, सर्वाधिक लक्ष शिंदेंची शिवसेना आणि ठाकरे गटाकडे लागून होतं. पण, एक्झिट पोलमध्ये शिंदेंच्या शिवसेनेला फटका बसणार असं चित्र दिसत आहे. तर, अजित पवार गटाला भोपळासुद्धा फोडता आलेला नाही. मात्र, राज्याच्या राजकारणात गेल्या दोन वर्षात बरीच उलथापालथ झाली. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उद्धव ठाकरे यांच्याभोवती राजकारण फिरत होतं. उद्धव ठाकरे यांना मशाल या चिन्हावर निवडणूक लढवावी लागली होती. त्यामुळे उद्धव ठाकरे गटाला किती जागा मिळतील याची उत्सुकता होती. एक्झिट पोलचा अंदाज धक्का देणारा आहे. शिंदेंच्या शिवसेनेला फक्त ४ जागा मिळतील. तर ठाकरे गटाला १४ जागा मिळतील असं दिसत आहे. त्यामुळे उद्धव ठाकरे हे एकनाथ शिंदेवर भारी पडतील असं दिसत आहे.

### एक्झिट पोलनुसार आघाडीवर

**,उत्तर पश्चिम मुंबई : अमोल किर्तीकर, ठाकरे गट,उत्तर मुंबई : पियूष गोयाल, भाजपा, शिरूर : अमोल कोल्हे, शरद पवार गट**

**यवतमाळ : संजय देशमुख, अकोला : अनूप धोत्रे, भाजप**

## पोलादपुरात जमिनीला भेगा

नागरिकांना अतिवृष्टीच्या काळात करंजे गावातील शाळेत तसेच समाज मंदिरात स्थलांतरित करण्याच्या सूचना तसेच त्यांच्या राहण्याची जेवणाची व अन्य सुविधा पोहोचविण्याबाबत निर्देश दिले आहेत. यासंदर्भात तहसीलदार घोरपडे यांनी गटविकास अधिकारी दीप्ती गाट यांना सूचना दिल्या असून, बांधकाम उपविभाग पोलादपूर कार्यालयाला परिस्थितीची पडताळणी करण्यासंदर्भात आदेश दिले आहेत.

पोलादपूर तालुक्यातील यापूर्वीच्या प्रत्येक अतिवृष्टी व भूस्खलनाच्या घटनांपूर्वी तालुक्यात कुठल्या ना कुठल्या गावात मोठया लांबीच्या आणि सुमारे एक फूट रूंदीच्या भेगा पडल्याचे ग्रामस्थांचे म्हणणे असून संभाव्य नैसर्गिक आपत्तीची ही पूर्वसूचना किंवा नैसर्गिक संकेत असल्याचे ग्रामस्थांचे म्हणणे आहे. आगामी पावसाळयात अतिवृष्टी दरम्यान कोणतीही नैसर्गिक आपत्ती उद्भवल्यास प्रशासन सज्ज असून आपत्ती दरम्यान जनतेनेदेखील प्रशासनास सहकार्य करावे असे आवाहन तहसीलदार घोरपडे यांनी यावेळी केले.

## 'पदोन्नती हा अधिकार नाही'

कायदेमंडळ किंवा कार्यकारिणी ठरवू शकते, असेही न्यायालयाने याबाबत निकाल देताना म्हटले आहे.

न्या. जेबी पारडीवाला आणि न्या. मनोज मिश्रा यांचा समावेश असलेल्या सरन्यायाधीश डीवाय चंद्रचूड यांच्या नेतृत्वाखालील खंडपीठाने हा निकाल दिला आहे. भारतातील कोणताही सरकारी कर्मचारी पदोन्नती हा त्याचा अधिकार असल्याचे सांगू शकत नाही, कारण संविधानात पदोन्नतीबाबत कोणताही उल्लेख नाही. खंडपीठाने पुढे म्हटले की, कायदेमंडळ किंवा मंत्रिमंडळ पदोन्नतीच्या जागा भरण्यासाठी निकष आणि त्यासंबंधीची प्रक्रिया ठरवू शकतात. नोकरीचे स्वरुप आणि उमेदवाराचे काम यावर पदोन्नतीच्या पदांवर रिक्त जागा भरण्यासाठीची नियमावली केली जाऊ शकते. तसेच पदोन्नतीसाठी स्वीकारलेले धोरण हे सक्षम उमेदवारासाठी योग्य आहे किंवा नाही, याचे पुनरावलोकन न्यायालय करू शकत नाही.

गुजरातमधील जिल्हा न्यायाधीशांचा निवडीवरून पदोन्नतीचा वाद सुरू झाला. हा वाद सर्वोच्च न्यायालयात पोहोचला असताना खंडपीठाने यावर टिप्पणी केली. सर्वोच्च न्यायालयाच्या या निकालामुळे सरकारी विभागातील पदोन्नतीशी संबंधित अनेक विषयात स्पष्टता मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. अनेक ठिकाणी पदोन्नतीच्या विषयावरून सरकारी कर्मचारी न्यायालयात जात असतात. पदोन्नतीसंदर्भात याआधीही अनेक प्रकरणात सर्वोच्च न्यायालयात सुनावणी झालेली आहे. पदोन्नतीमध्ये आरक्षण मिळण्याबाबतचे प्रकरणही सर्वोच्च न्यायालयात पोहोचले होते. पदोन्नतीमध्ये आरक्षण देण्यास राज्ये बांधील नाहीत आणि पदोन्नतीमध्ये आरक्षणाचा दावा करण्याचा कोणताही मूलभूत अधिकार नाही, असे सर्वोच्च न्यायालयाने स्पष्ट केले होते.

## मनुस्मृती शिकवून गुलाम निर्माण होतील

व्यवस्था टिकवून ठेवण्यासाठी ते आयुष्यभर प्रयत्न करतील. मनुस्मृती पाठ्यपुस्तकात लागू केली जाते, कारण मनुस्मृतीचे समर्थक या देशात तयार होतील. डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणायचे की, गुलामाला गुलामीची जाणीव करून द्या म्हणजे ते बंड करून उठतील. आज मनुस्मृती लागू करून मनुस्मृतीचे समर्थक वाढवले जातात, आता धर्माधिष्टीत शिक्षण लहानपणापासूनच गुलामी एन्जॉय करणारी पिढी निर्माण करण्याचा हा प्रयत्न आहे. पूर्वीच्या शैक्षणिक क्षेत्रात आयएएस, आयपीएस, डॉक्टर, इंजिनिअर, वकील बाहेर पडायचे, आत्ताच्या शिक्षण प्रणालीतून आरएसएसचे कार्यकर्ते बाहेर पडतील. या कार्यक्रमास रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाचे कर्जत तालुकाध्यक्ष हिरामण गायकवाड, जीवन गायकवाड, किशोर गायकवाड, अंकुश सुरवसे, विजय गायकवाड, गणेश कांबळे, अशोक गायकवाड, अलकाताई सोनवणे, सुरेखा कांबळे, नितीन सोनावणे, जगदीश शिंदे, निलेश गायकवाड, अक्षता गायकवाड, अध्यक्ष शैलेश पवार, दौलत ब्राम्हणे, के.के. गाडे, मनोहर ढोले, उमेश गायकवाड, सचिन भालेराव, सचिन गायकवाड, सुनील गायकवाड, गणपत गायकवाड, विश्वनाथ बडेकर आदींसह उत्सव कमिटीचे सर्व पदाधिकारी, भीम अनुयायी, बहुजन बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## पर्यटनाचा शेवटचा हंगाम


त्यामुळे शालेय खरेदीची लगबग सुरु होणार असल्याने पर्यटक रविवारपासून त्यांच्या निश्चितस्थळी निघणार आहेत. काही पर्यटक एसटी बसने, तर काही खासगी वाहनाने निघणार आहेत.

# ठकुबाई खारपाटील स्कूलचा शंभर टक्के निकाल

## तेजस गव्हाणकर ८७ टक्के मिळवून प्रथम

**। चिरनेर । प्रतिनिधी ।**
महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या वतीने घेण्यात आलेल्या इयत्ता दहावी शालांत परीक्षेचा निकाल सोमवारी, २७ मे रोजी ऑनलाईन पद्धतीने दुपारी एक वाजता जाहीर झाला. यात उरण तालुक्यातील आवरे येथील रामचंद्र म्हात्रे व विद्यालय पी.पी. खारपाटील एज्युकेशन सोसायटीच्या ठकूबाई परशुराम खारपाटील इंग्रजी माध्यम स्कूलच्या दहावी माध्यमिक शाळेचा निकाल १०० टक्के लागला आहे.

दहावीच्या परीक्षेसाठी या विद्यालयातून एकूण ३८ विद्यार्थी प्रविष्ट झाले होते. ३८ विद्यार्थ्यांपैकी ३८ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत.



यात तेजस गणेश गव्हाणकर याने ८७ टक्के गुण मिळवून विद्यालयात पहिला आला. रोहित हरेश भोईर याने ८६ टक्के मिळवत द्वितीय, तर प्रथमेश मधुकर फोफेरकर ८३ टक्के मिळवत तृतीय आला. तर, अदिती भारत पाटील ८१.२० टक्के मिळवत चौथी, प्रीती दयाशंकर जैस्वाल ८०.२० टक्के मिळवून पाचवी आली.

यशस्वी विद्यार्थ्यांचे शाळेचे संस्थापक अध्यक्ष पी.पी. खारपाटील, उपाध्यक्ष राजेंद्र खारपाटील, व्यवस्थापिका अर्चना ठाकूर, खजिनदार समीर खारपाटील, सचिव सागर खारपाटील, इंग्रजी माध्यमाच्या मुख्याध्यापिका सुप्रिया म्हात्रे, प्रशासकीय अधिकारी व्ही.ए. पाटील, मुख्याध्यापिका मंदा घरत, मुख्याध्यापिका स्मिता मसुरकर, प्रा. सुरदास राऊत, पर्यवेक्षक आनंद चिर्लेकर तसेच शिक्षक, पालक व ग्रामस्थांनी अभिनंदन केले आहे.

निवडक

## अपघातात एकाचा मृत्यू

**पनवेल :** आयशर टेम्पोच्या धडकेत जगदंबा इंद्रजीत यादव यांचा मृत्यू झाला. या प्रकरणी तळोजा पोलीस ठाण्यात टेम्पो चालकाविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला.जगदंबा यादव हे नावडा फाटा येथे राहत असून मिठाई घेऊन तळोजा एमआयडीसी परिसरात विक्री करण्यासाठी गेले होते. नावडा फाटा ते कल्याण रोड येथे जगदंबा यांच्या मोटरसायकलला टेम्पोने धडक दिली. यात ते जखमी झाले. त्यांना उपजिल्हा रुग्णालय, पनवेल येथे दाखल करण्यात आले. डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले.

## जिपची दुचाकीला धडक

**पनवेल :** जिपने मोटरसायकलला धडक दिल्याने १ जण जखमी झाला.चालकाविरोधात कळंबोली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. शहाजी शंकर पाटील हे सेक्टर २७, तळोजा फेस टू येथे राहत असून ते बृहन्मुंबई महानगरपालिका येथे सफाई कामगार माळी म्हणून काम करतात. ते स्कुटी क्रमांक घेऊन तळोजा येथे राहते घरी येत होते. कामोठे ब्रिज खालून कळंबोलीकडे येत असताना पुण्याच्या दिशेने जाणाऱ्या पिकअप गाडीने त्यांच्या मोटरसायकलला धडक दिली. यात ते खाली पडले व त्यात जखमी झाले.

## पंधरा वर्षीय मुलीचे अपहरण

**पनवेल :** पनवेल शहरानजिकच्या कोन गावातील पंधरा वर्षीय मुलीचे अपहरण केल्याप्रकरणी पनवेल तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. पंधरा वर्षीय तरुणी पनवेल शहरानजिकच्या कोन गाव येथे राहण्यास असून ती सार्वजनिक नळावर पाणी आणण्यासाठी गेली. नंतर ती ती घरी आली नाही. यामंळे आजूबाजूला परिसरात तिचा शोध घेतला मात्र ती सापडून आली नाही. अज्ञात इसमाने तिला पळवून नेले अशी तक्रार पंधरा वर्षीय तरुणीच्या नातेवाईकांनी केली आहे.

## चोरटे सीसीटीव्हीत कैद

**पनवेल :** पनवेल तालुक्यातील नेरे महालक्ष्मी नगर येथे चार ते पाच चोरटे एका इमारतीमध्ये सावधरित्या शिरताना कॅमेरात कैद झाले आहेत. हे चोरटे हलक्या पावलांनी महालक्ष्मीनगरमधील बिल्डिंगमध्ये चोरी करण्यासाठी जात असताना दिसून येत आहेत. या चोरट्यांकडे शस्त्र असल्याचे दिसून आले आहे. बंद घराच्या कडीकोयंडा तोडण्यासाठी व तिजोरी फोडण्यासाठी लागणारी हत्यारे त्यांच्याकडे दिसून येत आहेत. वाढत्या चोरीच्या घटनांमुळे नागरिक त्रस्त झाले आहेत.

## मॉलमध्ये रक्तदान शिबीर

**पनवेल :** कुडाळदेशकर आद्य गौड ब्राह्मण समाज आणि ओरायन मॉल यांच्या संयुक्त विद्यमाने एमजीएम हॉस्पिटलच्या सहकार्याने रविवारी (दि.२)सकाळी ९ ते ३ वाजे पर्यंत रक्तदान शिबीर आयोजीत करण्यात आले आहे. गेले तीन महिने असलेला उन्हाळा व निवडणुकीची आचारसंहिता यामुळे सर्वत्र रक्ताचा तुटवडा लक्ष्यात घेऊन सामाजिक उपक्रमांतर्गत हे शिबीर आयोजीत करण्यात आले आहे. रक्तदान शिबिरास पनवेल परीसरातील नागरिकांनी प्रतिसाद द्यावा, असे आवाहन केले आहे.

# उद्योगांमुळे विकास धुसर

**। रसायनी । राकेश खराडे ।**

**परिसरात एखादा मोठा कारखाना, प्रकल्प येतो तेव्हा तेथे विकासाची गंगा वाहू लागते असे म्हणतात किंवा तसे चित्र तरी उभे केले जाते. रसायनी भागात १९६२ च्या सुमारास एचओसी हा कारखाना आला तेव्हा सोन्याचा धूर निघणार असे चित्र उभे राहिले. पुढे कारखाने वाढत गेले. लोकवस्ती वाढली. परंतु, मुलभूत सुविधा धडपणे मिळालेल्या नसल्याने कारखानदारीमुळे विकास झाला असे म्हणणे काहीसे धाडसाचे ठरेल. या परिसरात कोट्यवधींची उड्डाणे सुरू असताना रस्ते, पाणी, वीज या आघाड्यांवर आनंदी आनंद आहे.**



रसायनी हे एखाद्या गावाचे नाव नाही तर तो एक विभाग आहे. एचओसीचा रासायनिक कारखाना आल्यानंतर या भागाला रसायनी असे नाव पडले. एकेकाळी हा विभाग मागासलेला होता. जंगलपट्ट्याने वेढलेला होता. भातशेती हेच उत्पन्नाचे साधन, तर बैलगाडी हे वाहतुकीचे साधन. चोरांप्रमाणे जंगली श्वापदांचे कायम भय या भागात असे. परंतु मागास विभागाचा विकास करण्याच्या तत्कालीन केंद्रातील काँग्रेस सरकारच्या धोरणानुसार महाकाय एचओसी कारखाना आला. त्यासाठी १४ गावांची जमीन संपादन केली. पंधराशे एकर जमीन संपादन केली. कालांतराने यातील काही जमीन एमआयडीसीकडे वर्ग झाली. जेथून सोन्याचा धूर निघणार असे सांगितले गेले, मात्र तेथील प्रकल्पग्रस्तांचे प्रश्न आजही प्रलंबित आहेत. पुढे हा कारखाना डबघाईला गेल्याने त्याची जागा केंद्र सरकारच्या बीपीसीएलकडे गेली. तेथे इस्त्रोनेही आपला प्रकल्प सुरू केला आहे. आता एचओसीनंतर नेमका कुणाचा विकास झाला हा संशोधनाचा विषय आहे.

पुढे रसायनीच्या परिसरांतून रिलायन्स, बॉम्बे डाईंग, ओके, सिप्ला, सियाराम असे विख्यात प्रकल्प सुरू झाले. यापैकी काही आजही सुरू आहेत. पाताळगंगा नदीमुळे पाण्याची कमतरता पडली नाही. तसे शेजारच्या टाटा पॉवरमुळे विजेचीही कमतरता पडली नाही. २०१५ मध्ये एमआयडीसीचे कार्यक्षेत्र विस्तारले गेले. तेथे २०० कारखान्यांना परवानगी मिळाली, त्यापैकी १०० हून अधिक कारखाने सुरू झाले. या भागातील कारखानदारी येण्यासाठी माजी मुख्यमंत्री बॅ. अ. र. अंतुले यांचे मोठे योगदान आहे. अलिकडे सेबीची एनआयएसएम ही शेअर बाजाराची शास्त्रोक्त माहिती देणारी आंतरराष्ट्रीय संस्था अस्तित्वात आली. कारखान्यांच्या निवासी वसाहती तयार झाल्या. बाहेरून आलेल्यांच्या काळजीपोटी टोलेजंग इमारती उभ्या राहिल्या. असे सारे काही होत असताना रसायनी परिसराला मुलभूत सुविधांची कमतरता पडायला नको. दुर्दैवाने तसे नसल्याने विकास म्हणतात तो हाच का, असा उपरोधिक सवाल विचारला जात आहे.

या विभागाची लोकसंख्या वाढत गेल्याने मोहोपाडा, वडगाव, गुळसुदे, चांभाली, तुराडे, जुनी पोसरी, वावेघर, सावले, देवळोली ग्रामपंचायत अस्तित्वात आल्या. यातील वासांबे-मोहोपाडा ही सर्वात मोठी ग्रामपंचायत असून, लोकसंख्या ५५ हजारांहून अधिक आहे. रसायनी-पाताळगंगा परिसरातील नागरिकांची लोकसंख्या तीन लाखापेक्षा अधिक आहे. शासनाच्या कागदी घोडे नाचविण्याच्या कार्यपद्धतीमुळे रसायनी भागाला साथी नगर पंचायतही होत नाही. खरे तर उपरोक्त ग्रामपंचायतीची नगर पालिका अस्तित्त्वात येणे अपेक्षित आहे. परंतु, ग्रामपंचायतींकडेच कारभार असल्याने विकासाला मर्यादा येत असून, उत्पन्नही मर्यादित आहे. त्यामुळे अनेकदा मदतीसाठी जिल्हा परिषदेचार अवलंबून रहावे लागत आहे. कारखानदारीमुळे बेरोजगरांना रोजगार मिळत असला तरी काही गावे, वस्त्यांतून पाणी, रस्ते या सुविधांपासून वंचित आहेत. कारखानदारी भूमिपुत्रांच्या छाताडावर आणून बसवायची, मात्र यातून होणाऱ्या विकासाची फळे दुसऱ्याऱ्यांनी चाखायची हा अनुभव इतरत्रप्रमाणे येथेही आला आहे. राजकीय नेतेमंडळी यात कुठे तरी कमी पडत आहेत. वस्ती वाढली म्हणून अतिक्रमणे वाढली. ती हटत नाहीत. याचा ताण नागरी सुविधांवर येतो आहे.

# मच्छिमार बोटींवर सीसीटीव्ही बसवा; कोळी बांधवांची मागणी

**। उरण । वार्ताहर ।**



पावसाळी मासेमारीस बंदी असतानाही उरणमध्ये मत्स्यव्यवसाय अधिकारी वर्गाच्या आर्थिक हितसबंधातून मोठ्या प्रमाणात मासेमारी सुरू असते. याबाबत वरिष्ठांकडे लेखी तक्रारी करूनही अधिकारी वर्ग आर्थिक हितसबंधातून याकडे दुर्लक्ष करीत असल्याचे दिसते. त्यामुळे बंदी काळात मासेमारी जोरात सुरू असते. हे टाळण्यासाठी मच्छीमार बोटींवर सीसीटीव्ही कॅमेरे बसविले तर नक्कीच त्याचा फायदा पावसाळी बंदी काळात होईल असा विश्वास पारंपरिक मच्छिमार बाधवांकडून व्यक्त केला जात आहे.

पर्ससेनेट मासेमारीस बंदी असतानाही आजतागायत पर्ससेनेट मासेमारी उरण परिसरात जोरात सुरू आहे. उरणमधील करंजा व मोरा बंदरात नांगरून उभ्या असलेल्या बोटींवर पर्ससेनेटसाठी लागणारे साहित्य अधिकारी वर्गाच्या निदर्शनास येऊनही ते याकडे आर्थिक लालसेपोटी दुर्लक्ष करीत आहेत. फक्त कागदावरच हे अधिकारी वर्ग पर्ससेनेट व पावसाळी मासेमारीस बंदी असल्याचे उपदेशाचे डोस देण्याचे काम करीत असल्याचे चित्र पहावयास मिळते.

१ जून पासून माशांचा प्रजनन काळ असल्याने मासेमारीस बंदी असते. ही बंदी फक्त दाखविण्यासाठीच असते, प्रत्यक्षात बंदीच्या काळातच मासेमारी जोरात सुरू असल्याचे चित्र उरण परिसरातील करंजा व मोरा बंदरात प्रामुख्याने पहावयास मिळते. यामध्ये करंजा, मोरा येथील नामांकित मच्छिमार संस्थेचे चेअरमन व इतर पदाधिकारी यांच्याच बोटी प्रामुख्याने मासेमारी करून हेच पदाधिकारी बाजारात मासळी विक्री करीत असतात.

पावसाळी मासेमारी सुरू असल्याची लेखी तक्रार मत्स्यविभाग आयुक्त अतुल पाटणे यांच्याकडे करूनही त्यांनी कोणतीही कारवाई आजतागायत केलेली नाही.

उरणमधील मत्स्यविभाग अधिकारी, अलिबाग मत्स्यविभाग अधिकारी हेही याकडे दुर्लक्ष करीत असल्याचे दिसते. यावरून त्यांचे आर्थिक हितसंबध असल्याचे उघड होत आहे. पावसाळी माशांचा प्रजनन काळ असल्याने मासेमारीस बंदी असते, परंतु ही बंदी फक्त कागदोपत्री असते प्रत्यक्षात धनदांडगे मच्छीमार बांधव व मत्स्यविभाग अधिकारी यांचे आर्थिक साटेलोट असल्यामुळेच उरणमध्ये पावसाळी मासेमारी व बाराही महिने पर्ससेनेट मासेमारी सुरू असल्याचे चित्र उरणमध्ये असल्याची चर्चा आहे.

# माथेरान शटलसाठी ऑनलाईन आरक्षण सुरू करा

## पर्यटकांची मागणी

**। माथेरान । वार्ताहर ।**

माथेरान पर्यटनस्थळाची अस्मिता समजली जाणारी माथेरानची राणी अर्थात मिनिट्रेन शटल सेवा सुरळीत सुरू असून विकेंडला सर्व फेऱ्या पर्यटकांनी पूर्ण क्षमतेने भरून जात आहेत. पर्यटक संख्या जास्त आणि शटलच्या फेऱ्या कमी यामुळे मिनिट्रेनसाठी येणारे हौशी पर्यटकांना मिनीट्रेनचा आनंद घेता येत नसल्याने त्यांचा पुरता हिरमोड होत आहे.

शटल सेवेचे आरक्षण असते तर आमची माथेरान ट्रिप समाधानी झाली असती असे पर्यटकांचे म्हणणे असून आगामी काळात मिनीट्रेन शटल सेवेसाठी आरक्षण खिडकी सुरू करावी अशी मागणी पर्यटक प्रवाशांकडून होत आहे.



मुंबई-पुण्यापासून अगदी जवळ असल्याने माथेरान पर्यटनस्थळाकडे पर्यटकांचा कल वाढू लागला आहे. पर्यटकांचा राबता पाहता येथील अमन लॉज स्टेशन ते माथेरान स्टेशन दरम्यान शटल सेवेच्या अप व डाऊन मिळून दिवसातून सोळा फेऱ्या होत आहेत.

उन्हाळी हंगामात येथे पर्यटक संख्या जास्त असल्यामुळे काही पर्यटकांना तिकीट न मिळाल्यामुळे मिनीट्रेनचा आनंद घेता आला नाही.त्यामुळे नाराज पर्यटकांनी ऑनलाइन आरक्षण सुरू करण्याची मागणी केली आहे.

> परिवारातील बच्चे कंपनीला मिनीट्रेनची सफर करायची होती. सकाळी माथेरान गाठले. पण तिकिटासाठी खूप मोठी रांग होती. रांगेत उभे राहूनही आम्हाला तिकीट मिळाले नाही आणि मुले निराश झाली. या मिनीट्रेनचे आकर्षण लहान मुलांना जास्त असल्याने ते हट्ट धरून बसले पण नाईलाज झाल्याने आम्हाला माघारी फिरावे लागले. जर ऑनलाईन आरक्षण असते तर आम्ही ते आरक्षित करून मिनीट्रेनचा आनंद मुलांना नक्कीच दिला असता.
> –राजन चक्रवर्ती, पर्यटक, मुंबई

# साई संस्थेच्या शाळांचा निकाल १०० टक्के

**उरण :** रायगड जिल्ह्यात शैक्षणिक क्षेत्रात अग्रेसर गणल्या जाणाऱ्या साई संस्थेच्या श्रद्धा इंग्लिश मिडियम स्कूलने आपली २८ वर्षाची परंपरा कायम ठेवली. २०२३-२०२४ सालच्या इयत्ता १०वीचा शालांत परीक्षेचा निकाल १०० टक्के लागला. ठाणे जिल्ह्यातील डोंबिवलीमधील व्हिक्टोरिया एज्युकेयर या मराठी, इंग्रजी व गुजराथी माध्यमाच्या विद्यालयाचा निकाल १०० टक्के लागला. श्रद्धा इंग्लिश मिडियम स्कूलमधील शंकर ढेपे ९२.४० टक्के, आयशा बंदरकर-९१.६० टक्के, निधी जावीर ९१.४० टक्के व मानस सुर्वे ९१.०० टक्के गुण मिळविले. व्हिक्टोरिया एज्युकेयर या विद्यालयातील विद्यार्थी सेजल सोनार ८६.६० टक्के गुण मिळवून विद्यालयात प्रथम तर व्दितीय क्रमांकावर ८५.६० टक्के गुण मिळवून साक्षी सुनील शिंदे आणि तृतीय क्रमांकावर ८४.६० टक्के गुण मिळवून विश्वजित सुपलेपाटील उत्तीर्ण झाला आहे.



# प्रवाशांना गुलाब पुष्प देऊन वर्धापन दिन साजरा

## अलिबाग आगाराचा नाविन्यपूर्ण उपक्रम

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाचा वर्धापन दिन शनिवारी (दि. ०१) अलिबाग एसटी बस आगारात साजरा करण्यात आला. या निमित्ताने प्रवाशांना गुलाब पुष्प देऊन एक आगळा वेगळया पध्दतीने हा सोहळा साजरा केला.

अलिबाग एसटी बस आगारात सकाळी रांगोळी काढण्यात आली. त्यानंतर एसटी बसला फुलांनी सजविण्यात आले.एसटी बसची पूजा करण्यात आली. ठिकठिकाणी फुलांच्या माळा लावून परिसर सुशोभीत केले. त्यानंतर अलिबाग आगार व्यवस्थापक अजय वनारसे यांच्या हस्ते केक कापून वर्धापन दिन साजरा केला. यावेळी एसटीतील वाहतूक निरीक्षक, कार्यशाळा विभागाचे अधिकारी कर्मचारी, चालक, वाहक व महिला कर्मचारी उपस्थित होते.

ग्रामीण भागातील प्रत्येक घटकाला एसटीने सेवा दिली आहे. त्यामध्ये अधिकाऱ्यांसह चालक, वाहक, मॅकेनिक यांची महत्वाची भुमिका ठरली आहे. त्यामुळे स्पर्धेच्या युगात आजही एसटी बसला प्रचंड मागणी आहे. शाळकरी, महाविद्यालयीन विद्यार्थ्यांपासून ज्येष्ठ नागरिक, महिला अशा सर्वच क्षेत्रातील मंडळी एसटीतून प्रवास करीत आहेत. त्यामुळे अलिबाग एसटी बस आगारामार्फत करण्यात आलेल्या कार्यक्रमाला अनेकांनी शुभेच्छा देत एसटीच्या कार्याची माहिती दिली.

अलिबाग आगारासह स्थानकात कर्मचाऱ्यांकडून पेढे देखील वाटण्यात आले. वर्धापनदिनानिमित्त देण्यात आलेल्या गोड पदार्थ खाण्याचा आनंद प्रवाशांनी घेतला. स्थानकातील अनेक गाड्या फुलांनी सजल्याने एक उत्साह यानिमित्ताने प्रत्येकाच्या चेहऱ्यावर पहावयास मिळाला.

# अहिल्याबाई होळकर जयंती साजरी

**माथेरान :** राजमाता महाराणी अहिल्याबाई होळकर यांना त्यांच्या जयंतीनिमित्त त्यांनी केलेल्या अमूल्य कार्यास विनम्र अभिवादन करण्यासाठी येथील इंदिरा गांधी नगरातील समाजमंदिर येथे पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांच्या पुतळ्याला धनगर समाजाच्या वतीने पुष्पहार अर्पण केला. त्यानंतर मुख्य रस्त्यावरील अहिल्याबाई होळकर चौकातील नामफलकास धनगर समाज अध्यक्ष दीपेश ढेबे, शैलेश ढेबे यांनी पुष्पहार अर्पण केला. यावेळी धनगर समाजाचे माजी अध्यक्ष राकेश कोकळे, रायगड जिल्हा धनगर समाज अध्यक्ष संतोष आखाडे, तुकाराम आखाडे, ज्येष्ठ सदस्य विठ्ठल ढेबे, सुरेश झोरे, यांसह गावातील अन्य प्रतिष्ठित मंडळी उपस्थित होते.

# उड्डाणपुलाच्या ड्रेनेजच्या दुरुस्तीला प्रारंभ

**पनवेल :** राजकीय अनास्थेच्या साठमारीत अडकलेला साडेतीन किलोमीटर अंतराच्या उड्डाणपुलाला सुरुवातीपासूनच ग्रहण लागले आहे. ते अद्याप सुटताना दिसत नाही. ड्रेनेजचे पाईप फुटल्याने पावसाळ्यात अपघाताच्या धोक्यासोबत दुचाकीस्वारांवर जलाभिषेक होतो. अनेक संकटांचा सामना करत उड्डाणपूल निमूटपणे अत्याचार सहन करित आहे.

अपूर्ण कामामुळे त्याची लया गेली आहे. डांबरीकरण उखडल्याने अपघाताचे प्रमाण वाढले आहे. झेब्रा क्रॉस आणि रंगीत पट्टे, दिशादर्शक फलक नसल्याने वाहन चालकांना चकवा बसतो. शिवाय गेल्या दोन तीन वर्षांपासून उड्डाणपुलाची ड्रेनेज वाहिनी फुटल्याने अनेकदा बाका प्रसंग उद्भवला होता. पावसाळ्यात वरून धबधब्यासारखे अचानक पाण्याचे लोट कोसळून दुचाकीस्वार अपघातग्रस्त झाले आहेत.

वाहनांच्या काचावरही पावसाचा अचानक मारा झाल्याने दचकून चालकांकडून अपघात होत होते. त्यामुळे या घटना अतिशय चिंतेच्या होत्या. पनवेल संघर्ष समितीने मान्सून पूर्व कामांचा सातत्याने पाठपुरावा करून अधिकाऱ्यांकडून ही सर्व कामे मार्गी लावून घेतली आहेत.




● अलिबाग - रोहा मार्गावर कुरळ ते बेलकडेदरम्यान रस्त्यालगत दुतर्फा गुलमोहराची झाडे लाल फुलांनी बहरली आहेत. (छायाचित्र- समीर मालोदे)

# कौलारू घरे नामशेष होण्याच्या मार्गावर

**। पाताळगंगा । प्रतिनिधी ।**

पावसाचे आगमन होण्याच्या आधी खेडेगावात वेध लागायचे ते घरावरती असलेले छप्पर व्यवस्थित करण्याचे. यासाठी प्रत्येकाची धडपड सुरु असायची. ग्रामीण भागात मोठ्या प्रमाणात कौलारू घरे असल्यामुळे ती कौलेसारखी करण्यासाठी प्रत्येकाची लगबग असायची. परंतु, बदलत्या काळात कौलारू घरे नामशेष होण्याच्या मार्गावर असल्याने प्रत्येक व्यक्ती घर बांधताना कौल न वापरता सिमेंटच्या पत्राचा उपयोग करीत आहे. यामुळे मातीची कौल इतिहास जमा होत चालली आहे.

आजही शहरासह खेडेगावही बदलत चालले आहे. सिमेंटच्या जंगलांनी घरे व्यापली जात आहेत. खेड्यातील कौलारू घरासह इतरही अनेक बदल होताना आज आपणस पहावयास मिळत आहे. दरवर्षी पावसाळा सुरू होण्याआधीच कौलारू घरांची डागडुगी करणे गरजेचे, असे यालाच घर फेरणे असे म्हणतात.कौलारू घरे उन्हाळ्यातही गरम होत नाही. ती आरोग्याच्या दृष्टीने अत्यंत उपयोगी असायची. मातीची कौले ही उन्हाचा जाळ स्वत: शोषून ते आपल्या शरीरापर्यंत नैसर्गिक गारवा पोहोचवतात . ए.सी. किंवा कुलरची हवा नैसर्गिक नसल्याने एका मर्यादेनंतर त्यांचे दुष्परिणाम शरीरावर निश्चितच होताना पहावयास मिळत आहे.

# जहांगीर आर्ट गॅलरीत पारंपरिक चित्रांचा ‘सोहळा’

**। रायगड । प्रतिनिधी ।**

**राष्ट्रीय आंतरराष्ट्रीय पुरस्काराने सन्मानित प्रसिद्ध चित्रकार दिपक रमेश पाटील यांचे सोहळा शीर्षकाखाली पाचवे एकल प्रदर्शन जहांगीर आर्ट गॅलरी मुंबई येथे ४ जून ते १० जून या कालावधीमध्ये संपन्न होत आहे. हे चित्रप्रदर्शन सर्वांना सकाळी दहा ते संध्याकाळी सात वाजेपर्यंत जहांगीर आर्ट गॅलरी, मुंबई येथे पाहता येईल. सर्व कला रसिकांनी दीपक पाटील यांच्या मनमोहक चित्रांचा जरूर आस्वाद घ्यावा. असे आवाहन करण्यात आले आहे.**

## ४ जूनपासून प्रदर्शन

सांस्कृतिक दृष्ट्या वैविध्यपूर्ण असलेल्या आपल्या देशात अनेक सण, उत्सव, समारंभ अतिशय आनंदाने आणि पारंपरिक पद्धतीने साजरे केले जातात. यातून आपल्या भारतीय संस्कृतीचे दर्शन होत असते. समाजाची एक संघता टिकवण्यासाठी सण-उत्सव, लग्न-कार्य या अशा कार्यक्रमांची आवश्यकता असते. लोकांमध्ये एकोपा वाढावा, माणुसकी जिवंत राहावी, नात्यातील गोडवा वाढावा, हा या सणांचा उद्देश असतो. पूर्वी घराघरांमध्ये लहान मोठ्यांचा गोतावळा असे कुटुंबातील सदस्य, नातेवाईक, शेजारी-पाजारी असे सर्वजण सणावाराला शुभकार्यात एकत्रित यायचे सोहळे साजरे करायचे. दीपक पाटील यांनी त्यांच्या चित्रांमधून बालपणाच्या आठवणींना उजाळा दिला आहे.





आताच्या काळात विभक्त कुटुंब पद्धती दिसून येते यामुळे कुटुंबे जरी छोटी झाली तरीही प्रत्येक दिवसच खास दिवस म्हणून साजरा केला जातो. याचे कारण असे आहे की रोजच्या धकाधकीच्या जीवनात माणसाला नवचैतन्य मिळावे तो पुन्हा नव्या जोमाने कामाला उद्युक्त होईल. जितके उत्सव जास्त असतील तितकी समाजाला प्रगती होण्याची संधी मिळते. सण उत्सव नसतील तर मानवी समाजजीवन रूक्ष व बेचव होईल. हाच धागा पकडून दीपक पाटील यांनी या शीर्षकाखालील प्रदर्शनात चित्र विषय निवडले आहेत.

या चित्र विषयांमध्ये काही चित्रे धार्मिक सोहळे, कौटुंबिक सोहळे या विषयांवर चित्रित केलेले आहेत. तर काही चित्रांमध्ये कुटुंबातील सदस्यांचे गमती-जमतीचे क्षण चित्रीत केले आहेत. दीपक पाटील यांच्यासाठी सर्व कुटुंबाने एकत्र येऊन केलेली प्रत्येक गोष्ट सोहळा आहे. असे सुंदर क्षण सर्वांच्या आयुष्यात यावे, सर्वांनी असे सोहळे साजरे करावे असे त्यांना नेहमीच वाटते. म्हणून त्यांनी या चित्र प्रदर्शनास सोहळा असे नाव दिले आहे.

दीपक पाटील त्यांची चित्रे वास्तववादी पद्धतीने साकारतात. त्यांच्या चित्र विषयांमधून भारतीय संस्कृती आणि परंपरेचे दर्शन होते. त्यांच्या सर्व कलाकृती आपल्या देशाच्या समृद्ध,खानदानी, पारंपारिक, आणि प्राचीन संस्कृतीचा पवित्र वारसा दर्शविणाऱ्या आहेत. असा वारसा जपून आणि चित्रबद्ध करून याचा ते जागतिक स्तरावर प्रचार व प्रसार करीत आहेत. त्यांच्या रंगलेपनात त्यांनी एक विशिष्ट शैली जपलेली आहे. चित्रांची रचना, रंगसंगती, प्रकाशाची योजना उत्कृष्ट आहे. त्यांचे चित्र स्मृतीच्या कोशात घेऊन जातात. त्यांच्या चित्रांमधील बारकावे आपल्याला संस्कृतीकडे घेऊन जातात.

## अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे

**२ जून**

१) श्री. रामचंद्र केशव घरत
अलिबाग, २-६-१९३९
२)श्री.अनंत मुरलीधर पाटील
चेंढरे, अलिबाग २-५-१९४७
३)मुरली बिहारी राजभर
रामनाथ,अलिबाग २-५-१९४२
४)पुरूषोत्त निवास प्रभु
घरत आळी, अलिबाग २-५-१९४७
५) सुभाष विठ्ठल पानस्कर
चेंढरे-अलिबाग, २-५-१९५२
६)श्रीम.सरोजबाला सुभाष पानस्कर
चेंढरे-अलिबाग २-५-१९५४
७)श्री.राजाराम कमलागर भगत
चेंढरे-अलिबाग २-५-१९५५
८)श्रीम.अर्चना अशोक भेंडकर
मु.थळबाजार, २-५-१९५५
९)श्री.शंकर नारायण पावशे
मु.नवेदर-नवगाव, २-५-१९५४
१०)श्री.नरेंद्र कृष्णाजी नागवेकर
अलिबाग, २-५-१९५४
११)श्री.मुरलीधर नारायण जोशी
अलिबाग, २-५-१९५७
१२)श्री.अड्डीबाबू बैरी मारिडी
मु.भाल, अलिबाग २-५-१९५७
१३)श्री.श्रीधर बाबू पावसकर
रामनाथ, अलिबाग, २-५-१९३७

## कृषीवलच्या वाचकांना आवाहन




अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे. जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.

**संपर्क-**
८०५५३२५६७८ **(बीपीन राठवा)**
९२२६०५५१५५ **(अमित शहानंद)**
**- मुख्य संपादक, कृषीवल**

**आजचे अन्नदाते**
**श्री. राजेंद्र लक्ष्मण पालकर, वाढदिवस अलिबाग**

# मुरुडमध्ये एसटीचा वर्धापनदिन साजरा



**। कोर्लई । वार्ताहर ।**

महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाचा ७६वा वर्धापनदिन मुरुड आगार प्रमुख राहुल शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली उत्साहात साजरा करण्यात आला.

बीएसआरटीसीची पहिली बस १ जून १९४८ यादिवशी पुणे ते अहमदनगर या मार्गावर धावली. ही बस पुणे येथील पहिले चालक तुकाराम पठारे व वाहक लक्ष्मण केवटे यांनी चालवली. पुढे भाषिक आधारावर राज्य पुनर्रचनेनंतर मुंबई, मध्यप्रांत आणि संपुष्टात आलेल्या निजाम राज्याचा भाग मिळून महाराष्ट्र राज्याची स्थापना करण्यात आली. त्या भागातील वाहतूक सेवा करीत असलेल्या संस्थाही बीएसआरटीसीमध्ये विलीन करून नव्या महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ या नावाने महामंडळाचा कारभार सुरू राहिला. याचा पुढे विस्तार होऊन वटवृक्ष झाला.

राज्य परिवहन महामंडळाच्या वर्धापनदिन दिनानिमित्ताने मुरुड आगारातील नियंत्रण कक्षात सुशोभीकरण करण्यात येऊन सुबक आकर्षक सजावट, रांगोळी काढण्यात आली.आगारातील एस.टी. बसला सुशोभीत करण्यात आले होते. आगार प्रमुख राहुल शिंदे यांच्या उपस्थितीत प्रवाशी यांच्याहस्ते केक कापून वर्धापनदिन साजरा करण्यात आला.

यावेळी आगार व्यवस्थापक राहुल शिंदे, सहाय्यक वाहतूक निरीक्षक गौतम भोसले, देविदास जाटळे प्रमुख कारगिर रुझार, आगार लेखाकार अक्षय भोईर, हरिशचंद्र पाटील, संतोष नाईक, लक्ष्मण मल्हार, साईश कारभारी, विरेश जंजिरकर, नामदेव ढाके, लक्ष्मण पांचाळ, विंदा धनावडे सर्व चालक वाहक कर्मचारी तसेच यांत्रिक कर्मचारी उपस्थित होते.

# मुख्याध्यापक श्रीधर ओव्हाळ सेवानिवृत्त



**। मुरूड-जंजिरा । वार्ताहर ।**

सहजीवन विद्या मंडळ संचलीत श्री छत्रपती शिवाजी नूतन विद्यालय नांदगाव हायस्कूलचे मुख्याध्यापक श्रीधर रावसाहेब ओव्हाळ हे ३० वर्षांच्या प्रदीर्घ सेवेनंतर सेवानिवृत्त झाले आहेत. त्यांच्या निरोप समारंभाचा कार्यक्रम शाळेत संपन्न झाला.

यावेळी श्रीधर ओव्हाळ यांनी आपल्या मनोगतात सांगितले की, व्यवस्थापन कमिटी व शिक्षक सहकारी यांच्या बहुमूल्य सहकार्यामुळेच मी माझा कालावधी पूर्ण करू शकलो. यावेळी त्यांनी जुन्या आठवणी विशद करून शालेय परीक्षाव उपक्रमात यशस्वी वाटचाल केल्याचे सांगितले. इयत्ता दहावी शालांत परीक्षेचा निकाल उत्कृष्ठ लागण्यासाठी शिक्षक वृंदांनी घेतलेली विशेष मेहनत याचा देखील त्यांनी उल्लेख केला.

यावेळी सहजीवन विद्या मंडळाचे अध्यक्ष फैरोजशेठ घलटे, अर्चना खोत, उदय खोत, मंगेश नांदगावकर, योगेश पाटील, संतोष बुल्लू, शांताराम वाघमारे, दीपक गोसावी, मनिषा शिंदे, बंटी करंबत आदी मान्यवर उपस्थित होते.

# विघवलीत गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार

**। माणगाव । प्रतिनिधी ।**

दहावी बोर्डाच्या शालांत परीक्षेत उत्तम गुणांनी उत्तीर्ण झालेल्या विघवली गावातील विद्यार्थ्यांचा विघवली ग्रामस्थ व सरपंच वैष्णव साठे यांच्या हस्ते शुक्रवार दि. ३१ मे रोजी सत्कार करण्यात आला.

गावातील वेद भाऊ सापळे ९३.६०%, सुयश समीर सालदूर ८९.२०%, आदिष्ठ संदीप खानविलकर ८४.६०%, मानसी किशोर खानविलकर ७८.६०%, समीक्षा सचिन सापळे ७६.२०%, यश मनोज बेंडखले ७५.६०%, सापळे श्रिया विकेश ७२%, प्रथमेश गणेश सापळे ७१% यांनी दहावी परीक्षेत उत्तम यश संपादन केले आहे. या सर्व विद्यार्थ्यांचे ग्रामस्थ, महिला मंडळ व सरपंच वैष्णव साठे यांनी कौतुक करून पुढील वाटचालीस हार्दिक शुभेच्छा दिल्या.



## जाहीर नोटीस

सर्व जनतेस या जाहीर नोटीशीद्वारे कळविण्यात येते की, मौजे सोगांव, ता. अलिबाग, जि.रायगड येथील गट नं. २२०, एकूण क्षेत्र ८१-००-०० आर.चौ.मी., आकार ८१० रु.पै. व गट नं. २२१, क्षेत्र ४४-००-०० आर.चौ.मी., आकार ४४० रु. पै. हि बिनशेती मिळकत श्री. राजेश शशिकांत मेहता व सौ. भावना राजेश मेहता यांचे नावे ७/१२ चे दप्तरी दाखल असून सदर मिळकती संदर्भात खरेदी-विक्रीचा व्यवहार आमच्या अशिलांबरोबर करण्याचा ठरविलेला आहे. त्या अनुषंगाने त्यांच्यामध्ये बोलणी झालेली आहेत. सदर मिळकतीची मालकी व ताबेकब्जा श्री.राजेश शशिकांत मेहता व सौ. भावना राजेश मेहता यांचा आहे असे त्यांनी दाखविलेल्या कागदपत्रावरून दिसून येत आहे. सदर मिळकत निर्वेध असल्याबाबतचा भरवसा विद्यमान मालक यांनी दिलेला आहे.

तरी सदर मिळकतीच्या संदर्भात कोणाचीही, गहाण, दान, बक्षीस, लिज, फरोक्त वहिवाटीचा अगर तत्सम प्रकारचा कोणताही हक्क असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झालेपासून १४ (चौदा) दिवसांच्या आत खाली सही करणार यांचेकडे प्रथमदर्शनी लेखी पुराव्यासह लेखी हरकत दाखल करावी. या मुदतीत कोणाचीही कसलीही हरकत न आल्यास आमचे अशिल सदर मिळकत निर्वेध असून खरेदी व्यवहार पूर्ण करतील. तद्नंतर मागाहून येणारी कोणतीही हरकत आमच्या अशिलांवर बंधनकारक राहणार नाही, याची नोंद घ्यावी.

अलिबाग
दिनांक :- ०२/०६/२०२४

**भोगवटा धारकांचे नाव**
**१. श्री. राजेश शशिकांत मेहता**
**२. सौ. भावना राजेश मेहता**

सही/-
**ॲड. श्री. सचिन बा. जोशी**
दुसरा मजला, फ्लॅट नं. ३,
साईलिला सोसायटी, डॉ. कुमठेकर हॉस्पीटल शेजारी,
श्रीबाग नं. २, अलिबाग, ता.अलिबाग, जि.रायगड
मोबाईल - ९८२२६५३६५५

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिलांच्या सुचनेवरून आम्ही १) श्री. विश्वास विश्वनाथ थळे, २) श्रीमती. अनिता अरूण भगत, ३) सौ. रेश्मी राजेंद्र पाटील, ४) सौ. वृषाली चंद्रशेखर घरत, ५) सौ. विनंती विशाल म्हात्रे (पूर्वाश्रमीची विनंती विश्वनाथ थळे) (यापुढे संयुक्तपणे मालक म्हणून संबोधित केलेले) ज्यांनी असे निवेदीत केले आहे की, खाली नमूद परिशिष्टात वर्णन केलेल्या व यापुढे 'सदर मिळकत' असे संबोधण्यात आलेल्या मिळकतीमध्ये त्यांस पुर्णपणे व निर्वेध मालकीहक्क आहेत व त्या मिळकतीमधून कुणाचाही कोणत्याही प्रकारचा जाण्या-येण्याचा पुर्वापार वहिवाटीचा अथवा अन्य कोणत्याही प्रकारच्या वहिवाटीच्या रस्त्याचा हक्क नाही, अथवा ती मिळकत त्यांनी कुणासही विकणेचा अथवा अन्य प्रकारे तबदिल करण्याचा करार-मदार कुणाबरोबरही केलेला नाही, त्या मिळकतीचे मालकी हक्कांची पडताळणी करीत आहोत.

तरी ज्या इसमांचा त्या मिळकतीमध्ये अथवा त्यांतील कोणत्याही भागावर अथवा भागामध्ये करार, संमतीज्ञापन, भागीदारी, खरेदी,भाडेपट्टा, पोटभाडेपट्टा, वारसा, बोजा, दान, गहाण, हस्तांतरण, अदलाबदल, विश्वस्त, कुळवहिवाट, ताबा, परवाना, वहिवाट, कसवणुक, पोटगी, मृत्यूपत्र, कौटुंबिक व्यवस्था, तडजोड, कोर्टाचा हुकूमनामा, वहिवाटीच्या रस्त्याचा करार या अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्कहितसंबंध असेल, त्यांनी तसे आम्हास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांचे आत खाली दिलेल्या आमचे पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यांसहित रजिस्टर्ड पोस्ट ए.डी. द्वारे लेखी कळवावे. मुदतीत तसे कुणीही न कळविल्यास, सदर मिळकतीमध्ये कुणाचाही कोणताही हक्कहितसंबंध नाही अथवा असल्यास तो कायम स्वरूपी सोडून देण्यात आला आहे, असे समजण्यात येईल व मिळकतीचे मालकी हक्क निर्वेध आहेत असे मानून आमचे अशिल खरेदी व्यवहार पूर्ण करतील. नोटीस मुदतीनंतर आलेली कोणतीही तक्रार, हरकत अथवा दावा विचारात घेतला जाणार नाही.

**परिशिष्ट**
**मिळकतीचे वर्णन**

तुकडी व जिल्हा रायगड पोट तुकडी व तालुका अलिबाग जिल्हा निबंधक रायगड दुय्यम निबंधक अलिबाग यांचे अधिकार क्षेतील जिल्हा परिषद रायगड पंचायत समिती अलिबाग स्थानिक ग्रुपग्रामपंचायत परहूरचे हद्दीतील मौजे पालांबे येथील खालील वर्णनाची मिळकत.

१) स. नं. ३/२, क्षेत्र ० हे. ७९.४० आर, आकार २१ रूपये ०६ पैसे या मिळकतीपैकी खालीलप्रमाणे चतु:सिमांकीत मधली ० हे. ४० आर एवढी मिळकत, ज्यासी चतुःसिमा :
पुर्वेस : मौजे पालांबे स. नं. ३/३ या मिळकतीची हद्द.
पश्चिमेस : रस्ता.
दक्षिणेस : मौजे पालांबे स. नं. ३/२ या मिळकतीपैकी उर्वरित मिळकत.
उत्तरेस : मौजे पालांबे स. नं. ३/२ या मिळकतीपैकी उर्वरित मिळकत.

अलिबाग
तारीख : २/६/२०२४

सही /-
**ॲड. गणेश गोविंद पाटील**
ओ/१,२, तळमजला,
'श्रुतीसारंग' को. ऑप. हौ. सोसायटी,
युनियन बँकेसमोर, ब्राम्हण आळी,
अलिबाग, रायगड, ४०२ २०१.

## वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि.चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

**-मुख्य संपादक**

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिल यांनी मौजे-नागांव, ता.अलिबाग, जि.रायगड येथील खालील क्षेत्राचे वर्णनाची जमिन मिळकत त्या मिळकतीचे विद्यमान मालक १) मंगला सुधीर गुप्ते यांचे कडून कायम मालकी हक्काने विकत घेण्याचे ठरविले आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भूमापन क्र व उपविभाग | क्षेत्र (हे.आर.) | आकार (रु.पै) |
|---|---|---|---|
| नागांव, ता. अलिबाग | ३५/२/२ | ००.११.४० <br> पो.ख. ००.०३.६० <br> एकूण ००-१५-०० | ०२.७० |

जमिन मिळकत या नोटीसीचा विषय आहे.

वर वर्णन केल्या प्रमाणे क्षेत्राची जमिन मिळकती ह्या त्यांचे निर्वेध मालकी हक्काची व प्रत्यक्ष ताबे कब्जा वहिवाटीतील असून, त्या विकणेचा त्यांस हक्क अधिकार असल्या बाबतचा निर्वाळा विद्यमान मालकांनी आमचे अशिलांस दिलेला आहे. मात्र तरी देखील वर वर्णन केलेल्या मिळकतीं वर अथवा तिचे कोणत्याही भागावार कुणाचाही विक्री, गहाण, दान, भाडेपट्टा, विक्रीचाकरार, वारसाहक्क, लिज, लिएन, चार्ज, पोटगी, ताबा, वहिवाट, इजमेंटरीहक्क या व अन्य कोणत्याही तऱ्हेने सदर मिळकतीचे विक्री व्यवहारास हरकत आल्यास त्यांनी त्यांच्या हरकती अगर तक्रार ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा ) दिवसांचे आत खाली दिलेल्या आमचे पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यासहीत लेखी स्वरूपात आणून द्यावीत, मुदतीत कोणाचीही, कोणत्याही प्रकारची तक्रार अथवा हरकत न आल्या सदर मिळकती विद्यमान मालकांच्या निर्वेध व निजोखमी मालकी हक्काच्या आहेत व त्यावर अन्य कुणाचा ही कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही अथवा तसा हक्क असुनही तो त्यांनी विद्यमान मालकांच्या तसेच आमच्या अशिलांच्या लाभांत सोडून दिला आहे. असे गृहित धरून आमचे अशिल व्यवहार पूर्ण करतील व मागाहून मुदतीनंतर आलेली कुणाचीही तक्रार अगर हरकत विचारात घेतली जाणार नाही, हे सर्वांस कळावे.

ठिकाण : अलिबाग
दिनांक : ०२/०६/२०२४

**ॲड. राहुल रमेश नाईक**
मु. नागांव, ता. अलिबाग
मोबा. क्र. ९९२२७९८५२८

**ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन**
१ ग्रॅम सोन्याचे प्लेटिंग
दागिने-नविन डिझाइन्स
मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी-सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.
**२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.**
**मोबाईल : ९८६०६५८५६५**

# तलावातील गाळ काढण्यास सुरुवात



**। तळा । वार्ताहर ।**

तळा शहरातील पुरातन काळापासून असलेल्या महादेव तलावातील गाळ काढण्याच्या कामास अखेर सुरुवात करण्यात आल्याने नागरिकांमधून समाधान व्यक्त करण्यात येत आहे. तळा शहरातील ब्रम्हाली येथे पुरातन महादेव मंदिरासमोर असलेल्या तलावाची गेल्या १५ ते १६ वर्षांपासून स्वच्छता करण्यात आली नसल्याने या तलावात मोठ्या प्रमाणावर गाळ साचले होते. शहरातील भोईर वाडी, फोंडळवाडी, मुंढ्याची वाडी, परीट वाडी, जोगवाडी यांसह बहुतांश वाड्यातील गणपती मूर्तींचे विसर्जन या तलावात केले जाते. दरवर्षी होत असलेल्या मूर्त्यांच्या विसर्जनामुळे तसेच गेल्या कित्येक वर्षांपासून तलावाची स्वच्छता करण्यात आली नसल्याने तलावात मोठ्या प्रमाणावर गाळ जमा होऊन उन्हाळ्यामुळे तलावातील पाणी आटून पाण्याचा उग्र वास सर्वत्र पसरला होता. यामुळे तलावाशेजारी राहणाऱ्या नागरिकांना व महादेव मंदिरात दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांना या दुर्गंधीचा सामना करावा लागत होता. मात्र सार्वजनिक बांधकाम विभाग माणगाव यांच्या माध्यमातून दोन जेसीबींच्या सहाय्याने तलावातील गाळ काढण्यास सुरुवात झाल्याने या परिसरातील नागरिकांमधून समाधान व्यक्त करण्यात येत आहे.

## जाहिर नोटीस

आमचे आशिल श्रीमती सुशिला जगदिश कपाडिया व श्री. अमोल जगदिश कपाडिया, दोघेही रा. माऊंट युनिक पेडर रोड मुंबई ४०००२६ यांनी दिलेल्या माहितीवरुन व सांगणेवरुन आमचे अशिलांतर्फे सर्व लोकांना या जाहिर नोटीसने कळविणेत येते की,

**मिळकतीचे वर्णन**

मौजे टेकाळी, ता.अलिबाग, जि. रायगड येथील गट नं. ३४६, क्षेत्र ०-६४-९०, (हे.आर.), आकार २.१२ (रु.पैसे) अशा वर्णनाची शेती मिळकत त्यास पुर्वीचा गट नं. १०२८, महसुली गाव मौजे आवास ही १) राजन दत्तात्रेय तोडणकर २) श्रीमती श्रध्दा श्रावणकुमार राऊत ३) श्रीमती अंजनी यशवंत तोडणकर ४) अजित यशवंत तोडणकर ५) श्रीमती अश्विनी आनंद सुर्वे ६) संजय यशवंत तोडणकर यांचे सामाईक मालकिची जमीन मिळकत हा या जाहिर नोटिसचा विषय आहे. यापुढे या नोटिसीमध्ये वर वर्णन केलेल्या जमीन मिळकतीस सदरहू मिळकत असे संबोधणेत आले आहे.

आमचे अशिल व सदरहू मिळकतीचे जमीन मालक राजन दत्तात्रेय तोडणकर वगैरे ६ यांनी वर नमुद केलेल्या मिळकतीचा साठेकरार यापुर्वीच आमचे अशिलांच्या सोबत केलेला आहे. सदरच्या सावेकरारापोटी आमचे अशिलांनी ठरलेल्या किंमतपैकी काही रक्कम विद्यमान मालक राजन दत्तात्रेय तोडणकर वगैरे ६ यांस बयाणापोटी दिलेली आहे. परंतु आजतागायत जमीन मालक राजन दत्तात्रेय तोडणकर वगैरे ६ यांनी साठेकरारातील अटी व शर्तीचे पालन जाणूनबुजून केलेले नाही. त्यामुळे सदरचा व्यवहार आमचे अशिलांस पुर्ण करता येत नाही.

विद्यमान जमीन मालक राजन दत्तात्रेय तोडणकर वगैरे ६ यांनी सदरहू मिळकतीच्या आमचे आशिलाच्या बरोबर झालेल्या साठेकराराप्रमाणे ठरलेल्या व्यवहाराची पुर्तता केली नाही किंवा करत नाहीत म्हणून आमचे अशिलांनी जमीन मालक राजन दत्तात्रेय तोडणकर वगैरे ६ यांचे विरुध्द अलिबाग दिवाणी न्यायालयाला मध्ये स्पेशल मुकदमा क्र.१३/२०२० हा दावा दाखल केलेला आहे. सदरच्या दाव्यामध्ये जमीन मालक राजन दत्तात्रेय तोडणकर वगैरे ६ हजर झालेले आहेत. सदरचा दावा मे. कोर्टामध्ये प्रलंबित आहे.

असे असतानाही जमीन मालक राजन दत्तात्रेय तोडणकर वगैरे ६ हे आमचे अशिलांचे अपरोक्ष, आमचे अशिलांचा विश्वासघात करुन वर नमुद केलेली जमीन अन्य त्रयस्त इसमास विक्री करु पहात आहेत. याबाबत आमचे अशिलांस खात्रीची माहिती मिळालेली आहे.

तरी वर नमुद केलेल्या जमीनीचा व्यवहार कोणीही जमीन मालक राजन दत्तात्रेय तोडणकर वगैरे ६ यांचे सोबत करू नये, तसे केल्यास त्यास आमचे अशिलाची सक्त हरकत राहील व आमचे अशिल संबंधित व्यक्ती व जमीन मालक यांचेवर योग्य ती कायदेशीर कारवाई करतील.

अलिबाग,
दि.०२.०६.२०२४

**ॲड. मिलींद चव्हाण**

## जाहीर सुचना

सर्व लोंकाना या जाहीर नोटीसीव्दारे कळविण्यात येते की खालील वर्णनाची मिळकत तिचे मालक श्री. शांताराम लक्ष्मण देवघरे व श्री. सुरेश लक्ष्मण देवघरे रा.कडाव ता. कर्जत, जि.रायगड ४१०२०१ यांच्याकडुन कायमचे खरेदी करण्याचे ठरविले आहे.

**जमिन मिळकतीचे वर्णन**
**मौजे कडाव, ता कर्जत जि रायगड येथील मिळकत**

वरील जमीन मिळकत सर्व्हे नं २०/१ एकुण ०.७७.६० पोट खराबा ०.२.६० गुंठे पैकी ०.४०.०० जागा विकत घेणार आहेत. तरी जमीन मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा ताबा बयाणा पावती, साठेकरार, गहाणखात, दान, भाडेपट्टा, लीज अथवा इतर कोणत्याही प्रकारचा कायदेशीर हक्क हित संबंध असल्यास आणि त्यांची आमचे अशीलाच्या खरेदीच्या व्यवहारात हरकत असल्यास त्यांनी तसे आम्हास ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन १० दिवसाच्या आत लेखीपुराव्यासह खाली नमुद केलेल्या पत्त्यावर कळवावे. वरील मिळकतीशी कोणतीही हरकत न घेतल्यास वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसलेही प्रकारचा हक्क हितसंबंध त्यानी आमचे अशीलाच्या लाभात सोडुन दिलेला असुन त्यांनी आमचे अशीलाच्या खरेदीच्या व्यवहारास कोणतीही हरकत नाही असे समजण्यात येऊन आमचे अशील खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील मागाहून कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही.

येणेप्रमाणे जाहीर सुचना आहे.

दिनांक ०१/०६/२०२४

**ॲड देविदास यशंवत देवघरे**
पत्ता. मु.पो कडाव ता कर्जत रायगड
भ्रमणध्वनी ९०२८५९२७९८

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीशीद्वारे कळविण्यात येते की,

ज्याअर्थ मौजे गोंधळपाडा, ता. अलिबाग, जि. रायगड येथिल पुढीलप्रमाणे वर्णनाच्या जमिन मिळकती भोगवटादार रकान्यामधिल नमुद इसमांच्या खुद्द मालकीच्या मिळकती असुन, आम्ही सदर मिळकतींच्या मालकी हक्कांची पडताळणी करीत आहोत.

**जमिन मिळकतींचे वर्णन**
**मौजे गोंधळपाडा, ता. अलिबाग, जि. रायगड येथिल**

| भोगवटाधारकाचे नाव | भुमापन क्र. | उपविभाग | क्षेत्र हे.आर.चौ.मी. | आकार रु. पै. |
|---|---|---|---|---|
| सुरेश बाळकृष्ण कातकर | ३३ | १ | ०-२१.२० | ३.५६ |
| विकास बाळकृष्ण कातकर | ३३ | ३/अ | ०-२६.७० | १.८१ |
| | ३३ | ४/अ | ०-१४.२० | ३.२५ |

त्याअर्थी विद्यमान मालकांव्यतिरीक्त सदर मिळकतीसदर्भात अगर तिचे कोणत्याही भागावर कुणाही तिऱ्हाईतांचे गहाण-दान, बक्षिस, फरोक्त, करारनामा, लिज, चार्ज, ॲटॅचमेंट, अन्न वस्त्र निवारा, कुळ हक्क, ताबा-कब्जा, एम.ओ.यु, हुकुमनामा, मनाई आदेश, जप्ती, वहिवाट, हिस्सा, संपादन रिक्विझेशन अगर त्याप्रकारचे कोणतेही हक्क हितसंबंध निगडीत असल्यास अगर सदर मालकी हक्कांस कुणाचीही हरकत असल्यास अशा हितसंबंधीत व्यक्ती, संस्था इत्यादींनी त्यांची लेखी हरकत जरुर त्या कागदोपत्री पुराव्यानिशी सदर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन २१ (एकवीस) दिवसांचे आत आमच्या खालीलप्रमाणेच्या पत्त्यावरील कार्यालयात सादर कराव्यात.

विहित मुदतीमध्ये कुणाचीही हरकत न आल्यास सदर मिळकतीवरील विद्यमान मालक श्री. सुरेश बाळकृष्ण कातकर आणि श्री. विकास बाळकृष्ण कातकर, रा. अलिबाग यांचे मालकी हक्क निर्वेध व बोजारहित आहेत असे समजुन मालकी हक्काचे प्रमाणपत्र (Title Certificate) देण्यात येईल. मुदतीनंतर आलेल्या हरकती ग्राहय धरल्या जाणार नाहीत. हे सर्व जाहीर व्हावे.

पनवेल
दि.: ०२/०६/२०२४.

**श्री. तुषार द. देवरे, ॲडव्होकेट**
पत्ता : फ्लॅट नं. ए-२, जयनगर 'ए' को. ऑप हौ.सोसा.लि
कोर्ट रोड, ५२ बंगला, पनवेल ४१० २०६,
जि. रायगड. मोबाईल नं. ९३२५००४००८
tushar.deore82@gmail.com

## जाहिर नोटीस

सर्व लोकांस या जाहिर नोटीसीव्दारे कळविण्यात येते की, आमचे अशिल श्री. किरन मफतलाल शाह, रा.१०३/अजितनाथ/निळकंठ इनक्लेव्ह, एल.बी.एस. मार्ग, श्रेयस सिनेमाज समोर, घाटकोपर (प.), मुंबई ४०००८६, यांनी खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेली जमिन मिळकत, त्या मिळकतीचे विद्यमान मालकांकडुन कायम खरेदी घेण्याचे ठरविलेले आहे.

**मिळकतीचे वर्णन : मौजे वाकस, ता. कर्जत, जि. रायगड, येथील जमिन मिळकत .**

| स.नं. | क्षेत्र (हे.आर.पॉ.) | आकार (रू.पै.) | भोगवटाधारकाचे नाव |
|---|---|---|---|
| ४९/७/अ/९ | ०.८७.०० | १.११ | श्रीमती जयश्री अनिल नेरपगार, वैगेरे. |

**यापैकी श्रीमती जयश्री अनिल नेरपगार यांच्या हिश्श्याचे ०.२२.०० हे.आर.पॉ. क्षेत्र.**

वरील वर्णनाच्या शेतजमिन मिळकतीच्या संदर्भात अन्य कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा गहाण, दान, साठेकरार, करारनामा, विकसन करारनामा, मुखत्यारपत्र, विसारपावती, खरेदीखत, कुळ, सहभागीदार, वहिवाटदार, भाडेकरार, जागा वापर परवाना, पोटगी, लीज, लीन आदी कोणत्याही प्रकारे हक्क, हितसंबंध असल्यास व त्यांची हरकत असल्यास त्यांनी योग्य त्या कागदोपत्री पुराव्यानीशी ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन होणाऱ्या १४ (चौदा) दिवसांच्या मुदतीत खालील सही करणार यांजकडे लेखी स्वरूपात कळवावी. येणे प्रमाणे विहीत मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत न आल्यास सदरची मिळकत निर्वेध व बोजारहित आहे असे समजुन आमचे अशिल सदर मिळकतीच्या खरेदी विकीचा व कायदेशीर हस्तांतराचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची सर्वांनी नोंद घ्यावी.

कर्जत
दिनांक :- ०२/०६/२०२४.

सही /-
**ॲड. उषा जे. कांबळे.**
कर्जत,''पुष्प विमल'' निवास,
नानामास्तर नगर, मुद्रे.
मो. नं. ७३८५००४८०६.

## क्लासिफाईड
जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी

■ बोअरवेल-विहिरीसाठी मशीनद्वारे अचूक भूजल संशोधन-९२२६७६६१२९

■ प्रथम, पुर्नविवाह, व्यंग, सर्वजातीय, आंतरजातीय वेबसाईटसह स्थळांसाठी रोहा गणेश महाकाळ ८८८९३५७७५

■ सहारा ट्रॅव्हल्स अलिबाग मध्ये स्थानिक ड्रायव्हर पाहिजे वय२५ ते ४५( Jsw duty) ९२७०५६०४५६

■ बजाज शोरूम अलिबागमध्ये कामासाठी (टू व्हिलर) मेकॅनिक पाहिजे संपर्क : प्रबोध राऊत ९७०२४५९१५१ बजाज शोरूम बायपास रोड अलिबाग

■ अकाउंटट पाहिजे B.com ,Tally ठिकाण- बामणसुरे, चोंढी पगार- ८००० महिना संपर्क : ९८२३५८५३२१

■ अंकुर नर्सरी, वाडगाव फाटा, अलिबाग सिझनल सेल! सर्व प्रकारच्या फळझाडे आणि फूलझाडे वर भरपूर डिस्काउंट. १५ जूनपर्यंत झाडे बुक केल्यास अधिक डिस्काउंट. संपर्क : ९४२३८९०२९५ (शुक्रवार ते सोमवार)

■ नागावमधील हॉटेलमध्ये काम करण्यासाठी स्टाफची आवश्यकता आहे. १. रिसेप्शन, २. लोकल जेवण बनवण्यासाठी हॉटेल लेडीज स्टाफची आवश्यकता आहे. शिफ्ट टाइमिंग दुपारी २ ते रात्री ११, २ ते ३ वर्षे अनुभव असणाऱ्यांनी संपर्क साधावा. (व्हॉटसॲप वर मेसेज करावा.) ८४०८८२९५५५, ७८७५८६६५५५

■ Autocad draftsman required in architectural firm. Location :Alibag Comtact no:9970391697

■ अगस्त्या फाऊंडेशन या नामांकित समाजसेवी संस्थेच्या अलिबागमधील शाखेत Instructor या पदासाठी मुलाखती चालू आहेत. पात्रता पदवीधर ( BSC/MSC/B.ed/D.ed/Be) निवड प्रक्रिया- लेखी परिक्षा व मुलाखत. इच्छुक उमेदवारांनी खालील क्रमांकावर संपर्क साधावा. रोहन म्हात्रे- ७९७२२१९३६२/प्रकाश हांडे- ९४२३०१६९३२

■ B.A, B.ed, D.ed. B.sc. BP.ed शिक्षक/शिक्षिका पाहिजेत. पगार अनुभवानुसार आपला बायोडाटा ८३९०९०९४७० या नंबरवर व्हॉट्सअप करा. तसेच अलिबागसाठी ऑफिससाठी अकौंटस क्लार्क पाहिजेत.

■ अलिबाग एस.टी. स्टँडसमोर रेडी क्लासरूम इन्फ्रास्ट्रक्चर हॉबी क्लासेस, स्कील डेव्हलपमेंट व इतर कोणत्याही शैक्षणिक वापरासाठी उपलब्ध आहे. संपर्क : ८३९०९०९४७०

■ पहिली ते पाचवी क्लासेस व पाळणाघर श्रीबाग नं.-२, चेंढरे, अलिबाग. संपर्क- ९८२३९२०४०३, ८१४९६६९२४६

■ अलिबाग शहरात मध्यवर्ती ठिकाणी ३५० स्क्वे.फूट. गाळा भाड्याने देणे आहे. (बीच रोड, जुना नगरपालिकेजवळ, संपर्क - ९४२११६३१२४

■ घरकाम व मुलांना सांभाळणे साठी बाई हवी पंतनगर अलिबाग येथे.पूर्णवेळ राहणारी किंवा सकाळी ८.००ते ६ संपर्क-९८६७२१५४९५/८०९७२०५९३९

■ अलिबाग शहराच्या जवळ N.A.Plot आहेत. भातशेती वरकस जमिन अलिबाग रोहा रोड वर उपलब्ध. सनस्टोन रॉयल इस्टेट अलिबाग-बायपास रोड. ८६६९००६९०२/९२७०८८८८०३

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१

# सिडकोचे आपत्कालीन कक्ष सज्ज

**। पनवेल । वार्ताहर ।**

**अतिवृष्टीमध्ये उद्भवलेल्या आपत्तीवर मात करण्यासाठी सिडको महामंडळाने सालाबादाप्रमाणे नागरिकांच्या मदतीसाठी आपत्कालीन नियंत्रण कक्ष सुरू केला आहे. जून ते सप्टेंबर या महिन्यामध्ये २४ तास या नियंत्रण कक्षातून रहिवाशांना मदत केली जाणार असल्याचे सिडको मंडळाच्या जनसंपर्क विभागाने प्रसिद्धी पत्रकातून कळविले आहे. या प्रसिद्धीपत्रकात सिडको महामंडळाने पनवेल महापालिका क्षेत्रातील खारघर, कळंबोली, नवीन पनवेल, नावडे, काळुंद्रे, तळोजा, कामोठे या वसाहतींचे हस्तांतरण झाल्याने या वसाहतींना वगळून इतर सिडको वसाहतींमधील नागरिकांसाठी सिडकोचे हे आपत्कालीन नियंत्रण कक्ष मदत करेल असेही स्पष्ट केले आहे.**




सीबीडी बेलापूर येथील सिडको भवन या इमारतीच्या तळ मजल्यावरुन आपत्कालिन नियंत्रण कक्षाचे काम सुरू असणार आहे. सिडको मंडळाने दिलेल्या माहितीनुसार कार्यालयीन कामकाजाच्या दिवसांसोबत शनिवार, रविवार तसेच सार्वजनिक सुट्टीच्या दिवशीही २४ तास हे कक्ष कार्यरत असणार आहे. या कक्षामार्फत आपत्कालीन स्थितीत अभियांत्रिकी विभाग, आरोग्य विभाग, अग्निशमन विभाग, सुरक्षा विभाग, उद्यान विभाग व इतर महत्त्वाच्या विभागाचे कर्मचारी २४ तास रहिवाशांच्या संपर्कात असतील.

### आपत्तीवेळी नागरिकांनी काय करावे

नागरिकांनी आपत्तीवेळी सिडकोच्या आपत्कालीन नियंत्रण कक्षाला संपर्क साधावा. नागरिक दूरध्वनी किंवा व्हॉटसअ‍ॅप क्रमांकावर तसेच ई-मेलद्वारे नियंत्रण कक्षासोबत संपर्क साधून त्यांच्या तक्रारी नोंदवू शकतील.
दूरध्वनी क्रमांक ०२२-६७९१८३८३/८३८४/८३८५, ०२२-२७५६२९९९
व्हॉटसअ‍ॅप क्रमांक ८६५५६८३२३८ फॅक्स क्रमांक ०२२-६७९१८१९९
ई-मेल eoc@cidcoindia.com

आपत्कालीन कक्षाची कार्यपद्धती वृक्षांची पडझड होऊन वाहतुकीस अडथळा ठरणाऱ्या वृक्षांची छाटणी करण्यासाठी, रस्त्यावरील उघड्या गटारांची झाकणे पूर्ववत बसवणे, पूरसदृश परिस्थिती, रस्त्यांवरील खड्डे, रस्ते व नाल्याजवळ साचलेला कचरा, अतिवृष्टीमध्ये जलप्रवाहात नागरिकांची बुडण्याच्या ठिकाणी तसेच आगीची घटना घडल्यास, साथीचे रोग, इमारत कोसळणे, भूस्खलन, पाणी साचणे या आपत्तींची दखल हे पथक तातडीने घेईल. या मदतकक्षाकडे नागरिकांनी तक्रार नोंदविल्यानंतर मिळालेली माहिती नियंत्रण कक्षातील अधिकारी तातडीने संबंधित नोडच्या प्रमुख अधिकाऱ्याकडे वर्ग करण्यात येईल. सिडकोचे वरिष्ठ अधिकारी त्यानंतर त्यावर योग्य ती कारवाई करतील.

नियंत्रण कक्ष आवश्यक असल्यास अग्निशमन केंद्र, रुग्णालय, वाहतूक पोलीस, स्थानिक पोलीस अशा संबंधित विभागाशी तातडीने संपर्क साधून घटनास्थळी आवश्यक ती मदत ताबडतोब पोहोचविण्याची तरतूद करतील. नागरी संरक्षण दल तसेच सेवाभावी संस्थांचे स्वयंसेवक यांचेही सहकार्य याकामी घेण्यात येणार असल्याचे सिडकोने कळविले आहे.

## १६ जुलैपासून फेरपरीक्षा

**मुंबई** : राज्य शिक्षण मंडळाच्या फेब्रुवारी-मार्च २०२४ मधील मुख्य लेखी परीक्षेत नापास झालेल्या विद्यार्थ्यांसाठी पुन्हा संधी मिळणार आहे. १६ जुलैपासून फेरपरीक्षा होणार असून त्याचे वेळापत्रक मंडळाने जाहीर केले आहे. मंडळाच्या वेबसाईटवर ३ जूनपासून उपलब्ध होणार आहे. दहावीची परीक्षा १६ ते ३० जुलै, तर बारावी सर्वसाधारण व द्विलक्षी विषय व ऑनलाईन परीक्षा १६ जुलै ते ८ ऑगस्ट आणि बारावी व्यावसायिक अभ्यासक्रमाची परीक्षा १६ जुलै ते ३ ऑगस्टदरम्यान होणार आहे. दोन्ही परीक्षांचे अंतिम वेळापत्रक परीक्षेपूर्वी शाळांमधून छापील स्वरूपात मिळणार आहे. सोशल मीडियावरील माहितीवर विश्वास ठेवू नये, असे आवाहनही केले आहे.

## अवैध फलकांचे पनवेलमध्ये पाडकाम सुरु

**। पनवेल । वार्ताहर ।**

पनवेल तालुक्यामधील कोन सावळा रस्त्यावर २० अवैध फलकांचे पाडकाम सार्वजनिक बांधकाम विभागाने शुक्रवारपासून हाती घेतले आहे. तालुक्यातील कोन सावळा मार्गावरील फलक पाडण्यासाठी शुक्रवार ते पुढील आठवड्यापर्यंत जोरदार मोहीम राबविली जाणार आहे.

पनवेल तालुक्यामध्ये अनेक रस्त्यांवर खासगी जमिनी आणि सरकारी जमिनींवर अवैध फलक उभारले गेले आहेत. मागील अनेक वर्षे सरकारी जमीनींवर फलक उभारुन त्याचे भाडे घेणारी टोळी पनवेलमध्ये सक्रिय आहे. कोन सावळा रस्त्यालगत २० फलक काढण्यासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधिकारी मिलिंद कदम यांनी २ क्रेन यंत्र आणि १० मजूर घेऊन पाडकाम सुरू केले.

घाटकोपर येथील फलकाच्या दुर्घटनेत अनेकांचा बळी गेल्यावर का होईना मात्र सरकारी यंत्रणा पनवेलमध्ये अवैध फलकांविरोधात जोरदार मोहीम राबवित आहे. कोन सावळा रस्ता सार्वजनिक बांधकाम विभागाच्या ताब्यात असल्याने सरकारी जमिनींवर हे अवैध फलक उभारल्याने अनेक वर्षांपासूनचे अवैध फलकांच्या माध्यमातून व्यवसायातून उत्पन्न कमविणाऱ्यांवर गुन्हे दाखल करण्याची मागणी नागरिकांकडून होत आहे.

## रमेश कांबळे सेवानिवृत्त



**। उरण । वार्ताहर ।**

उरण नगरपरीषदेमध्ये गेले १५ वर्ष म्युनिसिपल एम्प्लाईज युनियनचे उरण युनिटचे रमेश कांबळे यांनी अध्यक्षपद सेवा पूर्ण करुन निवृत्त झाल्यामुळे त्यांचा निरोप समारंभ पार पाडला.

या कार्यक्रमाचे प्रस्ताविक म्युनिसिपल एम्प्लाईज युनियनचे कार्याध्यक्ष संतोष पवार यांनी केले. ते म्हणाले कामाला लागलेला प्रत्येक व्यक्ती वयोमानानुसार निवृत्त होणारच. परंतु, आपण कसे जगायचे हे आपण ठरवायचे असते. त्याप्रमाणे रमेश कांबळे यांनी कधीही सेवा देत असताना स्वत:चा स्वार्थ पाहिला नाही. अनिल जाधव यांनी आपले मनोगत व्यक्त करताना प्रशासनाला खडेबोल सुनावले. नगरपरिषदेमध्ये अतिशय प्रामाणिकपणे सफाईचे काम करून १५ वर्ष संघटनेचे अध्यक्ष म्हणून जबाबदारी पार पाडत असताना रमेश कांबळे यांनी प्रशासन आणि कामगार यांच्यातील दुवा म्हणून कोणालाही दुखावले नाही.

यावेळी म्युनिसिपल एम्प्लाईज युनियनचे अध्यक्ष अ‍ॅड. सुरेश ठाकूर, अनिल जाधव, घन:श्याम कडू, ई.आर. माने, निखील ढोरे, संजय धापसे, निकम, श्याम मोरे, नरेंद्र उभारे, महेंद्र साळवी, धनेश कासारे, राजेश सोलंकी, जितेंद्र पाडावे उपस्थित होते.

## एसटीचा वर्धापन दिन साजरा

**। नागोठणे । वार्ताहर ।**

एसटीच्या स्थापनेचा ७६ वा वर्धापन दिन महामंडळाच्या रोहा आगाराअंतर्गत असलेल्या नागोठणे स्थानकात विविध कार्यक्रमांनी मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. नागोठणे स्थानकातील प्रवासी चौकशी कक्षाच्या बाहेर प्रवाशांच्या स्वागताचा फलक लावून आकर्षक सजावटीसह आकर्षक रांगोळी काढण्यात आली होती. यावेळी स्थानकात उपस्थित असलेल्या प्रवाशांना गुलाब पुष्प देऊन त्यांचे स्वागत करण्यात आले. यावेळी एस.टी. नागोठणे स्थानकातील वाहतूक नियंत्रक प्रसाद पाटील, वाहतूक नियंत्रक गणेश लांगी, निवृत्त पोलिस अधिकारी प्रकाश जाधव, रोहा आगारातील चालक दिनेश पाटील, वाहक केशव बांगारा, विपुल हेंडे आदी कर्मचारी आणि प्रवासी उपस्थित होते.

## पनवेलमध्ये डान्सबारवर पोलिसांची धाड

**। पनवेल । वार्ताहर ।**

पुणे येथील अपघात प्रकरणानंतर सर्वत्र लेडीज सर्व्हीसबारची झाडाझडती घेण्याचे काम पोलीस आणि राज्य उत्पादन शुल्क विभागाकडून सुरू झाले आहे. परंतु अनेक दिवस उलटले तरी पनवेलमधील ऑक्रेस्ट्रा बारच्या नावाखाली डान्सबार चालविणाऱ्यांकडे सरकारी यंत्रणेने लक्ष्य केंद्रीत केले नव्हते.

समाजमाध्यमांवर काहींनी सरकारी अधिकाऱ्यांच्या कार्यतत्परतेवर प्रश्न उपस्थित केल्यावर खांदेश्वर पोलिसांनी गुरुवारी आसूडगाव येथील इंटरनेट या लेडीज सर्व्हीस बारवर मध्यरात्री सव्वा एक वाजण्याच्या सुमारास धाड टाकून १२ महिला वेटरांना अश्लील चाळे करताना ताब्यात घेतले. एकाच बारच्या परवान्याखाली अनेक गैरधंदे येथे चालविले जात असल्याचा आरोप स्थानिक रहिवाशांकडून केला जात आहे.

पनवेलमधील आसूडगाव परिसरातील सेक्टर ४ ए येथील तपोवन इमारतीमध्ये इंटरनेट नावाचा बार सुरू आहे. यशवंतराव चव्हाण पुणे मुंबई द्रुतगती महामार्गालगत कळंबोली सर्कलच्या हाकेच्या अंतरावर हा बार रात्रभर सुरु असल्याने स्थानिक रहिवासी वैतागले आहेत. इंटरनेट बारवर यापूर्वी ही नवी मुंबई पोलिसांनी धाड टाकली होती. या बारचे मालक, व्यवस्थापक परवान्यातील अटी पाळत नसल्याचे याअगोदर सुद्धा सिद्ध झाले आहे.

नवी मुंबई पोलीस आयुक्त मिलिंद भारंबे यांनी दिलेल्या खास सूचनेनंतर गुरुवारी रात्री स्थानिक पोलीसांनी पुन्हा एकदा बारमध्ये धाड टाकल्यानंतर तेथील महिला वेटर अश्लिल चाळे करताना पोलिसांच्या निदर्शनास आले. मागील अनेक दिवसांपासून नवी मुंबईचे पोलीस आयुक्त मिलिंद भारंबे यांचे खास पथक या बारवर कारवाई करेल अशी अपेक्षा होती. परंतू गुरुवारची कारवाई अनेक दिवसानंतर झाल्याने आश्चर्य व्यक्त केले जात आहे.

पनवेलमध्ये लेडीज सर्व्हीस बारची संख्या कमी आहे. मात्र मुंबई पुणे द्रुतगती महामार्गालगत आणि अटलसेतू पासून काही अंतरावर कोन गावाजवळ अनेक लेडीज सर्व्हीस बार एकाच ठिकाणी आहेत. त्यामुळे प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष स्थानिक पोलिसांचा या बारसंस्कृतीला आशीर्वाद मिळत आहे.

मागील अनेक वर्षे याच लेडीज सर्व्हीसबार संस्कृतीमुळे पनवेल बदनाम झाले आहे. नवी मुंबईचे पोलीस आयुक्त भारंबे यांच्या कारकिर्दीत परवाने धारक लेडीज सर्व्हीस बारमध्ये सुरू असणारे डान्सबार, कुंटणखाने बंद होतील अशी अपेक्षा होती. परंतु, तसे झाले नाही. रायगड जिल्हाधिकाऱ्यांनी पुणे येथील अपघात प्रकरणानंतर पनवेलच्या डान्सबारमधील झाडाझडती घेण्याचे धाडस न दाखविल्याने पनवेलमध्ये 'सर्व काही चालते', याच पायंड्याने सरकारी अधिकाऱ्यांच्या स्तरावर यंत्रणेचा कारभार सुरू असल्याचे दिसले.

## आरटीई प्रवेशासाठी मंगळवारपर्यंत मुदतवाढ

**। रायगड । प्रतिनिधी ।**

खासगी शाळांमध्ये आरटीईच्या राखीव २५ टक्के प्रवेशासाठी सुरू असलेल्या ऑनलाईन अर्ज करण्याच्या प्रक्रियेला मंगळवारपर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे, अशी माहिती प्राथमिक शिक्षण संचालनालयाचे संचालक शरद गोसावी यांनी दिली. खासगी शाळांतील आरटीई प्रवेशासाठी अर्ज करण्याची प्रक्रिया १७ मेपासून सुरू झाली होती. ३१ मे रोजी प्रवेश प्रक्रियेची मुदत संपली असून असंख्य पालकांना विविध कारणांमुळे अर्ज करता आला नसल्याने मुदतवाढ देण्याची मागणी करण्यात येत होती. ४ जूनपर्यंतची मुदतवाढ अंतिम असून त्यानंतर मुदत वाढवून मिळणार नाही, असे गोसावी यांनी नमूद केले आहे. आरटीई प्रवेशाच्या संकेतस्थळावर ऑनलाईन अर्ज नोंदणीची प्रक्रिया सुरू आहे. यात ३१ मेपर्यंत नऊ हजार २१० शाळांमध्ये एक लाख पाच हजार १६१ जागांसाठी दोन लाख २७ हजार २०० अर्ज आले आहेत. यंदा आरटीई प्रवेशासाठी मोठी चुरस पाहायला मिळणार आहे. आरटीई २५ टक्के प्रवेश प्रक्रीयेकरिता पालकांनी या वेबसाईटवर ऑनलाईन अर्ज भरणे आवश्यक आहे.

# साप्ताहिक राशिभविष्य दि. २ जून ते ८ जून २०२४

ज्योतिषी : मिलिंद पाटील, सारळ-अलिबाग
मोबा.९४०४७९१७९८

### योग उत्तम राहील

**मेष :** हा सप्ताह मेषराशीधारकांनी बिनभरवशाच्या व्यक्तीवर अवलंबून राहू नका. कामाच्या ठिकाणी वेळेला महत्त्व द्या. सुधारित घटनांचाक्रम नीट लावून घ्या. लेखनकार्याची आवड निर्माण होईल. कामानिमित्त वाढणारा संवाद तुमच्या वक्तृत्वाची दाद देईल. कर्जबाजारीपणा कमी होईल. आर्थिक साहाय्य उत्तम राहील. सामूहिक गोष्टींसाठी ठरवलेले नियोजन उत्तम जमेल. महिलाना- स्थावर मालमत्तेचे नियोजन करताना कागदपत्रांची नीट तपासणी करा. आपल्या कडे यणाऱ्या पैशांची आवक वाढणार आहे, मात्र खर्चावर नियंत्रण ठेवणे भाग आहे, आपल्या मनाप्रमाणे कामे सुरळीत होणार आहेत. घरासाठी खर्च होईल. जागा जमीन यांचा व्यवहार करत असाल तर फायदा होईल. मोठी पार्टी चालून येईल थोडे कामाच्या पाठी लागा. यश मिळू शकेल, या ग्रहस्थिती मध्ये असणारा योग उत्तम राहील. अवतीभवतीचे चित्र मनासारखे असेल. **महिलावर्ग** - आपल्या नियोजनात अचूकपणा असेल तर कर्जफेड उत्तम प्रकारे कराल. सामाजिक क्षेत्रात काही चांगल्या घटनांमुळे आनंद वाढता राहील. वैवाहिक जीवनात मनासारखे वातावरण राहील. आहारावरील नियंत्रण सोडू नका. प्रकृती जपा. **शुभ दिनांक** - ०३,०४.

### उधारीचे व्यवहार बंद ठेवा

**वृषभ :** हा सप्ताह वृषभराशीसाठी लोक तुमच्या बाबतीत काय विचार करतात त्याची चिंता करू नका जर तुम्ही योग्य असाल तर तुमचे कुणीच काहीच बिघडवू शकत नाही. शारीरिक ताकद अजमावून पाहू नका. नंतर संधि मिळणार आहे फक्त थोडा संयम ठेवा. वयात आलेल्यानी इतरांनसारख लग्न म्हणजे भांडणं आणि सेक्स, असा वाईट विचार करू नका, संगतीचा परिणाम अधोगतीत तर होणार नाही ना हे पाहणे गरजेचे ठरेल. आर्थिक व्यवहारात प्रत्येक पाऊल जपून टाकणे महत्वाचे ठरणार आहे. आपण खोटे बोलण्यापासून आणि खोटे बोलणाऱ्यापासून लांब राहणे आपल्या भविष्यासाठी चांगले आहे, या कालावधीत कौटुंबिक कलह निर्माण करू नका. व्यवसायात जम बसेपर्यंत घाई करू नका. उधारीचे व्यवहार सध्या बंद ठेवा. रोख स्वरूपात असणारी गुंतवणूक फायदा मिळवणारी असेल. **महिलांना-** भावंडांची जबाबदारी पार पाडावी लागेल. सांस्कृतिक कार्यक्रमाची गोडी वाढेल. बारीकसारीक दुखण्याचा बाऊ करणे टाळा. संसर्गजन्य आजारा पासून तब्बेत सांभाळा कौटुंबिकदृष्ट्या शुभ गोष्टींचा ओघ राहील. स्वतचे आरोग्यतंत्र सांभाळणे आवश्यक ठरेल. **शुभ दिनांक-** ०२,०३

### सदुपयोग करणे शिका

**मिथुन :** हा सप्ताह आपले ग्रहमान पाहता मिथुनराशीसाठी आज मात्र सगळं शांत आणि प्रसन्न असेल. आपल्या गोष्टींना महत्व देण्यासाठी आज तुम्ही मनातील गोष्टी बोलू शकतात. माझा तुम्हाला सल्ला राहील की, असे करू नका. आयुष्याला गृहित धरून वागू नका, जीवनात योग्य काळजी घेणे हे एक कसब आहे हे लक्षात असू द्या. भविष्यात जर तुम्हाला आर्थिक रूपात मजबूत बनायचे आहे तर, आजपासूनच धन बचत करा. आपल्या जीवनसाथीच्या आरोग्याची काळजी करावी लागेल आणि वैद्याकीय मदतीची गरज भासेल. तुमच्या स्वप्नातील राजकुमारीशी आज तुमची भेट झाल्यामुळे तुमचा आनंद गगनात मावणार नाही, तुमचे हृदय धडधडेल. जर तुमच्या व्यस्त दिनचर्येचा नंतर ही आपल्यासाठी वेळ मिळत आहे तर, तुम्ही या वेळेचा सदुपयोग करणे शिकले पाहिजे. असे करून आपल्या भविष्याला तुम्ही सुधारू शकतात. तुम्ही तुमच्या जोडीदाराने केलेल्या प्रेमाच्या वर्षावामुळे आयुष्यातील सगळे कष्ट विसरून जाल. **महिलाना-** महिलावर्गाला सासुरवाडीकडून काही शुभसंकेत मिळतील. घरातील वृद्ध व्यक्तींच्या तब्येतीत सुधारणा होईल. योग साधनेला महत्त्व द्या. **शुभ दिनांक**-०४,०५

### मनाला उद्युक्त करा

**कर्क** :हा सप्ताह कर्क राशीधारकाने प्रेम, आशा, विश्वास, सद्भावना, आशावादी आणि निष्ठा अशा सकारात्मक भावना स्वीकारण्यासाठी तुमच्या मनाला उद्युक्त करा. एकदा का अशा भावनांनी तुमच्या मनाचा ताबा घेतला की, कोणत्याही परिस्थितीत तुमचे मन आपसूकपणे सकारात्मक विचार करेल. तुमच्या जवळ आज पैसा ही पर्याप्त असेल आणि या सोबतच मनात शांती असेल. कुटूंबातील सदस्यांसोबत संमेलन, एकत्रित कार्यक्रम केल्याने प्रत्येकाचा मूड चांगला बनेल. जे लोक आत्तापर्यंत सिंगल आहे त्यांची भेट आज कुठल्या खास व्यक्तीसोबत होण्याची शक्यता आहे परंतु, गोष्टीला पुढे वाढवण्याच्या आधी हे नक्कीच जाणून घ्या की, ती व्यक्ती कुणासोबत नात्यामध्ये नसावी. उतावीळपणे कोणताही निर्णय घेऊ नका, अन्यथा त्यामुळे आयुष्यात नंतर पश्चाताप करावा लागेल. **महिलांना-** महिलावर्गाने भावंडांविषयी किंतु परंतु मनात ठेवू नका. घरगुती वातावरण आनंदीमय राहील. सांस्कृतिक कार्यक्रमांना तुमचा प्रतिसाद राहील. आध्यात्मिक जीवनात दिव्य अनुभूती येईल. तब्येतीत सुधारणा होईल. **शुभ दिनांक** -०६,०७

### यशाची खात्री मिळेल

**सिंह :** हा सप्ताह सिंहराशीसाठी समाधान कारक असणार आहे, संपत्ति विषयक प्रश्न आपल्या घरातून हळू हळू सुटू लागतील घरातील विरोधक ही आपल्याशी या बाबत बोलण्यास तयार होतील त्यामुळे यावेळेचा सदुपयोग करा आपली उधारी आता वसूल होणार आहे त्याचे टेंशन घेऊ नका पुरेसा पैसा हाती येईल. सप्ताहाची सुरुवात ग्रहांची अनुकूलता असली तरीसुद्धा धाडसी प्रयोग टाळा. व्यावसायिक क्षेत्रात स्वतच्या कौशल्याचा वेगळा ठसा उमटवता येईल. वाढणाऱ्या कार्यशक्तीतून सहज मार्ग स्वीकारा. दुहेरी वाटेवरून आपली वाटचाल घसरू देऊ नका. जुन्या गोष्टी विसरणे हिताचे राहील. नोकरदार व्यक्तीला मिळणारी बढती लांबणीवर जाईल. ज्येष्ठांचा पाठिंबा असला तरी थांबावे लागेल. सध्या कोणालाही दुखवू नका. ठरवलेले काम करून घेण्याचा प्रयत्न करा. योग्य व अचूक नियोजन केल्यास यशाची खात्री मिळेल. **महिलांना-** महिलावर्गाने पैशाच्या बाबतीत अनोळखी व्यक्तीवर विश्वास ठेवू नका. मैत्रीच्या नात्यात व्यक्तिगत स्वार्थ साधू नका. सामाजिक कार्यात आपला सहभाग मर्यादित ठेवा. आपल्या वैवाहिक जोडीदाराची मानसिकता हट्ट स्वरूपाची राहील. **शुभदिनांक-** ०४,०६

### खाण्यापिण्यातील अतिरेक टाळा

**कन्या :** हा सप्ताह ग्रहमान पाहता कन्याराशीसाठी आपण आठवड्याच्या उत्तरार्धासाठी उल्हसित करणा-या आणि मनोरंजनाच्या कार्यक्रमाची व्यवस्था कराल. प्रेमातील असीम आनंद अनुभवण्यासाठी कोणाचा तरी शोध घ्याल. मदतीसाठी तुमच्याकडे पाहणा-या लोकांना तुम्ही मदत कराल. कालावधी उत्तम आहे या दिवसांत तुमचा प्रियकर, जोडीदार तुमच्या कुठल्यातरी गोष्टीवर खूप आणि मनमोकळा हसेल. नोकरीच्या नव्या संधी चालून येतील. उद्योगात चांगला लाभ होईल. नवा उद्योग सुरू करण्यासाठी हालचाल कराल. या कालवधीत आपल्या मनातील विचारांना पूर्णत्व देण्याच्या दृष्टीने हालचाल केली तर आपणाला सहज यश मिळेल कुटुंबातील वयोवृद्ध व्यक्तींच्या तब्येतीची काळजी घेणे हिताचे राहील. आपण वाहन चालवत असाल तर काळजी घेऊन ते चालवा धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांची आवड राहील. खाण्यापिण्यातील अतिरेक टाळा. **महिलावर्गाने-** कुटुंबातील सर्व सदस्यांना जपण्याचा प्रयत्न करा. मानसिक एकाग्रता वाढवून अध्यात्मात मन रमवा. आरोग्य प्रश्नात वेळीच लक्ष घाला. घरात मोठी खरेदी करू शकाल घरात पाहुणे आले तरी आपली धावपळ होऊन देऊ नका **शुभदिनांक-** २,५

### यश मिळवून देणारा कालावधी

**तुळ :** - हा सप्ताह तुलराशीसाठी सगल्या गोष्टी घेण्यासाठी तुमचे मन सज्ज राहील. आणखी पैसा कमावण्यासाठी तुमच्याजवळील नावीन्यपूर्ण संकल्पनांचा वापर करा. हा आठवडा कामाचा ताण कमी असेल, त्यामुळे तुम्ही कुटुंबासोबत चांगला वेळ घालवू शकाल. प्रेमिक एखाद्या सहलीच्या ठिकाणी जाऊन त्यांच्या प्रेमी जीवनात आनंद आणतील. काम लवकर पूर्ण करून लवकर घरी या कालावधीत तुमच्यासाठी उत्तम राहील यामुळे तुमच्या कुटुंबातील लोकांना ही आनंद मिळेल आणि तुम्हाला ताजेतवाने वाटेल. तुमचा/ तुमची जोडीदार तुम्हाला जाणवून देईल की पृथ्वीवरच खरा स्वर्ग आहे. आपल्या घरातील कुणी सदस्य या कालावधीत तुमच्याशी प्रेमाने जोडलेली काही समस्या शेअर करू शकतो. तुम्ही त्यांना योग्य सल्ला दिला पाहिजे. तुम्ही ऊर्जेने भारलेले असाल -त्यामुळे तुम्ही जे काही कराल त्यासाठी तुम्हाला नेहमीपेक्षा निम्माच वेळ लागेल. **महिलांना-** हा कालावधी तुमच्यासाठी खूपच लाभदायक आणि यश मिळवून देणारा ठरेल. तुमच्या वैवाहिक आयुष्यातील प्रियाराधन, पाठलाग, लाडीगोडी या सगळ्याच्या आठवणी जागवून तुम्ही ताजेतवाने व्हाल. **शुभदिनांक-** ०३,०४.

### वडीलधाऱ्यांचे आशीर्वाद घ्या

**वृश्चिक :** हा सप्ताह वृश्चिक राशीसाठी आनंदी करणारा असेल, व्यवसायातील प्रलंबित कामे पूर्ण होतील. नोकरीत प्रगती होईल, पदोन्नती मिळेल. या आठवड्यात व्यवसायात चांगले यश मिळून धनलाभ होईल. आठवड्यात मंगळ आणि गुरू हे तुमचा आत्मविश्वास वाढवतील. व्यवसात चांगले यश मिळेल आणि मोठा धनलाभ होण्याची शक्यता आहे. या आठवड्यात नोकरीच्या नव्या संधी उपलब्ध होतील. गरीबांना अन्न दान करा. मित्रांच्या मदतीने रखडलेलं काम पूर्ण होईल. बुधवारनंतर उत्पन्नाचे नवे स्त्रोत तयार होतील. शनिवारी काळ्या रंगाचे वस्त्र दान करा. नोकरी बदलण्याचा विचार मनात येईल. पण कृती करू नका, बुधवार आणि शनिवारी तुमच्या योजना, प्रकल्प यशस्वी होण्याच्या दिशेने मार्गस्थ होतील. संपत्ती मिळण्याच्या मार्गावर येणारे अडथळे दूर होतील. गरीबांना अन्न दान करा. वडिलधाऱ्यांचे आशीर्वाद घ्या. आरोग्य निरोगी राहील. **महिलांना-** मुलांचे कर्तृत्व तुमच्या डोळ्यांचे पारणे फेडेल. आपल्या सोबत आजुबाजूच्या लोकांचा सहभाग आपल्याला प्रेरणादायी असेल. घराची डागडुजी करून घ्याल. मानसिक व शारीरिक स्वास्थ्य चांगले राहील. **शुभदिनांक-** ०५,०६

### नवीन काम हाती घ्याल

**धनु :**धनुराशीसाठी या आठवड्यात आपल्याला आरोग्याबद्दल खूप जागरूक रहावे लागेल. हा आठवडा तुमच्यासाठी शुभ संधी उपलब्ध करुन देईल. आठवड्याचे पहिले दोन दिवस तुम्हाला लाभदायक ठरतील. दररोज योग आणि ध्यान करत रहा. या रशिधारकाना व्यवसायात चांगले यश मिळेल. वरिष्ठांच्या सहकार्याने हाती घेतलेलं काम वेळेत पूर्ण होईल. मित्रांची साथ मिळाल्याने नवा उद्योग सुरू करण्याच्या दिशेने पाऊल टाकाल. आरोग्याची काळजी घ्या. तुमचा आत्मविश्वास खूपच वाढेल. नोकरीत चांगले काम केल्याने वरिष्ठांकडून आणखी जबाबदारी देण्यात येईल. नोकरीत प्रगती होईल. आठवड्याच्या शेवटी कालावधी व्यवसायासाठी लाभदायक असेल. रखडलेली कामे पूर्ण होतील. नवीन काम हाती घ्याल. **महिलांना-** आर्थिक परिस्थिती अधिक चांगली करण्यासाठी तुम्ही प्रयत्नशील व्हाल. या आठवड्यात नोकरीशी संबंधित एखादा मोठा निर्णय घ्याल. या आठवड्यात व्यवसायात चांगली वाढ होईल. अन्नदान करा. जागरणाचा त्रास होऊ शकतो. आपल्या नात्यातील सलोखा वाढता राहील. **शुभदिनांक-** ०७,०८

### अभ्यासात प्रगती दिसेल

**मकर :** हा सप्ताह मकरराशीसाठी वेगळा ठरू शकतो. ग्रहमान बऱ्यापैकी असले तरी आपल्या योग्य प्रयत्नांनी आपण यशाची वाटचाल करू शकाल. नोकरदारांना दिलासा मिळेल. वरिष्ठांची मर्जी सांभाळता येईल. कामकाजात स्वतः ला झोकून द्या. सरकारी नियमांचे पालन करा. घरगुती कामांना विशेषतः घरसजावटीच्या कामांना पुढे ढकलणे योग्य राहील. आर्थिक व्यवहारात प्रगती कराल. आपल्या बोलण्यावर मात्र योग्य नियंत्रण ठेवणे हितकारक राहील. आर्थिक बाजू ठीक राहील. रविवारी आणि मंगळवारी तुमच्या कार्याचा विस्तार होईल. आत्मविश्वास वाढेल. या आठवड्यात सकारात्मक बदल जाणवेल. नव्या नोकरीची संधी चालून येईल. मंगळवारनंतर धनलाभ होण्याची दाट शक्यता आहे. विद्यार्थ्यांच्या अभ्यासात प्रगती दिसेल. **महिलांना-** आपल्या स्वतःच्या किंवा एखाद्याच्या उपचारांवर पैसे खर्च करावे लागतील. महिलावर्गाचे दिवस आनंदात जाणार आहेत प्रेम प्रकरणा पासून लांब राहावे, पतिराजांच्या तब्बेती ची विशेष काळजी घ्यावी त्यांना व्यसनांपासून लांब ठेवावे, **शुभदिनांक**-०४,०७

### बौद्धिक क्षेत्राला प्रतिसाद मिळेल

**कुंभ :** या सप्ताहात चालू कालावधीत नोकरदारवर्गास आपली बदली झाल्याची खात्री होईल आणि या स्थलांतरणामुळे आपण आपल्या नियमित जागेपासून बरेच दूर जाऊ शकता ज्यामुळे आपल्याला काही काळ आपल्या कुटुंबापासून दूर जावे लागू शकते. घरातील नातेसंबंधातील कोणतेही अंतर टाळण्यासाठी आपण आपल्या वतीने प्रयत्न केले पाहिजेत आणि वेळोवेळी कुटुंबास चांगली भेट दिली पाहिजे. विविध प्रकारची आव्हाने आपणासमोर येऊ शकतात, त्यांना योजनाबद्ध पद्धतीने सामोरे जा व आपली बाजू सावरण्याचा प्रयत्न करा. कौटुंबिक गोष्टींना प्राधान्य द्या व घरातील मंडळींना खूश करण्याचा कल ठेवा. सरकारी नियम व कायदा कटाक्षाने पाळा. आप्तेष्टांशी सामंजस्याने वागावे. कलाक्षेत्राला चांगले प्रोत्साहन मिळेल. महिलांच्या अंगभूत गुणांना वाव मिळेल. नोकरदारांना दिलासा मिळेल. बौद्धिक क्षेत्राला प्रतिसाद मिळेल. **महिलांना-** प्रकृतीस्वास्थ्य जपा, खाण्यापिण्याची पथ्ये पाळा. जोडीदाराची साथ मिळेल. विशेषतः पोटासंबंधीच्या तक्रारींकडे अधिक लक्ष द्या. कौटुंबिक गोष्टींना प्राधान्य द्या. जोडीदाराची साथ मिळेल. **शुभदिनांक-** ०३,०८

### चांगले कार्य कराल

**मीन :** हा सप्ताह मीनराशीसाठी थोड्या वेगळ्या पद्धतीने जाणार आहे. आपण उत्साहीत असाल, प्रत्येक कार्याला सामोरे जाऊन सामना कराल, जेणेकरून यश मिळण्याची शक्यता देखील वाढेल. आपल्याला कुटुंबातील वडीलधाऱ्या व्यक्तिपासून तसेच समाजातील सन्माननीय व्यक्तींकडून आपल्याला सन्मान मिळेल. आपण त्यांना उतराई व्हाल आणि त्यांच्यासाठी तुम्ही खूप चांगले कार्य कराल, यामुळे उलट तुमच्या सन्मानात वाढ होणार आहे. अचानक तुमची प्रगती होईल. कामामध्ये जास्त व्यस्त राहिल्याने आपल्याला स्वतःसाठी वेळ काढणे जवळजवळ अशक्य होईल. तथापि, आपण स्वत:साठी देखील थोडा वेळ घालवला पाहिजे जेणेकरून आपल्याला आराम मिळेल. या वेळी आपल्या दीर्घकाळाच्या इच्छा पूर्ण होतील, ज्यामुळे आपण एका वेगळ्या आत्मविश्वासाने परिपूर्ण व्हाल आणि हा आत्मविश्वास आपल्याला पुढे जाण्याचा मार्ग दर्शवेल. **महिलांना-** आपल्या मार्गाने येणारी कोणतीही संधी हातांनी जाऊ देऊ नका जेणेकरून या दरम्यान, आपल्यासाठी प्रगतीची कोणतीही संधी सुटणार नाही. थोडा व्यायाम करा जेणेकरून कोणत्याही शारीरिक समस्या टाळता येतील. **शुभदिनांक-** ०४,०७

मोहोर

# निवडणूक निकाल काहीही असला तरी...

२०२४ च्या लोकसभा निवडणुकीत कोणत्या लाटेचा प्रत्यय आला नाही. देशात अनेक ठिकाणी वेगवेगळे मुद्दे होते. तरीसुद्धा निकालाच्या बाबत स्पष्टता कोणीही ठामपणे मांडत नाही. आम्हीच जिंकणार असे सर्व पक्ष, आघाड्या सांगत असल्या तरी एक प्रश्नचिन्ह मात्र निर्माण होताना दिसत आहे. या निवडणुकीच्या निकालाने देशभरात वेगवेगळ्या स्तरांवर अनेक परिणाम होतीलच; पण महाराष्ट्रातल्या निकालांवर अखख्या देशाचे लक्ष आहे. महाराष्ट्रात झालेल्या, भूतकाळात न घडलेल्या, भविष्यात घडतील की नाही, अशा शंका व्यक्त करणाऱ्या घटना घडल्या आहेत.


आचार-विचार
डॉ. विलास पवार

लोकसभा निवडणुकीचे मतदानाचे सर्व टप्पे पार पडले. आता फक्त निकाल जाहीर व्हायचे राहिले आहेत. येत्या ४८ तासांत तेसुद्धा जाहीर होतील. लोकशाहीच्या उत्सवाचा सोहळा संपूर्ण संपन्न येत्या ४ जूनला होईल. निकाल जाहीर होईल तेव्हा राजकीय भूकंप होईल. निकाल अनाकलनीय आहे, अशा पद्धतीची वक्तव्ये आजूबाजूला ऐकायला मिळत आहेत. लोकसभा निवडणूक निकाल काय असेल हे ब्रह्मदेवसुद्धा सांगू शकत नाही, असे अजितदादा पवार एकीकडे सांगतात. तर, एकीकडे अमित शहांनी जाहीर करून टाकले आहे की, सरकार भाजपाचे असेल, विरोधी पक्ष किती मजबूत असेल याचा विचार लोकशाहीच्या दृष्टीने महत्त्वाचे आहे. राज्याचे मुख्यमंत्रीसुद्धा जाहीर स्पष्ट सांगतात की, सरकार हे भाजपा आणि त्यांच्या सहपक्षांचे असणार आहे. केंद्रीय स्तरावर सगळीकडे अनेक मतमतांतरे आहेत. त्याला कारणीभूत अनेक घटनासुद्धा आहेत. याच आठवड्यात मतदानाचा शेवटचा टप्पा प्रचाराच्या स्तरावर असताना नरेंद्र मोदी आपल्या कार्यालयात दिवसभर थांबून होते. अर्थातच नरेंद्र मोदी हे आपल्या देशाचे पंतप्रधान आहेत. त्यामुळे फक्त प्रचाराचे, फक्त गुजरातचे भले करण्याचे काम त्यांचे नाही, तर देशाचे सन्माननीय पंतप्रधान म्हणून कर्तव्य पार पाडण्याचे त्यांचे कार्य महत्त्वाचे ठरते. काही लोकांनी त्याचा अर्थ असासुद्धा काढला की, पुन्हा पंतप्रधान होता आले नाहीतर उरल्यासुरल्या कामाचा निपटारा करून टाकूया म्हणून नरेंद्र मोदींनी पंतप्रधान कार्यालयात दिवसभर काम केले. व्यक्ती आणि प्रवृत्ती, मत आणि मतांतरे याचाच हा खेळ आहे. प्रत्येक निवडणुकीचा एक विशिष्ट मुद्दा असतो, एक लाट असते, त्यामुळे निकालाची उत्कंठता असते. या २०२४ च्या लोकसभा निवडणुकीत कोणत्या लाटेचा प्रत्यय आला नाही. देशात अनेक ठिकाणी वेगवेगळे मुद्दे होते. तरीसुद्धा निकालाच्या बाबत स्पष्टता कोणीही ठामपणे मांडत नाही. आम्हीच जिंकणार असे सर्व पक्ष, आघाड्या सांगत असल्या तरी एक प्रश्नचिन्ह मात्र निर्माण होताना दिसत आहे. या निवडणुकीच्या निकालाने देशभरात वेगवेगळ्या स्तरांवर अनेक परिणाम होतीलच; पण महाराष्ट्रातल्या निकालांवर अखख्या देशाचे लक्ष आहे. महाराष्ट्रात झालेल्या, भूतकाळात न घडलेल्या, भविष्यात घडतील की नाही अशा शंका व्यक्त करणाऱ्या घटना घडल्या आहेत. महाराष्ट्रात सत्तारूढ विरोधी पक्षांचे सरकार आहे. विरोधी पक्षातल्या पक्षांतर्गत असलेल्या विरोधींचे सरकार आहे. याबाबतच संभ्रम आहे. आपल्या राज्यात आणि अन्य राज्यांत देशभरात निवडणुकीच्या वेळेत आयाराम, गयाराम अशा वृत्तीच्या प्रदर्शनाला





कमतरता नसते. आपल्या राज्यात यावेळेला एकत्र सत्ता भोगलेल्या, एकत्र विरोध केलेल्या, एकत्र सत्ता- एकत्र विरोध अशा वेगळ्या प्रक्रियेतून जन्माला आलेले सरकार आहे. हे सर्व निवडणुकांना विचारात घेऊन, आखणी करून केलेली स्थित्यंतरे आहेत. आपण त्यांना राजकीय भानगडीसुद्धा म्हणू शकतो. आता निकालाच्या तारखेला या राजकीय भानगडीबाज डोके ठेवणाऱ्या नेतेमंडळींच्या निकालाची वेळ आहे. आपण फोडाफोडी करून चांगले केले? आपला पक्ष सोडून, फोडून चांगले केले की वाईट? आपण पक्ष पळवून नेणाऱ्यांचा बंदोबस्त करायला कमी पडलो का? आपण पक्षांतर करायची गरज होती का? वगैरे-वगैरे अनेक प्रश्न निकाल जाहीर झाल्यानंतर जन्माला येणार आहेत. राजकारण केव्हाही कायमस्वरूपी मुद्द्यांवर आधारित नसते. तसेच ते केव्हाही कायमस्वरूपी शत्रुत्व निर्माण करणारे असत नाही. याची जाणीव महाराष्ट्रातल्या जनतेला तर नक्कीच आहे. लोकसभा निवडणुकीत जर भाजपाला जागा कमी मिळाल्या, तर त्यांना समर्थन कोण देणार? महाराष्ट्रातल्या शिवसेना आघाडी, राष्ट्रवादी काँग्रेस-शरद पवार हे दोन पक्ष त्यांना पाठिंबा देणार का? अशा विचारांची मोट सध्या सगळीकडे ठेवली जात आहे. पक्षश्रेष्ठी याबाबत नरो वा कुंजरो पद्धतीने होकार देताना दिसतात. गरज पडल्यास हे करावे लागेल, याची मानसिकता ठेवावी लागेल, अशी स्पष्टोक्ती आपल्या कार्यकर्त्यांना देतात. दुसरीकडे वेगवेगळी वक्तव्ये करून मतदार जनतेला संभ्रमावस्थेत ठेवण्याचा सार्वत्रिक कार्यक्रम राबवतानासुद्धा दिसत आहेत. विरोधी पक्ष हा मजबूत असायला पाहिजे, हे देशातल्या सर्वांना वाटते आहे. परंतु, आम्ही दहा वर्षे सत्तेत आहोत आणि आतासुद्धा आम्हालाच सत्तेत यायचं आहे. यावेळेला आम्हा विरोधी पक्ष प्रभावीपणे काम करणारा हवा आहे. असे जेव्हा भाजपाची सत्ता आणि संगठन सांभाळणारे अमित शहा मत व्यक्त करतात, तेव्हा त्यांना नेमके काय म्हणायचे आहे, हे धूसरणे स्पष्ट करतात. याचाच अर्थ, निवडणुकीच्या निकालाचा परिणाम काहीही असला तरी आम्हीच सत्ताधारी आहोत, असाच होतो आहे. लोकशाही प्रक्रियेत अशा पद्धतीचा अहम निर्माण होणे, एकाधिकारशाहीची निर्मिती तर करत नाही ना? अशी अनेकांची चिंता आहे. एकीकडे राहुल गांधी, शरद पवार, उद्धव ठाकरे यांच्या पक्षातल्या लोकांना फोडून त्यांच्या पावित्र्याची प्रमाणपत्रे भाजपाने दिली आहेत. आता या प्रमाणपत्रधारकांची योग्यता की अयोग्यता या निकालाने स्पष्ट होणार आहे. सर्वसामान्य जनतेला पडलेल्या प्रश्नांचा येथे शेवट आहे, असे म्हणताच येणार नाही. कारण, कोणती राजकीय भूमिका प्रबळ आहे? कोणती विचारसरणी महत्त्वाची आहे, हे निकाल काहीही लागला तरी स्पष्ट होणार नाही. ही निवडणूक केवळ सत्ताप्राप्ती म्हणून केलेली राजकीय पक्षांची नेहमीसारखी उलाढाल आहे.

यावेळी ही उलाढाल, तोडाफोडी, पळवापळवी या थराला पोहोचली आहे एवढेच! या निवडणुकीत नेमका जाहीरनामा काय होता, मतदारांना भूलवणाऱ्या थापा कोणत्या होत्या, कोणती आश्वासने होती, याचा विसर सर्वच पक्षांना नेहमीप्रमाणे पडणार आहे. लोकशाहीच्या नावाखाली लोकांना मतदारराजा म्हणून मतदान पेटीबंद झाल्यानंतर जनतेच्या वाट्याला काय येणार, हाच प्रश्न आहे. जे सत्ताधीश होणार, ते म्हणणार की फक्त जाहीरनामा पूर्ण करण्याकडे कसे लक्ष देणार? आम्हाला हा देश चालवायचा आहे? निवडणुकीतल्या जुमल्यांना गांभीर्याने घ्यायची गरज नाही. जे निवडून येणार नाहीत, ते पराजयाचा हुंकार आळवत आम्हाला जाहीरनामा पूर्ण करण्याची संधीच मिळाली नाही, हे सांगणार. एकूणच, राजकारणातल्या आचार-विचाराचे सोयरसूतक जनतेला असणारच नाही, मग निकाल काहीही लागला तरी आणि कोणीही सत्ताधीश झाला तरी! **

# आठवणीतली बॅट


कोकणस्पंदन
धनंजय शेट्ये

नव्वदीच्या दशकात गावात शनिवार, रविवार भातशेताच्या कोपऱ्यात क्रिकेट सामने रंगायचे. खेळपट्टीची जमीन लाकडी चेपणं घेऊन व्यवस्थित गुळगुळीत केली जायची. शनिवारी शाळा अर्धा दिवस असायची. मग दुपारी जेवल्यावर दीड-दोन वाजता शेततळ्यात मैदानावर मनमुरादपणे क्रिकेट खेळ खेळला जात असे. वडाच्या पारंबीपासून कोयत्याने बॅट केली जायची.लहानपणी तर माडाच्या पिड्यापासून बॅट बनविलेली असायची, तर कधी शिवणीच्या झाडाच्या लाकडी फळीपासून बॅट बनविली जायची. बॅट खूप हलक्या असायच्या. बांबूपासून कोयत्याने तोडून सहा स्टम्प करायचो. सुरुवातीला कापडाच्या चिंध्यापासून आबाधाबीसाठी चेंडू बनविला जायचा. रबरी चेंडू दहा रुपयाला मिळायचा. पण, ते दहा रुपयेसुद्धा एक-एक रुपया गोळा करुन चेंडू आणायचो. सार्वत्रिक गरीबी होती. चेंडू हरवल्यावर खेळ थांबवावा लागायचा. अकरा रुपयांची मॅच असायची. पण, ते अकरा रुपयेसुद्धा त्या काळात भारी ओढाताण करून जमवत असू. पण, खूप मज्जा यायची. 'ब्लॅक अ‍ॅन्ड व्हाईट' टीव्हीवर क्रिकेट मॅच पहायला तुफान गर्दी जमायची. गावात एखाद्याच्या घरीच टीव्ही असायचा. सचिन, द्रवीड, विनोद कांबळी, गांगुली, मोहमद अझरुद्दीन यांच्या अफलातून खेळामुळे क्रिकेटचं तरुणाई वेड होतं. टीव्ही पाहताना टीव्ही मालक एक-एक रुपया तिकीट घ्यायचा. रविवारी रामायण महाभारतसारख्या लोकप्रिय पौराणिक मालिका असताना रस्तेच्या रस्ते ओस पडायचे. सर्वजण अर्धा तास आधीच टीव्हीसमोर जागा अडवून बसायचे. क्रिकेट खेळताना माळरानावर गुरांना चारायला सोडून मग मनसोक्त क्रिकेट खेळायचो. पण, खेळ रंगात आला की गुरांकडे लक्ष नसायचे, मग कुणाचा तरी शेतमळा गुरे साफ करुन टाकायची. संध्याकाळी काळोख पडेपर्यंत क्रिकेट सामने रंगायचे. पण, घरी आल्यावर आईबाबांचा यथेच्छ मार खावा लागत असे. पण, क्रिकेटचं वेड मात्र कमी होत नसायचं. कधी कधी शहरी भागात स्थानिक क्रिकेट स्पर्धा आयोजित करण्यात येत असत. कंपनीचे चेंडू टुर्नामेंटसाठी वापरले जायचे. त्याकाळी २१ रुपयाला चेंडू बाजारात मिळत. पण बॅट मात्र खरेदी करण्याची ऐपत कुणाचीच नसायची. मी सातवी इयत्तेत असताना बाबांनी आपल्या जीवलग मित्राकडून वडाच्या पारंबीपासून एक सुंदर बॅट बनवून दिली होती. मी शाळेत हुशार होतो, पहिला नंबर काढला होता. त्यामुळे बाबांनी मला ती बॅट दिली होती. आजही ती वडाच्या पारंबीची बॅट जपून ठेवली आहे. सायकलच्या ट्युबला कापून त्या बॅटची ग्रीफ बनवली होती. ती बॅट वापरायला जो तो धडपडायचा.खरंतर, ते फळकुट होतं; पण माझ्यासाठी लाखमोलाची होती. मी त्या बॅटने अनेक सामन्यांमध्ये अनेक धावा जमविल्या होत्या. माझ्यासाठी ती बॅट खूप लकी होती. पण, बाबांच्या आठवणी होत्या. ती बॅट खालून झीजू नये म्हणून डालड्याच्या प्लॅस्टिक डब्याची प्लॅस्टिक पट्टी कापून खिळ्यांनी फिट्ट बसवली होती. त्यामुळे ती टिकून होती. पुढे पुढे तर ती बॅट मी कोणाला हातही लावायला देत नसे. भारतीय क्रिकेटमध्ये मनोज प्रभाकर, अझरुद्दीन आणि अजय जडेजा यांच्या 'मॅच फिक्सिंग'च्या धुमाकूळनंतर माझं क्रिकेटवरचं प्रेम कमी झाले, पण बॅट मात्र जपून ठेवली.

आज तब्बल तीस वर्षांनंतर माझ्या मुलीला क्रिकेट खेळण्यासाठी ती बॅट माळ्यावरून बाहेर काढली. मुलीलाही ती बॅट खूप आवडली. का कुणास ठाऊक? पण, ती बॅट हातात घेतली की बाबा समोरच उभे असल्याचा भास होत राहतो. अठराविश्व गरीबीतही बाबांनी ती बॅट आपल्या जीवलग मित्राकडून आपल्या लाडक्या मुलांसाठी घेतली बनवून होती. बाबांना मोबदला म्हणून दोन दिवस लाकडे फोडायला मजुरीला जावे लागले होते.

ती बॅट ही फक्त बॅट नाही तर माझ्यासाठी आजही किमती वस्तू आहे.

आठवणीतली बॅट तशीच जपून ठेवली आहे. मी नव्वदीच्या दशकात क्रिकेट खेळायचो, पण आता क्रिकेटपासून दूर आहे, पण कित्येक वर्षांनंतर पुन्हा एकदा माझ्या मुलीला क्रिकेट खेळण्याची आवड निर्माण झाली आणि बाबांची ती भेट डोळे ओले करून गेली. **





# योगी पावन मनाचा


जावे संतांच्या गावा!
अनुराधा म्हात्रे

**श्रीस्वामी स्वरूपानंद (पावस)**
**भाग १**

संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर माऊलींचे संत मुक्ताबाईंनी केलेले हे वर्णन आहे. ज्ञानेश्वर माऊलीनंतर याच दैवी गुणांनी युक्त असलेले एक सद्पुरुष विसाव्या शतकात कोकणात कार्यरत होते. तीच वत्सलता, तीच क्षमाशीलता, तोच दीनदुबळ्यांचा कळवळाजणू प्रति ज्ञानेश्वर माऊलीच! हे थोर सत्पुरुष म्हणजे पावसचे (जिल्हा रत्नागिरी) श्री स्वामी स्वरूपानंद होय!

रत्नागिरी जिल्ह्यातील पावस या छोट्या गावात अगदी अलीकडच्या काळापर्यंत म्हणजे इ.स. १९७४ पर्यंत ते कार्यरत होते. पावसाच्या गोडबोले घराण्यातील विष्णुपंत व रुक्मिणीबाई या दांपत्याच्या पोटी १५ डिसेंबर १९०३ साली या नररत्नाचा जन्म झाला. त्यांचे पाळण्यातले नाव रामचंद्र असे होते, पण सर्वजण त्यांना आप्पा म्हणत.

गोडबोलेंच्या एकत्र कुटुंबात अप्पा आणि त्यांच्या भावंडांना वडील माणसांचे प्रेम आणि मार्गदर्शन भरपूर मिळाले. आईसारखेच प्रेम आणि वात्सल्य चुलतीकडून मिळाले. आजोबा मुलांकडून गीतेचे काही अध्याय व इतर स्तोत्र पाठ करून घेत असतं. वडील विष्णुपंत हे अत्यंत सालस आणि सरळ स्वभावाचे होते.त्यांच्यामुखी सदैव विष्णुसहस्रनाम असायचे, अशा सात्विक मध्यमवर्गीय, पांढरपेशा कुटुंबात जन्मलेले, चारचौघांसारखे सामान्य जीवन जगणारे आप्पा उर्फ रामचंद्र गोडबोले हे पुढे स्वामी स्वरूपानंद या नावाने प्रसिद्ध झाले.

नाथ संप्रदायातील अलीकडच्या काळातील ते एक थोर सद्पुरूष होते. रामचंद्र गोडबोले ते स्वामी स्वरूपानंद असात्यांचा जीवन प्रवास झाला. त्यांचा हा जीवन प्रवास अतिशय उद्‌बोधक आहे.

**'नर करनी करे तो।**
**नर का नारायन होत'।।**

हे संत तुलसीदासांचे वचन त्यांच्या बाबतीत अक्षरशः खरे आहे. स्वामींच्या जीवन प्रवासांत स्वातंत्र्य सैनिक हा एक महत्त्वाचा टप्पा आहे. स्वातंत्र्य चळवळीचा तो काळ होता. देशातील वातावरण महात्मा गांधींच्या विचाराने भारलेले होते. रामचंद्र गोडबोले उर्फ आप्पा हेसुद्धा गांधींच्या विचारसरणीकडे आकर्षित झाले होते, कारण त्यांची मूळ विचारशैली या तत्त्वज्ञानाशी मिळती जुळती होती. त्यांच्या उत्तरायुष्यांत लिहिलेल्या संजीवनी गाथा या काव्यामध्ये त्याचे स्पष्ट प्रतिबिंब पडलेले दिसते. लोकसेवेचे व्रत घेणाऱ्यांना भाग्यवंत मानावे. सत्यासाठी जे सर्वस्वाचे दान करतात, प्रेम, अहिंसेचे व्रत घेऊन जे लोकसेवेत मग्न असतात, त्यांच्यावर भगवंतसुद्धा संतुष्ट होतो, असे मत ते मांडतात. त्याबाबत ग्वाही देताना ते आपल्या संजीवनी गाथा या काव्यात म्हणतात,

**शस्त्राविण करी दुष्टांचा प्रतिकार।**
**न घेई माघार प्राणांतीहि।।**
**स्वामी म्हणे तया होऊनी प्रसन्न।**
**देई जनार्दन शांती-सुख।।**

शिरोड्याच्या मिठाच्या सत्याग्रहामध्ये त्यांनी भाग घेतला. त्या सत्याग्रहासाठी त्यांनी रत्नागिरी परिसरात गावोगावी फिरून व्याख्याने दिली. लोकांमध्ये उत्कट देशप्रेम जागृत केले. महात्मा गांधींच्या तत्त्वज्ञानातील महत्त्वाचे सूत्र म्हणजे स्वावलंबन. आप्पांनी त्याचा प्रयोग पावस या त्यांच्या छोट्याशा गावी करण्याचे ठरवले. स्वावलंबनाश्रम नावाने एक राष्ट्रीय शाळा त्यांनी सुरू केली. सुरुवातीला पाच-सहा विद्यार्थीच मिळाले. खेडेगावात दुर्लभ असणाऱ्या इंग्रजी शिक्षणाची सोय तिथे त्यांनी केली. शिक्षण विनामूल्य होतेच पण पुस्तकांचा खर्चही स्वामी करायचे.

राष्ट्रहितासाठी तरुणांनी सुशिक्षित व सुदृढ असणे गरजेचे आहे, असे त्यांना वाटायचे, त्यामुळे ते व्यायामाला प्रोत्साहन द्यायचे. त्यावेळी स्वामी पुण्यात ३० रुपये पगारावर नोकरी करत होते. त्यातून त्यांचे दोन विद्यार्थी व ते स्वतः यांचा उदरनिर्वाह चालत असे, पण स्वामी त्यातूनही थोडी थोडी बचत करायचे. ही बचत ते लोकहितार्थ उपयोगात आणायचे. या पैशातून त्यांनी स्वतःसाठी किंवा आपल्या कुटुंबियांसाठी कोणतीच वस्तू विकत घेतली नाही, तर पावसला जाताना पावसच्या तरुणांसाठी व्यायामशाळेच्या काही वस्तू खरेदी केल्या. पावसमध्ये सर्वांसाठी मुक्तद्वार असलेली एक सार्वजनिक लायब्ररी ही त्यांनी चालवली होती. गावातील देवदेवतांच्या उत्सवाच्या वेळेला राष्ट्रीय मेळा आयोजित करून लोकांचे प्रबोधन करण्याचा उपक्रमही त्यांनी सुरू केला. या मेळ्यातली बरीचशी पदे ते स्वतः रचत आणि बसवतही! श्रीस्वामींना देशाच्या स्वातंत्र्याची आस लागली होती, त्याचप्रमाणे समाज सुधारण्याची तळमळ ही त्यांना वाटत होती. सामाजिक विषमता व धर्मातील खुळचट रुढी यांना त्यांचा सक्त विरोध होता. दिनांक १४/१२/१९३१ रोजी लिहिलेल्या एका पत्रात आपले विचार त्यांनी परखडपणे मांडले आहेत. आपला वेदांत फक्त ग्रंथातच राहिल्यामुळे आपण नादान बनलो आहोत, या शब्दात त्यांनी धर्माच्या अवनीतीचे कारण सांगितले.



त्याच पत्रात पुढे धर्मातल्या जाचक रूढींवर घणाघाती प्रहार केले आहेत. जातीच्या कारणास्तव माणसासारख्या माणसाला कुत्र्या मांजराहूनही तुच्छ लेखणे, एखाद्या दीनदुबळ्या विधवेने केस काढण्याची नाखुशी दाखवली तर धर्म बुडाला म्हणून आकांडतांडव करून जबरदस्तीने तिचे केस काढणे यावर त्यांनी कडक टीका केली आहे. ते रोखठोकपणे पुढे म्हणतात, 'हाच धर्म असेल आणि असाच व्यवहार असेल तर त्या धर्माला आणि व्यवहाराला दुरूनच नमस्कार असो''. वास्तविक, श्रीस्वामी स्वरूपानंद हे बाल-पणापासूच अतिशय सात्विक आणि धार्मिक वृत्तीचे होते; तरीही धर्मातील अनिष्ट प्रथांवर कोरडे ओढायला त्यांनी मागेपुढे पाहिले नाही! हे खूप महत्त्वाचे आहे.

त्याच काळामध्ये त्यांना पुण्यातले सद्गुरू गणेशनाथ महाराज यांचा अनुग्रह लाभला. अध्यात्माची ओढ त्यांना बालपणापासूच होती. देशप्रेम आणि अध्यात्म यांचा सुंदर मिलाफ त्यांच्या व्यक्तिमत्त्वात झाला होता. स्वातंत्र्य चळवळीत भाग घेतला म्हणून तुरुंगात शिक्षा भोगत असतानाही ते अतिशय तळमळीने आणि नियमितपणे ध्यानधारणा करायचे. त्यामुळे त्यांच्याबरोबर शिक्षा भोगत असलेले शंकरराव देव, रावसाहेब पटवर्धन, एस.एम. जोशी इत्यादी मंडळी त्यांना स्वामी असं संबोधू लागली. भावी आयुष्यात ते खरोखरच स्वामी या पदाला पोहोचले. आयुष्याच्या पूर्वार्धात क्रांतिकारक असणाऱ्या योगी अरविंदांप्रमाणेच त्यांचा जीवन ओघ बदलला. देशाला स्वतंत्र करण्यासाठी धडपडणारे स्वामी, पुढे अखिल मानव जातीच्या स्वातंत्र्याचा आणि कल्याणाचा विचार करू लागले.

जन्माला आलेल्या प्रत्येक माणसाने स्वहित साधले पाहिजे. स्वहीत म्हणजे काय तर ईश्वरप्राप्ती! स्वतःचे स्वरूप ओळखणे. 'सोहम्' म्हणजे तो परमात्मा मीच आहे. माझ्यात त्याचाच अंश आहे हे जाणले पाहिजे'; असा उपदेश स्वामी करत असत. 'तुम्ही प्रपंचातले सर्व व्यवहार सुखाने करा मात्र चित्त परमेश्वरांत ठेवा' असे ते कळकळीने सांगत. असा साधासोपा परमार्थ त्यांनी लोकांना शिकवला आणि ते लोकांना भवसागराच्या बेडीतून मुक्त करण्यासाठी मार्गदर्शन करणारे. योगीराज स्वामी स्वरूपानंद झाले! **

# सोशल मीडियावरील ट्रोलिंगचा ताप अन् मनस्ताप

ट्रोलिंग हा पुढे जाणाऱ्या मार्गातला छोटासा स्पीड ब्रेकर आहे. आणि तो यायलाच हवा. त्यामुळे मार्गातला थोडासा अडथळा दूर होतो. आणि पुन्हा वेगाने पुढे जाता येते. ट्रोलिंग करणं काही लोकांचा धंदा झाला आहे. बऱ्याच लोकांनी कित्येकांना घाणेरड्या प्रकारचे ट्रोल केलेले आहे. ट्रोलिंग करणाऱ्यांकडे पूर्णपणे दुर्लक्ष करून आपण आपल्या कामावर लक्ष केंद्रित करणे आणि अजून चांगले कार्य कसे करता येईल त्याकडे पाहणे हे महत्त्वाचे आहे. हे असे ट्रॉलिंग करणे बंद तर होऊ शकत नाही; परंतु त्याकडे दुर्लक्ष करणे हे मात्र शक्य आहे.



निलेश साठे

जमाना सोशल मीडियाचा म्हणजे समाज प्रसार माध्यमाचा आहे. इथे कोणीही हवे तसे व्यक्त होऊ शकतो. त्यावर कोणाचेही बंधन असू शकत नाही. आणि तो आपला नैतिक अधिकार आहे. परंतु, जेव्हा आपण समाज प्रसार माध्यमावर व्यक्त होत असतो, तेव्हा इतर कोणाच्याही भावना दुखावल्या जाणार नाहीत याची काळजी आपण स्वतः घेतली पाहिजे. ही आपली सामाजिक जबाबदारी आहे. इथे कोणाचेही बंधन नसल्यामुळे लोक हवे तसे व्यक्त होऊ लागले आहेत. प्रसिद्धीच्या हव्यासापोटी कुठल्याही प्रकारचे व्हिडिओ अपलोड केले जात आहेत. तुम्ही तुमचे व्हिडिओ नक्की अपलोड करा. आणि, तुमची अपेक्षासुद्धा हीच असते की, लोकांनी तुम्हाला लाईक करावं, कमेंट कराव्यात, सबस्क्राईब करावं.
जर तुमचा व्हिडिओ,
तुमच्या पोस्ट लोकांना आवडल्या तर लोक त्यावर नक्कीच चांगल्या कमेंट करतात. परंतु, एखादी पोस्ट नाही आवडली तर त्यावर वाईट कमेंटसुद्धा करतात. आणि हा ज्याचा त्याचा प्रश्न आहे.
एखाद्याला नाही आवडलं तर नाही आवडलं म्हणणार. त्यांच्या या कमेंट्सचा तुम्हाला त्रास होता कामा नये. कारण ते लोकं आहेत. ते बोलणारच. त्यांच्या तोंडावर हात ठेवता येणार नाही. जसा आपण एखादा सिनेमा पाहिल्यानंतर आपल्याला तो सिनेमा आवडला तर आपण खूप छान आहे असे कमेंट करतो. पण, नाही आवडला तर काय फालतू आहे, असं म्हणूनसुद्धा व्यक्त होतो. पण, म्हणून सिनेमा बनवणाऱ्याने सिनेमा बनवण्याचं सोडलं तर नाही ना. अगदी तसंच या प्रसार माध्यमाचंसुद्धा आहे.

कित्येक लोक हिरो आणि हिरोईन लोकांना ट्रोल करत असतात. याने असं केलं पाहिजे, त्यानं तसं केलं पाहिजे. यानं तसं वागलं पाहिजे, त्यानं तसं वागलं पाहिजे. हा असं बोलला, तो तसं बोलला. हे चुकीचं आहे, ते बरोबर आहे. असं व्हायला नको पाहिजे, तसं व्हायला पाहिजे. असा बराचसा गदारोळ सध्या सोशल मीडियावर माजलेला दिसतो. जेव्हा आपण एखादा व्हिडिओ किंवा एखादी पोस्ट सोशल मीडियावर टाकतो, तेव्हा साहजिकच समाजाच्या वेगवेगळ्या थरातून वेगवेगळ्या प्रकारच्या प्रतिक्रिया येणार आहेत, याची आपल्याला जाणीव असायला हवी. आणि त्या प्रतिक्रियेमधून किंवा त्या कमेंट्समधून आपल्याला त्रास होता कामा नये याचीसुद्धा आपण स्वतःच काळजी घेतली पाहिजे. ज्या त्रास देणाऱ्या प्रतिक्रिया आहेत किंवा कमेंट्स आहेत, त्याच्याकडे संपूर्णपणे दुर्लक्ष करता आलं पाहिजे. प्रत्येक वाईट कमेंट्सवर जर तुम्ही उत्तर देत बसला, तर तुम्हाला तुमचं जगणं असह्य होऊन जाईल. ज्या चांगल्या प्रतिक्रिया आहेत, त्या घ्यायच्या बाकीच्या इतर सोडून द्यायच्या आणि पुढे चालत राहायचं.

सोशल मीडियावर प्रसिद्धी मिळाल्यानंतर पैसा मिळू लागला आहे, हे जवळ जवळ सर्वांना कळून आलेले आहे. त्यामुळे जो तो या माध्यमाचा वापर करू लागला आहे. इथे प्रत्येकाला एक नवीन प्लॅटफॉर्म मिळाला आहे. इथे कित्येक लोक रंकाचे राजा झालेले आहेत. त्यामुळे इथे एक भयाण स्पर्धा निर्माण झाली आहे. वेगळे आणि काहीतरी अलग करण्याच्या नादामध्ये कोणी काहीही पोस्ट करू लागला आहे. प्रसिद्धीच्या हव्यासाने येथे प्रत्येकाला झपाटून टाकलं आहे. प्रत्येकाला इथं फेमस व्हायचं आहे, प्रसिद्ध व्हायचं आहे, नाव कमवायचे आहे, पैसा कमवायचा आहे. त्यामुळे कोणत्याही प्रकारचे व्हिडिओ टाकले जात आहेत, कोणत्याही प्रकारच्या कमेंट्स केल्या जात आहेत, कोणत्याही प्रकारच्या पोस्ट टाकल्या जात आहेत. काहीही करून फक्त प्रसिद्धी आणि पैसा मिळाला पाहिजे, एवढाच उद्देश इथे दिसून येतो. तुमच्याकडे जी काही कला असेल, ती जगासमोर आणण्याचा हा एक प्रबळ मार्ग झाला आहे.

योगा डान्स, गाणे, वादन, अभिनय तसेच काही व्यवसायांचे मार्गदर्शन देणारे व्हिडिओ इथे टाकले जातात. कोणी शेअर मार्केटच्या संबंधित व्हिडिओ टाकतात. कोणी नोकरीच्या संदर्भात व्हिडिओ टाकतात. कोणी मार्गदर्शनपर व्हिडिओ टाकतात. तर, कोणी स्वतःचे कौटुंबिक व्हिडिओ बनवूनसुद्धा पोस्ट करत असतात. जे चांगले आहेत, ते चांगले आहेत. पण, काही अलग आणि वेगळे करण्याच्या नादामध्ये कोणी कोणी गलत पोस्टसुद्धा करत असतात. जे गलत आहेत, त्यांना न पाहता पुढे जाता आलं पाहिजे.

पण जर तुम्ही चांगला व्हिडिओ टाकला असेल, चांगली पोस्ट टाकली असेल आणि त्याच्यावर काही गलत कमेंट्स किंवा गलत प्रतिक्रिया आल्या, तर वाईट तर वाटतेच; परंतु इथे वाईट वाटून न घेता पुढे त्याहीपेक्षा चांगले व्हिडिओ, चांगल्या पोस्ट कशा टाकता येतील याच्याकडे लक्ष दिले पाहिजे. लोक देवातसुद्धा चुका काढतात. तुम्ही आम्ही तर साधी माणसं आहोत. त्यामुळे ट्रोल करणाऱ्यांकडे कधीही लक्ष द्यायचे नाही. आपण आपले चांगले काम करत राहायचे. ट्रोलिंग हा पुढे जाणाऱ्या मार्गातला छोटासा स्पीड ब्रेकर आहे. आणि तो यायलाच हवा. त्यामुळे मार्गातला थोडासा अडथळा दूर होतो. आणि पुन्हा वेगाने पुढे जाता येते. ट्रोलिंग करणाऱ्यांनी कित्येक लोकांचं जगणं मुश्किल करून टाकलं आहे. काही लोक स्वतः पुढे जात नाहीत आणि जो कोणी पुढे जात असेल त्याला असे काहीतरी ट्रोलिंग करतात की, त्या माणसाची उमेद नाहीशी होऊन जाते. ट्रोलिंग करणाऱ्याला सांगा, आम्ही तुझी पोस्ट वाचलीच नाही. आणि जेवढं करायचे आहे तेवढं ट्रोलिंग करा, आम्ही भीत नसतो. आम्हाला पुढे जायचा मार्ग मिळाला आहे, आम्ही जातो पुढे. तुम्ही बसा इथेच ट्रोलिंग करत. असं म्हणत पुढे जाता आलं पाहिजे.ट्रोलिंग करणं काही लोकांचा धंदा झाला आहे. बऱ्याच लोकांनी कित्येकांना घाणेरड्या प्रकारचे ट्रोल केलेले आहे. त्यामुळे अनेकांना खूप मोठा मनस्ताप सहन करावा लागला आहे. परंतु, आता तसे होऊ द्यायचे नाही. ट्रोलिंग करणाऱ्यांकडे पूर्णपणे दुर्लक्ष करून आपण आपल्या कामावर लक्ष केंद्रित करणे आणि अजून चांगले कार्य कसे करता येईल त्याकडे पाहणे हे महत्त्वाचे आहे. **

## चिंतनशील काव्यसंग्रह

# आळंदैश्वरा

आळंदैश्वरा हा प्रतिभाग्रज (सुरेश श्रीरंग सोनवणे) यांचा पहिला काव्यसंग्रह साहित्य संपदा प्रकाशनने देखण्या रूपात प्रकाशित केला आहे. या काव्यसंग्रहाला ज्येष्ठ गजलकार आणि कवी ए.के. शेख यांची सविस्तर प्रस्तावना लाभली आहे. ए. के. शेख यांनी सुरेश यांच्या कवितेची वैशिष्ट्ये सोदाहरण स्पष्ट केली आहेत. 'मनोगत'मध्ये सुरेश यांनी आपले कविता लेखन कसे सुरु झाले याविषयी सविस्तरपणे लिहिले आहे. पहिली कविता लिहिली तेव्हाच सुरेश यांनी आपल्या धाकट्या प्रिय बहिणीची आठवण जपण्यासाठी ''प्रतिभाग्रज'' हे टोपणनाव स्वीकारले. कविता लेखनाच्या ऑनलाइन कार्यशाळेमुळे आणि नंतर स्थापन झालेल्या सहभागी कवींच्या समूहामुळे कविता लेखन सुरू राहिल्याचे सुरेश यांनी नोंदविले आहे. आशिष महाजन यांचे रंगीत, समर्पक मुखपृष्ठ या काव्यसंग्रहाला लाभले आहे. या काव्यसंग्रहात एकूण ८५ कविता समाविष्ट आहेत.




पुस्तक परीक्षण
प्रा. शाम जोगळेकर
मो. ९२७३३४३१७७

आळंदैश्वरा आणि अन्य एका कवितेत कवींनी संत ज्ञानेश्वरांची महती सांगितली आहे. पहिल्या कवितेत शेवटी कवी सांगतात की, ज्ञानेश्वरांची माणुसकीची परंपरा सर्वांनी जपूया. विठू, पांडुरंग सखा, आषाढीची वारी या विविध कवितांतून कवीने विठ्ठल, पंढरपूर, वारी याविषयी आपले विचार उत्तम प्रकारे मांडले आहेत. हनुमान, श्री देवी, श्री लक्ष्मी, सरस्वती, कृष्ण, शंभू, मल्हारी या देवांचे महत्त्व कवीने सांगितले आहे. प्रतिभाग्रज यांना निसर्ग, पाऊस यांची ओढ आहे. ती त्यांच्या विविध कवितांतून व्यक्त होते. ढग, ढगा, ढग्या, उषःकाल, कालचक्र हे फिरते आहे, ऊन-पाऊस, दहीहंडी या विविध कविता या दृष्टीने महत्त्वाच्या आहेत. ''मियावाकी वन'' ही कविता जपानी संकल्पनेवर आधारित आहे. या कवितेतील कवीच्या भावना पर्यावरणपूरक विचारांना प्रोत्साहक आहेत. हजारो वृक्षलागवडीमुळे काय होईल, हे या कवितेतून उत्तम प्रकारे व्यक्त होते.

**वन 'मियावाकी' लावून चला.. देऊयात दिलासा;**
**बन घनदाट हे फुलवून,**
**घनभर बरसू दे जरासा! (पृ. २४)**

कविता करताना शब्दकोशांचा आधार घेणाऱ्या कवीच्या (काहीशा गोंधळलेल्या) भावना ''शब्दशः शब्द'' या कवितेतून उत्तम प्रकारे व्यक्त होतात. रे मेघा ही कविता मेघ,पाऊस, धरती, शेतकरी, धनधान्य यांच्याशी निगडित आहे. या कवितेची छपाई वैशिष्ट्यपूर्ण आहे, परंतु त्याचा हेतू स्पष्ट होत नाही. कोरोनाकाळात प्रतिभाग्रज यांच्या काव्यप्रतिभेला बहर आल्याने त्या काळाशी सुसंगत कवितांचा या पुस्तकात समावेश आहे. लॉकडाऊन धुळवड, राया माझे असं करा की वॅक्सिनेशन, तोडू शृंखला संसर्गाची, माणूस थांबला आहे या कविता त्या काळाची आठवण करून देतात. एक चक्र फिरते आहे, ही अतिशय उत्तम कविता झाली आहे. निसर्ग, समाज यामधील विविधतेचे आणि विसंगतीचे त्यामधून उत्तम दर्शन घडते. शेवटी कवी लिहितात,

विनाश आणि विकासाचे एक चक्र फिरते आहे..

पतंग रंग, ही कविता वाचनीय आणि विचार प्रवर्तक झाली आहे. उंबरठा या कवितेत स्त्री जीवनातील विविध मर्यादांची आणि अवस्थांची उंबरठ्याच्या रूपकातून उत्तम ओळख होते आहे. घाई कशाला लग्नाची?, मध्ये नुकतीच अठरा वर्षे पूर्ण केलेली मुलगी बारावीनंतर पुढे शिकण्याची इच्छा व्यक्त करते. कुळाची कीर्ती वाढेल अशी ती हमी देते आहे. तर अन्य एका कवितेत बाबा माझं लगीन करा, अशी विनंती प्रौढ मुलगा करीत आहे. पदव्युत्तर शिक्षण, एम पीएससीचा अभ्यास करूनही न येणारे यश, यामुळे तो तरुण वैफल्यग्रस्त झाला आहे. प्रौढ मुलगा किंवा मुलगी यांना आपले लग्न स्वतः ठरविता येत नाही; त्यासाठी बाबाच हवेत हे वास्तव खटकते. दगडात देव नाही, एक होतं छोटस राज्य या दोन नितांत वास्तववादी कविता आहेत. लोणचं, एलियन या कविता वेगळ्या स्वरूपाच्या आहेत. संकल्प नववर्षाचा मध्ये कवी नववर्षात गजल लिहिण्याचा संकल्प सोडतो आहे. ही कविता कवीचे काव्यप्रेम आणि निश्चय दोन्हीही व्यक्त करते आहे. स्वावलंबन, स्पेस स्टेशन या कविता कवीची दूरदृष्टी दर्शवितात. मयूर शेळके या रेल्वे कर्मचाऱ्याने आपला जीव धोक्यात घालून, क्षणभरात निर्णय घेऊन अंधमातेच्या रेल्वे फलाटाखाली पडलेल्या मुलाला वाचवले होते. त्यानंतर प्राप्त बक्षीस रकमेतील निम्मी रक्कम या मुलाच्या शिक्षणासाठी दिली होती. या घटनेवरील कविता हृद्य झाली आहे.

जयभीम बाबा, साहित्यसम्राट या कवितांतून कवीने डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि अण्णाभाऊ साठे यांचे महत्त्व वाचकांसमोर मांडले आहे. भारत स्वतंत्र होऊन ७५ वर्षे होऊनही समतेचे स्वप्न साकार न झाल्याची खंत ''पाऊणशे अवघे वयमान'' या कवितेतून कवीने व्यक्त केली आहे.

सामान्यांच्या लोकप्रिय प्रवाससाधनावर ''लाल परीकथा' काव्यरूपाने मांडली आहे. प्रतिभाग्रज यांचा पहिला काव्यसंग्रह असूनही त्यांनी ''आमच्या येथे कविता पाडून मिळतील'' ही वास्तववादी, विडंबनात्मक कविताही लिहिली आहे, ते विशेष! प्रतिभाग्रज यांनी विविध प्रकारच्या कविता या संग्रहातून उत्तम प्रकारे मांडल्या आहेत. मलपृष्ठावर त्यांचा सचित्र सविस्तर परिचय होतो आहे. हा कवितासंग्रह त्यांच्या नवनवीन कवितांची वाट पाहण्यास वाचकास प्रवृत्त करतो आहे. **

**पुस्तकाचे नाव : आळंदैश्वरा(काव्यसंग्रह)**
**कवी : सुरेश श्रीरंग सोनवणे (प्रतिभाग्रज)**
**प्रकाशक : साहित्य संपदा प्रकाशन, पेण**
**प्रथम आवृत्ती: डिसेंबर,२०२३**
**पृष्ठे : १०२ स्वागतमूल्य : रु. १७५/-**

# वदनं मधुरं, वचनं मधुरं

शशिकांत मुद्देबिहाळकर
९७६७१५२६०८

मधुराषटकात वदनं मधुरं, वचनं मधुरं, मधुराधिपते अखिलं मधुरं! अशा अनेकविध गोष्टी कशा मधुर असाव्यात ते सांगितलंय. मुख्यतः वाणी मधुर असावी, म्हणजेच माणसाचं बोलणं मधुर असावं, हे अपेक्षित आहे. निसर्गाने प्राणीमात्रांमध्ये केवळ माणसालाच बोलण्याची कला उपलब्ध करून दिली आहे. अपेक्षा ही की, तो परस्परांशी संवाद साधून गुण्यागोविंदाने आपले आयुष्य सुखकर करेल. इतर प्राण्यांचे आवाज हे त्यांचे संवाद असतीलही. पण, माणसाचे परस्परांमधील संवाद अर्थपूर्ण असावेत, अशी व्यवस्था करताना माणसाला एक प्रगल्भ असा मेंदू दिला आहे, म्हणूनच त्याच्याकडून ''वदनं मधुरं'' ही अपेक्षा व्यक्त करण्यात आली आहे. आवाजाचा पोत प्रत्येक व्यक्तीचा सारखा नसेल, किंबहुना तो त्या अर्थाने गोड असेल ही अपेक्षा नाही. पण, जे आपण वदू, ते दुसऱ्याला किमान दुखावणारे नसावे, त्याच्या मनाला वेदना देणारे नसावे, यालाच 'वदनं मथुरं' असं म्हटले आहे. आपण खरंच आपले बोलणे इतके काळजीपूर्वक बोलतो का? हा प्रश्न पडतो. कारण बोलण्याची प्रेरणा जशी मेंदूकडे मिळते, तसेच आणखी एक छोटसे इंद्रिय या प्रेरणेच्याया अंमलबजावणीत सक्रीय सहभागी असते, ती आपल्या मुखात वळवळणारी 'जीभ' हे ते उपद्व्यापी इंद्रिय.

मेंदूने ते कितीही बांधून ठेवले तरी ती मोकाट सुटलेली असते. 'मधुरं वदनं' या वचनाची तिला पर्वाच नसते. या तिच्या उपद्व्यापाने माणसाचे व्यक्तिमत्त्व कलंकित होते, हे आपण अनुभवतो. खरे तर, अन्नाची चव तपासण्या पासून ते अन्न व्यवस्थितपणे दाताखाली फिरवणे हे जिभेचे काम. परंतु, ते करत असतानाच मेंदूच्या आदेशावरून उच्चार करणे, हे तिचे सर्वात मोठे काम. उच्चार सुस्पष्ट आणि जमल्यास खालच्या स्वरात केलेत तर ''मधुरं वदनं'' कठीण नाही. उच्चारातून केवळ शब्द निघत नाहीत, तर परिणामकारक असा आशय निर्माण होतो, भावना मिसळतात. आपल्या मनात काय आहे ते शब्दातून व्यक्त करण्याची ताकद जिभेवर असते. स्तुतीपासून टोमणयांपर्यंत सर्व लीला या जिभेला लीलया जमतात. जहरी टीका आणि मारक हिंसा या एवढ्याशा अवयवाला लीलया जमतात. मधुरं वदनंपेक्षा या गोष्टीमध्ये जिभेला जास्त स्वारस्य असावे असे प्रत्ययाला क्षणोक्षणी येते. अर्थात, प्रत्येक व्यक्तीवर हे अवलंबून असते. कारण, त्या व्यक्तीला समाजात कसे वावरायचे हे त्याने ठरवायचे असते, त्यानुसार जिभेवर नियंत्रण ठेवणे भाग असते. आपल्या बोलण्यातून आपले संस्कार प्रतीत होतात.

मधुरं वदनासाठी फार मोठे प्रयास करावे लागत नाहीत, संस्कृत भाषेतील अनेक श्लोकांचे पठण आणि त्याचे अर्थ जिभेवर चांगले संस्कार घडवतात. आपल्याला समाजात एक सभ्यता घेऊन जगायचे असेल, तर आपले बोलणे शुद्ध उच्चारणातील असायला हवे, ते नेहमीच खालच्या पट्टीतील हवे. त्यात नम्रता असायलाच हवी. आपले बोलणे हे एक अस्त्र आहे. त्याने जी हिंसा, अपरिमित नुकसान होते. कारण, ही मानसिक हिंसा असते. मधुरं वदनं हे माणसाचे गुणात्मक अधिष्ठान असायला हवे. सर्वच धर्माचे ग्रंथ हेच सांगतात, ते अनुसरणयाचे समुपदेशन धर्मगुरूंनी आपापल्या धर्माधिष्ठांना करण्याची वेळ येऊन ठेपली आहे. नाहीपेक्षा युद्धे जिंकून किंवा हारून सर्वनाशाचा राक्षस मात्र जिंकल्याशिवाय राहणार नाही. **

**चैत्र, वैशाखात भाजून निघाल्यानंतर ज्येष्ठाची आस न वाटली तरच नवल...! ज्येष्ठ केवळ पाऊसच घेऊन येत नाही तर करपलेल्या स्वप्नांवर आशेची पेरणी करत येतो. या काळात बसरणाऱ्या सरींमध्ये रिते कुंभ भरवून टाकण्याची शक्ती आहे. दोन-चार जोरदार सरीही निसर्गातील शुष्कता हटवू शकतात. असा पाण्याच्या एका-एका थेंबासाठी सुरू असणारी निसर्गाची आराधना संपवणारा ज्येष्ठ सुरू होतोय. त्याचे सहर्ष स्वागत करु या.**

# ज्येष्ठ सुरू होतोय...



स्वाती पेशवे

ज्येष्ठ येतोय. इंग्रजी वर्षाचा जवळपास निम्मा काळ संपल्यानंतर येणारा हा तिसरा मराठी मास. एक ऋतू संपून दुसऱ्याच्या प्रारंभीचा काळ. सर्जनाचे नवे पर्व सुरू होण्याचा हा काळ. अशा वेगवेगळ्या अर्थाने ज्येष्ठाचे महत्त्व जाणवते. ज्येष्ठ हा शुष्कता आणि ओलावा यांच्या मधला दुवा आहे. हा निरभ्रता आणि भारलेपणा यांची सांधेजुळणी करणारा काळ आहे. म्हटले तर फटफटीत उजेडापासून कडुसं आलेल्या काळापर्यंतचा तो लहानसा प्रवास आहे, पण तोच सर्जनशील असल्यामुळे अत्यंत मोहक आणि रमणीय आहे. चैत्र आणि वैशाख तापतो. निसर्ग एखाद्या भट्टीसारखा रसरसतो. सध्याच्या ग्लोबल वॉर्मिंगच्या युगात तर ही धग असह्य होतीये. आधीच सिमेंट काँक्रिटने वेढलेल्या जंगलात कसाबसा तग टिकून राहणारा निसर्ग या धगीत अगदी होरपळून जातो. तो उद्रेक सजीवसृष्टीलाही त्रासदायक ठरतो. नदी-नालेच नव्हे तर जणू जीवनप्रवाहालाच ओढ बसते. असे असताना त्या 'आ' वासून पडलेल्या जमिनीबरोबरच प्रत्येकाला पावसाची ओढ लागते. कधी एकदा ही रखरख संपते आणि थंडगार हवेचा झोत स्पर्श अंगाला करुन जातो, असे होऊन जाते. कारण वाढता ताप थेट जगण्याच्या इच्छेला, ऊर्मीला, चेतनेला दाह देतो. म्हणूनच ज्येष्ठामध्ये आभाळात काळी किनार दिसू लागते आणि पावसाचे टपोरे थेंब शिंपण करु लागतात तेव्हा निसर्गाबरोबरच प्रत्येक जीवातली जीवनेच्छाही सुखावते.

सर्जनाचा हा सांगावा आगामी समृद्धीचे पदरव ऐकवून जातो. बहुप्रतीक्षेनंतर वेगवान वाऱ्यांमुळे हलणारी सृष्टी एखाद्या देखण्या नर्तकीसारखी भासू लागते. वृक्षलतांचे ते डौलदार हिंदोळणे तनामनाला मोहीत करुन जाते. या तालात चैत्रामध्ये फुटलेली पालवी आणखी उजळून निघते, अधिक टवटवीत होते. म्हणूनच ज्येष्ठ देखणा आणि संपन्न वाटतो. अशा भारलेल्या वातावरणात मधेच लख्खकन प्रकाशमान होणारी शलाका नाचून जाऊ लागते. अशातच छाती दडपून टाकणारा तो नगारा घुमू लागतो आणि सरसर जमिनीवर उतरणारे टपोरे थेंब जमिनीच्या रोमारोमात सामावू लागतात. भन्नाट वाऱ्याच्या झोतात सैरावैरा उडणारा पाचोळा या दृश्याला वेगळीच नाट्यमयता देतो आणि ज्येष्ठ अवतरल्याची खात्री पटते. असा हा ज्येष्ठ... अग्नीकुंभाकडून जलकुंभाकडे नेणारा... स्वप्नांची साखरपेरणी करणारा, बहरत्या आशावेलींना आधार देणारा...

ज्येष्ठ अशा अनेक वैशिष्ट्यांनी परिपूर्ण आहे. जीवनशैलीमध्ये सुंदर बदल घडवून आणणारा आहे. वळवाची झडाझडी संपल्यानंतर मान्सून वाऱ्यांचा सुंदरसा गोफ विणणारा आहे. समुद्राला उधाण आणणारा आहे. आटलेले झरे, ओढे-नाले प्रवाहित करणारा आहे. म्हणूनच जीवसृष्टीच्या दृष्टीने त्याचे महत्त्व अद्वितीय आहे. हे महत्त्व अधोरेखित करण्यासाठीच ज्येष्ठात निसर्गासमीप नेणाऱ्या सणांचे प्रयोजन असते. वटपौर्णिमा हा त्यातलाच एक सण. वडासारख्या फलदायी वृक्षाचे महत्त्व अधोरेखित करण्यासाठी पौराणिक कथांचे, आख्यायिकांचे कोंदण या सणाला धार्मिक मूल्य देऊन जात असले तरी मुळात वृक्षसंवर्धन हाच यामागील मूळ हेतू आहे, हे आता अनेकजण जाणतात. त्यामुळे या सर्जनपर्वात आता निसर्गरक्षणाचे, वनीकरणाचे अनेक उपक्रम हाती घेतले जातात. विविध स्वयंसेवी, पर्यावरणप्रेमी संस्था या कामी पुढाकार घेतात. विद्यार्थी, कॉर्पोरेट क्षेत्र, ज्येष्ठांच्या संघटना वनीकरणाच्या या कार्यक्रमांना भरभरुन प्रतिसाद देतात. हाती सीड बॉल, हिरवीगार रोपं, विविध प्रकारच्या बियांनी भरलेल्या पिशव्या घेऊन निघालेली निसर्गरक्षकांची ही उमदी फळी बघितली की वाढत्या असंतुलनाची काळजी काही अंशी तरी कमी होते आणि आपणही किमान एक झाड लावावे, वाढवावे ही भावना जन्म घेते. ज्येष्ठात पार पडणारे वृक्षारोपणाचे कार्यक्रम समाजमनाला प्रोत्साहित करणारे ठरतात.

याचा सर्वात मोठा आणि फलदायी ठरणारा प्रयोग वारीच्या निमित्ताने अलिकडच्या काळात आपण पहात आहोत. भक्तांना घेऊन निघालेली ही विशाल सरिता विठ्ठलरुपी सागराच्या दिशेने जायला निघते ती याच महिन्यात. ज्येष्ठात अनेक संतांच्या पालख्या पंढरीच्या दिशेने मार्गस्थ होतात. पूर्वी हा केवळ भक्तीचा महापूर असायचा. मात्र आता त्यात अनेक जाणिवांचे प्रवाहही मिसळत आहेत. उदाहरणार्थ, पावसाळ्यात पार पडणारी ही वारी स्वच्छता, निसर्गरक्षण, संवर्धन आणि वनीकरणाचा संदेश अतिशय सक्षमतेने सर्वदूर पसरवत आहे. हजारोंच्या संख्येने वारी करणाऱ्या शेतकऱ्यांकडे बिया देऊन त्यांच्यामार्फत त्या वारीच्या मार्गातल्या उजाड माळरानांवर पसरवणे आणि त्यायोगे हिरवाई वाढवण्याचा स्तुत्य प्रयत्नही जोरकसपणे राबवला जाताना दिसत आहे. मुख्य म्हणजे त्याला चांगला प्रतिसादही मिळत आहे. हा बदल निश्चितच दखलपात्र आहे.

ज्येष्ठाचा महिना हा पावसाची नव्हाळी अनुभवण्याचा काळ आहे. पावसाची रिपरिप, संततधार सुरू होण्यापूर्वीचा हा काळ एक वेगळीच वातावरणनिर्मिती करतो. या काळात जमिनीतला कोरडेपणा इतका टोकाचा असतो की ती पडणाऱ्या प्रत्येक थेंबाचे आचमन करत असते. सहाजिकच पाणथळ साठतेय, डबकी भरलेली आहेत, त्यावर डास, माशा घोंघावत आहेत, कुंद हवेमुळे रोगजंतू पसरण्याचा धोका उत्पन्न झाला आहे असे कोणतेही चित्र या काळात दिसत नाही. म्हणून पर्यटकांसाठीही हा सुवर्णकाळच असतो. एखाद-दुसरी जोरदार सर येऊन गेली की निसर्ग हिरवाईसाठी कवाडे पूर्णपणे उघडतो. मग जादू घडावी त्याप्रमाणे चार-दोन पावसातच धुळीत हरवलेल्या पायवाटा हिरव्या होतात. अशा या वातावरणात आत्तापर्यंत कृत्रिम गारव्याचा झोत झेलून वैतागलेले शरीर आणि मन स्वच्छंदी पाखराप्रमाणे बाहेर पडू पाहते. कारण केवळ हा सगळा बदल बघून समाधान होत नाही तर तो अनुभवण्यासाठी, रंध्रारंध्रांपर्यंत पोहोचवण्यासाठी जणू निसर्गच आपल्याला साद घालत असतो.

बदलत्या निसर्गाला प्रतिसाद देणाऱ्यांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे. वाकडी वाट करुन लोकांचे जत्थे हिरवाईमध्ये दडलेल्या अनवट वाटा पालथ्या घालत आहेत. धरणक्षेत्रांवर गर्दीचा महापूर बघायला मिळत आहे. ज्येष्ठातले हे दिवस जलभरणाचे आहेत. रिती झालेली पात्रे भरताना एखाद्या गृहिणीला किती प्रयास घ्यावे लागतात! इथे तर जमिनीवरचा आणि जमिनीखालचा असे दोन्ही जलस्तर पूर्णपणे आटलेले असताना पडणारा प्रत्येक थेंब किती महत्वपूर्ण असतो हे वेगळे सांगण्याची गरज नाही. त्यामुळेच तो साठवण्याचा आणि मुरवण्याचा प्रयत्न अगदी व्यक्तिगत पातळीपासून व्हायला हवा. उन्हाळ्यात पाण्यासाठी होणारे आक्रंदन थांबवायचे असेल तर आधी आपण निसर्गावरचे अतिक्रमण थांबवणे गरजेचे आहे हे आता तरी जाणून घ्यायला हवे. सोसायट्यांमध्ये, घरांमध्ये पावसाचे पाणी साठवायचे अनेक पर्याय सध्या उपलब्ध आहेत. त्याची माहिती घेणे आणि शक्य तशी अंमलबजावणी करणे हे आता प्रत्येकाचेच कर्तव्य आहे. हा वसा घेतला तर येणारा काळ सुख आणि सौख्य दाखवून देईल, अशी स्वप्ने आपण पाहू शकतो. शेवटी उंची महालांमध्ये राहण्याची स्वप्ने असली तरी ती पावसाच्या पाण्यावरच पोसतात. ज्येष्ठातला हा पाऊस त्या दृष्टीने साठवायला हवा. त्याचा प्रवाह आपणच केलेल्या अवाढव्य कचऱ्यात, अतिक्रमणांच्या विळख्यात अडकणार नाही याची काळजी घ्यायला हवी. अमृताचे प्रतिरुप असणारे हे पाणी शक्य तितके शुद्ध ठेवणे हे तुम्हा-आम्हा प्रत्येकाचेच कर्तव्य आहे. **

**निवडक**

## तिकीट बजेटच्या बाहेर

**न्युयॉर्क :** भारत-पाकिस्तान सामन्यावेळी स्टेडियम खचाखच भरलेले असते. मग सामना जगाच्या कोणत्याहीकोपऱ्यात असो. यंदाच्या टी-२० विश्वचषकात भारत-पाक सामना हा ९ जूनला न्यूयॉर्कमध्ये होणार आहे. मात्र, अजूपर्यंत या सामन्याची सर्व तिकीटे विकली गेलेली नाही. यामुळे सर्वांना आश्चर्याचा धक्का बसला आहे. आयसीसीच्या वेबसाईटवर भारत-पाकिस्तान सामन्याचे तिकीट अजूनही उपलब्ध आहे. मात्र, या तिकीटाची किंमत इतकी जास्त आहे की ते अनेकांच्या बजेटच्या बाहेर आहे.

## खेळाडूंवर टीका नको

**न्युयॉर्क :** सततच्या पराभवानंतर पाकिस्तानचे चाहते आपल्या संघावर टीका करत आहेत. अशातच पाकिस्तान क्रिकेट बोर्डाचे अध्यक्ष मोहसिन नक्वी यांनी चाहत्यांना कळकळीची विनंती केली आहे. मोहसिन म्हणाले की, मी चाहत्यांना विनंती करतो की, पुढचे चार आठवडे कृपया आपल्या खेळाडूंना पाठिंबा दर्शवा. आमचा त्यांच्यावर पूर्ण विश्वास असून प्रत्येकाने हार जीत होत असते हे समजून आपल्या संघाच्या पाठिशी उभे राहायला हवे. ते विजयाच्या इराद्याने अमेरिकेला गेले आहेत ते नक्कीच जिंकून येतील.

## विराट महान खेळाडू

**नवी दिल्ली :** सौरव गांगुलीच्या मते यंदाच्या आयपीएलमध्ये विराट कोहली ज्या स्वातंत्र्याने खेळला, तसेच तो टी-२० विश्वचषकातही खेळणे महत्त्वाचे राहणार आहे. तसेच तो म्हणाला, विराटने रोहित शर्मासह सलामीला फलंदाजी करायला हवी. विराट कोहली महान खेळाडू आहे, हे सांगण्याची गरज नाही, पण त्याने भारतीय संघाच्या चांगल्या कामगिरीसाठी आयपीएलमध्ये केली तशी स्वातंत्र्य घेत फलंदाजी करावी. त्यामुळे सलामीसाठी माझी पसंती विराट आणि रोहित यांनाच असेल.

## भारतीय संघाला इशारा

**नवी दिल्ली :** ब्रायन लारा म्हणाले, शेवटच्या चषकात भारतीय संघ टी-२० असो किंवा ५० षटकांचा, मला वाटते की ते कसे पुढे जातील याबद्दल त्यांच्याकडे अंतिम योजना नाही. तुमच्याकडे किती सुपरस्टार आहेत हे महत्त्वाचे नाही. हा विश्वचषक जिंकण्यासाठी तुम्ही कसे पुढे जाल, तुमच्या कोणत्या योजना असतील आणि तुम्ही तुमचा डाव किंवा आक्रमण कसे तयार कराल याने फरक पडतो. मला आशा आहे की राहुल द्रविड आपल्या खेळाडूंना एकत्र आणेल आणि भारतासाठी टी-२० विश्वचषक जिंकण्यासाठी योजना तयार करेल.

## रोहित शर्माचे भाष्य

**न्युयॉर्क :** टी-२० विश्वचषक स्पर्धेतील काही सामने अमेरिकेतली तीन मैदानांवर खेळवले जाणार आहेत. यातील न्युयॉर्कमधील नासाऊ काउंटी आंतरराष्ट्रीय क्रिकेट स्टेडियमवर पहिल्यांदाच सामने खेळवण्यात येणार आहेत. नव्याने तयार करण्यात आलेल्या या मैदानावर भारतीय संघ पहिल्याच फेरीतील तीन सामने खेळणार आहे. आता या मैदानाच्या पहिल्या अनुभवाबाबत रोहित शर्माने भाष्य केले आहे. रोहित या मैदानाला पाहून प्रभावित झाला आहे, त्याने मैदानाचे कौतुक देखील केले आहे.

# आजपासुन रंगणार
# टी-२० विश्वचषकाचा थरार

**। न्युयॉर्क । वार्ताहर ।**

देशात लोकसभा निवडणुकीच्या निकालाची उत्सुकता शिगेला पोचलेली असतानाच अमेरिका आणि वेस्ट इंडीजमध्ये टी-२० विश्वकरंडक क्रिकेट स्पर्धेचे नगारे भारतीय प्रमाणवेळेनुसार रविवारी सकाळी सहा वाजता वाजणार आहेत आणि पुन्हा एकदा भारतीय संघाबाबतच्या आशा फेर धरणार आहेत. तब्बल २० देश, २९ दिवस, ५५ लढती अशी मोठी मेजवानी क्रिकेट रसिकांना मिळणार आहे. सर्वप्रथम प्रत्येकी पाच संघ असलेले चार गट त्यांच्यात होणारे साखळी सामने त्यानंतर अव्वल आठ संघात 'सुपर-८' असे स्पर्धेचे स्वरूप आहे. यातील पहिले चार संघ उपांत्य फेरीसाठी पात्र ठरतील आणि २९ जून रोजी अंतिम सामना होणार आहे.

सर्वांना प्रतीक्षा असलेली भारत-पाकिस्तान सामना नऊ जून रोजी न्यूयॉर्कमध्ये होणार आहे. सहा महिन्यांपूर्वी मायदेशात भारतीय संघाचे हातातोंडाशी आलेले एकदिवसीय विश्वकरंडक स्पर्धेचे विजेतेपद थोडक्यात हुकले होते. आता तरी आयसीसीचा विश्वकरंडक उंचावणार का, याची उत्सुकता आहे. २०१३ मध्ये धोनीच्या नेतृत्वाखाली चॅम्पियन्स करंडक जिंकल्यानंतर भारताला प्रत्येकवेळी हुलकावणी मिळालेली आहे.

यावेळी अमेरीकेने पहिल्यांदाच तर वेस्ट इंडिजने दुसऱ्यांदा विश्वचषकाचे यजमानपद स्विकारले आहे. दोन जून रोजी या स्पर्धेचा श्रीगणेशा होईल. तसेच, २९ जून रोजी स्पर्धेचा जेता ठरणार आहे.




### २९ जूनला अंतिम लढत

साखळीतील प्रत्येक गटातील सर्वोत्तम दोन संघ 'सुपर-८' फेरीसाठी पात्र हातील. 'सुपर-८' फेरीत आठ संघांची दोन गटांत विभागणी करण्यात आली असून या फेरीमधील प्रत्येक गटातील अव्वल दोन देश उपांत्य फेरीसाठी पात्र होतील. तसेच, २७ जूनला उपांत्य फेरीच्या लढती होऊन २९ जूनला अंतिम लढत होईल.

## क्रिकेट रसिकांना मिळणार मोठी मेजवानी

### भारतीय संघाचे सामने

भारतीय संघ ५ जून रोजी न्यू यॉर्कमधील नासाऊ काउंटी आंतरराष्ट्रीय क्रिकेट स्टेडियमवर आयर्लंडविरुद्ध टी-२० विश्वचषकाच्या मोहिमेची सुरुवात करणार आहे. त्यानंतर याच ठिकाणी ९ जून रोजी कट्टर प्रतिस्पर्धी पाकिस्तानविरुद्ध रोमांचक सामना होईल. वरील तीन व्यतिरिक्त सहयजमान यूएसए आणि कॅनडा हे गट 'अ' मध्ये इतर दोन सदस्य आहेत.

### येथे पाहता येतील सामने

भारतीय वेळेनुसार हे सामने संध्याकाळी ७.३० वाजता नाणेफेकीनंतर अर्ध्या तासाने म्हणजेच रात्री ८.०० वाजता सुरु होतील. तसेच, विश्वचषकाचे सर्व सामने हे टीव्हीवर स्टार स्पोर्ट्स वाहिन्यांवर पाहायला मिळतील. त्याचबरोबर जर ऑनलाईन सामने पाहायचे असतील तर त्यासाठी हॉटस्टारवर चाहत्यांना जावे लागेल.

# .. अन् रोनाल्डोला अश्रु अनावर

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

खेळ कोणताही असला तरी पराभव हा कोणत्याही खेळाडूसाठी कठीणच असतो, त्यातही अंतिम सामन्यात झालेला पराभव अधिक बोचतो. असेच काहीसे दृश्य सौदीच्या किंग्स कप २०२४च्या अंतिम सामन्यानंतर दिसले. अंतिम सामन्यात अल हिलाल संघाविरुद्ध अखेरच्या क्षणी पत्करावा लागलेल्या पराभवानंतर अल-नासरचा दिग्गज ख्रिस्तियानो रोनाल्डोला अश्रु अनावर झाले.



शुक्रवार दि. ३१ मे रोजी जेद्दा येथे झालेल्या अंतिम सामन्यात अल हिलाल आणि अल नासर हे दोन संघ आमने-सामने होते. या सामन्याच्या निर्धारित वेळेनंतर १-१ अशी गोल बरोबरी झाली होती. त्यामुळे पेनल्टी शुटआऊट झाले, ज्यात अल हिलालने ५-४ अशा फरकाने विजय मिळवला. त्यामुळे अल-नासरची विजेतेपद मिळवण्याची संधी हुकली. त्यामुळे या पराभवाने अत्यंत निराश झालेल्या रोनाल्डोला त्याचे अश्रु आवरता आले नाहीत. तो मैदानावरच निराश होऊन आडवा पडला. यावेळी त्याला त्याच्या संघातील सदस्यांनी सहानुभूती देत धीर दिला. या घटनेचा व्हिडिओ सध्या व्हायरल होत आहे.

रोनाल्डोसाठी यंदाचा हंगाम वैयक्तिकरित्या चांगला राहिला असला, तरी त्याला संघाला विजेतेपद मिळवून देता आलेले नाही, त्याचमुळे त्याची निराशा स्पष्ट दिसत होती. काही दिवसांपूर्वीच सौदी प्रो लीगमध्ये अल-नासरला दुसऱ्या क्रमांकावर समाधान मानावे लागले आहे, अल हिलालने पहिला क्रमांक पटकावला. तसेच, एशियन चॅम्पियन्स लीगमध्येही उपांत्यपूर्व फेरीत अल-नासरचा पराभव झाला होता.

दरम्यान, ब्राझीलचा फुटबॉलर नेमार हा अल हिलाल संघाचा भाग आहे. सध्या तो दुखापतीमुळे मैदानातून बाहेर आहे. पण असे असले तरी आपल्या संघाला अंतिम सामन्यात पाठिंबा देण्यासाठी तो स्टेडियममध्ये उपस्थित होता. दरम्यान, या सामन्यात त्याच्या आजूबाजूचे लोक रोनाल्डोला डिवचण्याच्या हेतूने मेस्सी...मेस्सी अशा घोषणा देत असताना तोही त्याची मजा घेताना दिसल्याचा व्हिडिओही समोर आला आहे.

# सट्टेबाजीच्या आरोपावरून खेळाडूचे निलंबन

**। लंडन । वृत्तसंस्था ।**

टी-२० विश्वचषक २०२४ तोंडावर असताना इंग्लंड क्रिकेट बोर्डाने मोठे पाऊल उचलले आहे. त्यांनी वेगवान गोलंदाज ब्रायडन कार्सवर सट्टेबाजी केल्याच्या आरोपावरून तीन महिन्यांसाठी निलंबित केले आहे. २८ वर्षीय कार्स एकदिवसीय विश्वचषक २०२३ स्पर्धेत इंग्लंड संघाचा भागही होता. दरम्यान, त्याच्यावर इंग्लंडच्या नव्याने स्थापन झालेल्या क्रिकेट नियामकाने भ्रष्टाचारविरोधी चौकशीनंतर ही बंदी घातली आहे. कार्सनेही हे आरोप मान्य केले आहेत आणि चौकशीसाठीही सहकार्य केले. त्याने २०१७ ते २०१९ दरम्यान वेगवेगळ्या सामन्यांवर ३०३ वेळा सट्टा लावला होता. एका वृत्तानुसार त्याने तो खेळत असलेल्या सामन्यांवर सट्टा लावला नाही, पण त्याने त्याचा देशांतर्गत संघ डरहम च्या सामन्यांवर पैसे लावले होते.



मिळालेल्या माहितीनुसार, सर्व गोष्टी लक्षात घेतल्यानंतर त्याच्यावर १६ महिन्यांची बंदी घालण्यात आली होती, ज्यातील १३ महिन्यांवर स्थगिती देण्यात आली आहे. पण तीन महिन्यांच्या निलंबनामुळे तो २८ ऑगस्टपर्यंत क्रिकेट खेळू शकणार नाही. त्यामुळे त्याची आगामी वेस्ट इंडिजविरुद्ध होणाऱ्या कसोटीसाठी इंग्लंड संघात निवड होऊ शकत नाही.

# 'कोहली संघातील चिंतेचा विषय'

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

विराट कोहली हा भारतीय संघातील चिंतेचा विषय आहे, असे आपण कधी ऐकलं नव्हतं. मात्र यंदाच्या टी-२० विश्वचषकात भारतीय संघात विराट कोहलीची फलंदाजीची पद्धत हा चिंतेचा विषय म्हणून पाहिला जात आहे. भारताचे माजी फलंदाज संजय मांजरेकर यांना भारताच्या टी-२० विश्वचषक जिंकण्याच्या वाटेत विराट आडवा येत असल्याचं जाणवत आहे.

विराट कोहलीने टी-२० विश्वचषकात दोनवेळा प्लेअर ऑफ द टुर्नामेंटचा पुरस्कार मिळवला आहे. नुकतेच त्याने आयपीएलमध्ये मोठा धमाका करत ७४१ धावा केल्या आहेत.



मांजरेकर म्हणाले की, उपांत्य आणि अंतिम फेरी सारख्या मोठ्या सामन्यात एकच चिंता आहे विराट कोहली! विराट मोठ्या सामन्यात सर्व जबाबदारी स्वतःवर घेतो. अशा सामन्यात विराटला स्वतः खूप वेळ फलंदाजी करावी असे वाटत असते. त्याची इंडियन क्रिकेटमध्ये तशी प्रतिमा असल्याने तो ती आपलीच जबाबदारी आहे, असे समजून खेळतो. त्याने खूप वेळ टिकून फलंदाजी करण्यापेक्षा मुक्तपणे फलंदाजी करणे गरजेचे आहे. त्याने त्याच्या प्रतिमेची चिंता करू नये. आपण एकदिवसीय विश्वचषकात ते पाहिले आहे.

# आयपीएलला टक्कर देणारी लीग

**। न्युयॉर्क । वृत्तसंस्था ।**

आयपीएलचा पहिला सीझन एप्रिल २००८ मध्ये खेळला गेला. त्यात पाकिस्तानी क्रिकेटपटू खेळले. त्यानंतर नोव्हेंबर २००८ मध्ये मुंबईवर हल्ला झाला आणि पाकिस्तानी खेळाडूंना आयपीएलमधून बंदी घालण्यात आली. याचा बदला घेण्यासाठी पाकिस्तानने २०१६ मध्ये स्वतःची लीग सुरू केली. खूप प्रयत्न केले गेले, पण ९ सीझननंतरही ही लीग आयपीएलच्या दर्जाच्या जवळ पोहोचली नाही. बिग बॅश लीग आणि द हंड्रेड यांनीही असेच प्रयत्न केले, पण अयशस्वी ठरले.

आता अमेरिका प्रथमच क्रिकेट विश्वचषकाचे आयोजन करत आहे. २ जून पासून सुरू होणारा नववे टी-२० विश्वचषक अमेरिका आणि वेस्ट इंडिज यांच्या संयुक्त विद्यमाने होत आहे. यावेळी अमेरिका विश्वचषकाच्या माध्यमातून जागतिक क्रिकेटमध्ये आपले स्थान निर्माण करण्याचा प्रयत्न करत आहे. अमेरिका विश्वचषकाच्या निमित्ताने आपली फ्रँचायझी क्रिकेट लीग 'एमएलसी' इतकी मोठी करण्याचा प्रयत्न करत आहे की ती आयपीएलशी स्पर्धा करू शकेल. एमएलसी म्हणजेच मेजर लीग क्रिकेटची सुरुवात गेल्या वर्षीच झाली. विश्वचषकानंतर त्याचा दुसरा हंगाम जुलैमध्ये खेळवला जाणार आहे.

# तब्बल १८० वर्षांनंतर आमनेसामने

**। डल्लास । वृत्तसंस्था ।**

ॲशेस ही क्रिकेटमधील सर्वात जुनी स्पर्धा मानली जाते, परंतु त्याहूनही जुनी स्पर्धा आहे ती कॅनडा आणि अमेरिकेची. ज्या देशांमधील सामना आंतरराष्ट्रीय क्रिकेटची सुरुवात मानली जाते.

सप्टेंबर १८४४ मध्ये न्यूयॉर्कचे मॅनहॅटन क्रिकेट स्टेडियम लोकांनी खचाखच भरले होते. हा सामना तीन दिवस चालला आणि कॅनडाने अमेरिकेचा २३ धावांनी पराभव केला. १८० वर्षांनंतर २ जून रोजी डॅलसच्या क्रिकेट स्टेडियीयमवर दोन्ही संघ पुन्हा आमनेसामने येणार आहेत. त्यानंतर दोन्ही संघांचे आंतरराष्ट्रीय पदार्पण झाले आणि आज टी-२० विश्वचषक पदार्पण आहे. अमेरिका आणि कॅनडा यांच्यातील सामन्याने टी-२० विश्वचषकाची सुरुवात होणार आहे. तेव्हा कॅनडा जिंकला असला तरी आता अमेरिका वरचढ आहे. विक्रमही अमेरिकेच्या बाजूने आहेत. जगाच्या क्रिकेट नकाशावर अमेरिका आपले अस्तित्व नोंदवण्याचा प्रयत्न करत आहे. विश्वचषकाचे यजमानपद हा त्या प्रयत्नांचाच एक भाग आहे. १८० वर्षांपूर्वी कॅनडाला जागतिक क्रिकेटमध्ये विजयी सुरुवात करायची आहे.

# भारत- पाक सामन्याला धमकी देणारी दहशतवादी संघटना पाकिस्तानमध्ये कार्यरत

**। न्यूयॉर्क । वृत्तसंस्था ।**

टी-२० क्रिकेट विश्वचषक स्पर्धेतील भारत-पाकिस्तान या लढतीस इस्लामिक स्टेट-खोरासन ही दहशतवादी संघटना लक्ष्य करणार असल्याचा इशारा देण्यात आला आहे. सुरुवातीस अमेरिकेतील विश्वचषक लढती लक्ष्य करणार असल्याची माहिती सुरक्षा यंत्रणेस मिळाली होती. मात्र, आता थेट भारत-पाक लढतच लक्ष्य असल्याचे स्पष्ट झाले आहे.

इस्लामिक स्टेट-खोरासन २०१५मध्ये स्थापना करण्यात आली. अफगाणिस्तान, पाकिस्तान आणि इराणमध्ये प्रामुख्याने कार्यरत ही संघटना कार्यरत आहे. ही संघटना आयएसची शाखा आहे. प्रामुख्याने दहशतवादी हल्ले करण्याचे काम ही संघटना करते. इस्लामिक स्टेट-खोरासन आणि आयएस यांच्यातील नेमके संबंध अस्पष्ट आहेत. २०१८मध्ये आयएस-के ही चौथ्या क्रमांकाची दहशतवादी संघटना असल्याचा इकॉनॉमिक्स अँड पीस संघटनेचा दावा आहे.

न्यूयॉर्क प्रांतातील नासाऊ येथे विश्वचषक लढतीसाठी मैदानाची उभारणी करण्यात आली आहे. विश्वचषकाला धोका असल्याची धमकी प्रथम एप्रिलमध्ये देण्यात आली होती. आता एक व्हिडिओ समाजमाध्यमांवर प्रसारीत होत आहे. त्यात भारत-पाक लढत लक्ष्य असल्याचे सुचीत होत आहे. नासाऊ काउंटीचे पोलिस आयुक्त पॅट्रिक जे रायडर यांनी याबाबत माहिती दिली. भारत-पाक लढत एल्सेनहोवर पार्कमधील नासाऊ काउंटी इंटरनॅशनल क्रिकेट स्टेडियमवर होणार आहे.

भारत-पाक लढत ही सुपर बाऊलसारखीच आहे. या विश्वचषकाच्या निमित्ताने जगातील संघ येत आहेत. सर्व जगातून क्रिकेटचे चाहते येणार आहेत. आम्ही सहा महिन्यांपासून या लढतींसाठी तयारी करीत आहोत. त्याबाबत सुरक्षा; तसेच आरोग्य यंत्रणेसह चर्चा सुरू आहे, असे नासाऊ काउंटीचे ब्रूस ब्लॅकमन यांनी सांगितले.

# सुनील छेत्रीचा अखेरचा सामना

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

सुनील छेत्रीचा अखेरचा सामना असलेल्या विश्वकरंडक फुटबॉल पात्रता लढतीसाठी भारताचा २७ खेळाडूंचा संघ जाहीर करण्यात आला. आघाडी फळीतील प्रतिभ गोगई आणि बचावपटू मुहम्मद हमद यांना दुखापतीमुळे वगळण्यात आले आहे. कुवेतविरुद्धचा हा सामना ६ जून रोजी होणार आहे. भुवनेश्वर येथील सराव शिबिरात एकूण ३२ खेळाडू होते. त्यातील लचेनपा, पार्थिब, इम्रान, हम्माद आणि जिथिन यांना रिलीझ करण्यात आले. प्रतिभ आणि हमद यांना हलक्या स्वरूपाच्या दुखापती झाल्या आहेत, तरी त्यांना ७ ते १४ दिवसांची

### भारताचा २७ खेळाडूंचा संघ जाहीर

विश्रांती आवश्यक आहे. त्यामुळे त्यांचा समावेश करण्यात आला नसल्याचे मुख्य प्रशिक्षक स्टिमॅक यांनी सांगितले. निवडण्यात आलेले २७ खेळाडू २९ मेपर्यंत भुवनेश्वर येथेच सराव करतील आणि त्यानंतर ते कोलकताला प्रयाण करतील. कुवेतविरुद्धचा हा सामना झाल्यानंतर भारताचा संघ कतारला जाणार आहे. तेथे 'अ' गटातील अखेरचे दोन साखळी सामने होणार आहेत. प्रत्येक गटातील पहिले दोन संघ पात्रता फेरीच्या राऊंड-३ साठी पात्र ठरतील.



कुवेतविरुद्धच्या या सामन्यातून सुनील छेत्री आपल्या दैदीप्यमान कारकिर्दीची सांगता करणार आहे.

### २७ खेळाडूंचा संघ :

**गोलरक्षक :** गुरप्रीत सिंग संधू, अमरिंदर सिंग, विशाल कैथ. **बचावपटू :** अमेय रानवडे, अन्वर अली, जय गुप्ता, लालचुंगनुंगा, मेहताब सिंग, नरेंद्र, निखिल पुजारी, राहुल भेके, सुभाषीश बोस. **मधली फळी :** अनिरुद्ध थापा, ब्रँडन फर्नांडिस, एडमंड लालरिंदिका, जेक्सन सिंग थौनाओजम, ललियानझुआला छांगटे, लिस्टन कोलाको, महेश सिंग नौरेम, नंदकुमार सेकर, सहल अब्दुल समद, सुरेश सिंग वांगजाम. **आघाडी फळी :** डेव्हिड लालहलांसंगा, मनवीर सिंग, रहीम अली, सुनील छेत्री, विक्रम प्रताप सिंग.

# भारतीय ग्रॅंडमास्टरने गमावली आघाडी

**। ओस्लो । वृत्तसंस्था ।**

**नॉर्वे बुद्धिबळ स्पर्धेत भारतीय ग्रॅंडमास्टर आर वैशाली आणि तिचा भाऊ प्रज्ञानंद यांच्यासाठी संमिश्र दिवस राहिला. महिला गटात वैशालीने स्वीडनच्या पिया क्रॅमलिंगचा पराभव केला, तर पुरुष गटात प्रज्ञानंदला चौथ्या फेरीत अमेरिकेच्या हिकारू नाकामुराकडून पराभव स्वीकारावा लागला. या पराभवानंतर प्रज्ञानंद ५.५ गुणांसह चौथ्या स्थानावर घसरला आहे. विशेष म्हणजे पुरुष गटात या दिवशी सर्व सामन्यांचे निकाल लागले, परंतु प्रज्ञानंदला प्रभाव पाडता आला नाही आणि तो पराभूत झाला.**



१८ वर्षीय प्रज्ञानंदने पाचवेळा विश्वविजेता मॅग्नस कार्लसनचा पराभव करून क्लासिकल गेममधील आपल्या नवोदित कारकिर्दीतील सर्वात महत्वाचा निकाल मिळविल्यानंतर दुसऱ्या दिवशी, भारतीय प्रज्ञानंदला जागतिक क्रमवारीत तिसऱ्या स्थानावर असलेल्या हिकारू नाकामुराकडून पराभवाचा सामना करावा लागला. नाकामुराने खेळाच्या सुरुवातीलाच आघाडी घेतली, तर प्रज्ञानंदने अपरिहार्य वाटणाऱ्या गोष्टी टाळण्याचा पुरेपूर प्रयत्न केला. पण शेवटी, त्याचा बचाव अयशस्वी झाला आणि त्याने ८६ चालींनंतर हार पत्करली, जेव्हा त्याला समजले की तो चेकमेट झाला, तेव्हा त्याने डोक्याला हात लावला.

पुरुष गटात जगातील अव्वल क्रमांकाचा खेळाडू मॅग्नस कार्लसनने आपला कट्टर प्रतिस्पर्धी अमेरिकेच्या फॅबियानो कारुआनाचा पराभव केला.

त्याचवेळी फ्रान्सच्या फिरोझा अलीरेझाने विद्यमान विश्वविजेत्या चीनच्या डिंग लिरेनचा पराभव केला. या स्पर्धेतील चौथ्या फेरीनंतर नाकामुरा सात गुणांसह अव्वल स्थानावर कायम आहे. तो अलिरेझापेक्षा अर्धा गुण पुढे आहे. कार्लसनचे सहा गुण आहेत आणि तो तिसऱ्या स्थानावर आहे, तर कारुआना पाच गुणांसह पाचव्या आणि लिरेन केवळ २.५ गुणांसह शेवटच्या स्थानावर आहे.

क्लासिकल गेम प्रकारात वैशालीचा हा दुसरा विजय असून तिने ७.५ गुणांची भक्कम आघाडी मिळवली आहे. या भारतीय खेळाडूने एकूण ८.५ गुण मिळवले आहेत. तिच्यानंतर महिला विश्वविजेती चीनची वेनजुन झू आणि युक्रेनची ॲना मुझीचुक संयुक्त दुसऱ्या स्थानावर आहेत. मुझीचुकने भारताच्या कोनेरू हम्पीचा पराभव करून स्पर्धेतील तिच्या पहिल्या विजयाची नोंद केली, तर वेनजुनने आर्मागेडनमध्ये तिचा देशबांधव टिंगजी लेईचा पराभव केला. सहा खेळाडूंमध्ये दुहेरी राऊंड रॉबिन पद्धतीने खेळवण्यात येत असलेल्या या स्पर्धेत अद्याप सहा फेऱ्यांचे सामने खेळायचे आहेत.

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक **सौ. चित्रलेखा पाटील** यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील ■ सल्लागार संचालक : सौ. सुप्रिया पाटील ■ व्यवस्थापकीय संचालक : सौ. चित्रलेखा पाटील ■ कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत* ■ सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)